• पुणे, मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 279 • वर्ष ३ रे, अंक २७९ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS

## अमरनाथ गुफा:

नारायण पेठ येथे दीपक मानकर मित्र परिवार यांचे भोलेनाथ मित्र मंडळांचे अध्यक्ष करण मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली अमरनाथ गुफा हा देखावा करण्यात आला होता. हा देखावा सर्वांसाठी आकर्षक बनला होता.



## उद्या अंकास सुट्टी!

मंगळवार, दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी अनंत चतुर्दशी (गणपती विसर्जन) निमित्त राष्ट्र संचार कार्यालयास सुटी असल्याने बुधवार, दि. १८ सप्टेंबर २०२४ रोजी अंक प्रसिद्ध होणार नाही, याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार व हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

**- वितरण व्यवस्थापक**
राष्ट्र संचार, पुणे

## वेध विधानसभेचे; मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे संकेत

# निवडणुक नोव्हेंबरमध्ये?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुका या नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता असून २ टप्प्यात निवडणूक प्रक्रिया पार पडेल. मेरिट आणि विजयाची क्षमता असणाऱ्यांनाच उमेदवारी दिली जाईल हा महायुतीतील जागावाटपाचा फॉर्म्युला असेल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. वर्षा बंगल्यावर पत्रकारांशी अनौपचारिक गप्पांमध्ये शिंदेंनी विधानसभा निवडणुकीवर भाष्य केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महायुतीतील जागावाटप येत्या ८ ते १० दिवसांत अंतिम होईल. अद्याप निवडणुकीच्या तारखांची घोषणा आयोगाने केली नाही. कदाचित नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात २ टप्प्यांमध्ये निवडणूक पार पडेल. विजयाची क्षमता आणि चांगला स्ट्राईक रेट यावरच तिन्ही पक्षांमध्ये जागावाटप होईल. आमच्या महायुती सरकारला महिलांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. जवळपास १.६ कोटी महिलांना राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून अर्थसहाय्य मिळत असल्याचं त्यांनी सांगितले. तसेच लाडकी बहीण योजनेतून लाभार्थी महिलांना महिन्याला १५०० रुपये दिले जातात. आम्हाला २.५ कोटी महिलांपर्यंत हा लाभ पोहचवायचा आहे. आमचं सरकार हे सर्वसामान्यांसाठी आहे. महायुती सरकार राज्यात विकास आणि लोककल्याणकारी योजना यात समतोल साधत आहे.

आमच्या सरकारचं मुंबईला झोपडपट्टीमुक्त बनवून सर्वांना परवडणाऱ्या किंमतीत घरे देण्याचं उद्दिष्टे आहे असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. महायुती असो वा महाविकास आघाडीत यांच्यात जागावाटप अद्याप निश्चित झालं नाही. माहितीनुसार, भाजपा आगामी विधानसभा निवडणुकीत १४०-१५० जागा लढवण्याची तयारी करत आहे तर शिंदेंच्या शिवसेनेने स्ट्राईक रेटचा हवाला देत १०० हून अधिक जागा मागितल्या आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ६० हून अधिक जागा लढवणार असल्याचे म्हटले आहे.



### १० लाख युवकांना रोजगार देणार - मुख्यमंत्री



● कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून राज्यातील दीड लाख युवकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. या युवकांना ६ ते १० हजारांपर्यंत स्टायपेंड दिली जाते. यात १० लाख युवकांचा समावेश करण्याचं आमचं लक्ष्य आहे असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

## पुण्यातून धावली 'वंदे भारत'



वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेन ही भारताची शान- उपमुख्यमंत्री फडणवीस

**पुणे :** वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेन ही भारताची शान असून विकसित देशातील प्रवाशांना ज्या प्रकारच्या प्रवासाच्या सुविधा मिळतात त्या सर्व सुविधा भारतीयांना या ट्रेनमधून मिळत आहेत, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माध्यम प्रतिनिधींशी बोलताना म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणाली पद्धतीने हिरवा झेंडा दाखवून पुणे- हुबळी वंदे भारत एक्स्प्रेस रेल्वेसेवेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पुणे रेल्वे स्थानक येथे आयोजित कार्यक्रमानंतर ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत

» पान ७ वर

## » At a Glance

### तवंदी घाटात कंटेनरची वाहनांना धडक; ३ ठार

**कोल्हापूर :** राज्यात अपघाताचे सत्र सुरूच आहे. धुळे येथील अपघातात पाच जण ठार झाल्याची घटना ताजी असतांना कोल्हापुरात पुन्हा भीषण अपघात झाला आहे. रात्रीच्या सुमारास कोल्हापुरच्या निपाणी जवळील तवंदी घाटात हा भीषण अपघात झाला असून एका भरधाव कंटेनरने ७ ते ८ वाहनांना धडक दिली. या अपघातात ३ जण जागीच ठार झाले

### आता 'नमो भारत रॅपिड रेल'

**नवी दिल्ली :** : वंदे भारत मेट्रो ट्रेनच्या चाचण्या आता पूर्ण झाल्या असून, पहिली वंदे भारत मेट्रो ट्रेन देशाच्या सेवेत येण्यास सज्ज झाली आहे. पहिला मान याचा गुजरातला मिळाला आहे. दरम्यान, आता वंदे भारत मेट्रोचं नाव बदललं आहे. रेल्वेने आता वंदे भारत मेट्रोचे नाव बदलून 'नमो भारत रॅपिड रेल' असे केले आहे.

### २१ सप्टेंबरपासून मुसळधार पाऊस

**मुंबई :** महाराष्ट्रात २१ सप्टेंबरपासून पुन्हा मुसळधार पावसाची शक्यता हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी वर्तवली आहे. येत्या चार पाच दिवसांपर्यंत राज्यात हवामान कोरडे राहील, मात्र २१ सप्टेंबरपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे, तो सप्टेंबरच्या शेवटपर्यंत कायम राहील.विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा तसेच कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर अधिक असेल.

## कोंढव्यात भररस्त्यावर घडला प्रकार

# पुणे पुन्हा हादरले



### वाळू व्यावसायिकावर गोळ्या झाडल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेश विसर्जनाच्या तोंडावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेने पुणे पुन्हा एकदा हादरले आहे.शहरामध्ये गणपती उत्सवाची धामधूम सुरू असतानाच वाळू व्यवसायिकावर गोळीबार झाल्याने शहरात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडली आहे. हा हल्ला पूर्व वैमन्यासातून झाला असल्याच प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

पुण्यातील कोंढवा परिसरातील साळवे नगर येथे वाळू व्यावसायिकावर एकच्या सुमारास गोळीबार करण्यात आला. हा हल्ला पूर्व वैमानस्यातून हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलीप गायकवाड असे वाळू सप्लाय करणाऱ्या व्यावसायिकाचे नाव आहे. कोंढव्यातील साळवे गार्डन समोर गोळीबााराची घटना घडली आहे. गायकवाड यांच्या गाडीवर आलेल्या अज्ञात तरुणांनी वरती दोन ते तीन गोळ्या झाडल्या आहेत. तरुणांची ओळख पटवण्याचं काम पोलिसांकडून करण्यात येत असून यामध्ये पोलिसांना यश आल्याचे देखील सांगण्यात येत आहे. घटनास्थळावरून पोलिसांनी दोघांना ताब्यात देखील घेतला आहे. दिलीप गायकवाड गोळीबारात जखमी झालेल्या वाळू व्यवसायिकाला जवळच्या रुग्णालयात दाखल झाल्या असून त्याची परिस्थिती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. कोंढवा पोलीस घटनास्थळी पोहोचले असून तपास सुरू आहे. पुणे शहरातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर गेले काही दिवसांपासून पुणे शहरांमधील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी

» पान ७ वर

## प्राथमिक शाळा 25 सप्टें.रोजी बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नवीन धोरणानुसार 20 किंवा त्यापेक्षा कमी पट असलेल्या शाळांवर केवळ एकच कायम शिक्षक दिला जाणार असून त्यासोबत सेवानिवृत्त शिक्षकाची कंत्राटी पदधतीने नेमणूक केली जाणार आहे. शिक्षक संचमान्यतेचा 15 मार्च 2024 चा व कंत्राटी शिक्षक भरतीचा 5 सप्टेंबर 2024 चा शासन निर्णय वाडीवस्तीवरील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने दोन्ही शासन निर्णय रद्द करावेत या मागणीसाठी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा 25 सप्टेंबर रोजी बंद ठेवून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय पुणे येथे नुकत्याच झालेल्या राज्यात सुधारीत शिक्षक संच मान्यता आणि कंत्राटी शिक्षक भरतीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली.

# ससूनमधील आणखी एक घोटाळा उघडकीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** सतत वादात असणाऱ्या ससून सर्वोपचार रुग्णालयातील आणखी एक घोटाळा उघडकीस आला आहे. ससूनच्या कर्मचाऱ्यांनीच चार कोटी १८ लाख ६२ हजार रुपयांचा अपहार केला .या प्रकरणी ससून रुग्णालयाचे अकाउंटंट अनिल माने आणि रोखपाल सुलक्षणा चाबुकस्वार यांच्यासह अन्य २३ सरकारी आणि खासगी कर्मचाऱ्यांविरुद्ध बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ससूनचे प्रशासकीय अधिकारी गोरोबा आवटे यांनी फिर्याद दिली आहे. ससून रुग्णालयाच्या शासकीय नोंदवहीत आर्थिक तफावत असल्याची बाब समोर आली होती. याबाबत चौकशी समिती नेमण्यात आली.

» भ्रष्टाचार

वैद्यकीय संचालनालयाच्या स्तरावर चौकशी करण्यात आली. माने आणि चाबुकस्वार यांना सह्यांचे अधिकार दिले होते. त्याचा गैरवापर करून अधिष्ठाता यांची मान्यता नसताना अकाउंटंट आणि रोखपाल यांनी ससूनच्या बँक खात्यातून स्वतःच्या आणि इतर कर्मचाऱ्यांच्या खात्यात चार कोटी १८ लाख ६२ हजार रुपये जमा केले. तसेच, आर्थिक अपहार करून फसवणूक केली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

## धनगर आरक्षण; शंभूराज देसाईंची माहिती

# सरकारचे सकारात्मक पाऊल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण मिळावे यासाठी सकारात्मक पावले उचलली जाणार आहे. ही सर्व प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत टिकणारी असावी आणि यात अन्य कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही, असे प्रयत्न केले जाणार आहे. धनगड व धनगर एकच असून या बाबतचा जीआर लवकरच काढण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याची माहिती शंभूराज देसाई यांनी दिली. पंढरपूर येथे धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकल धनगर जमात समन्वय समितीच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपोषणकर्त्या आंदोलकांशी दुरध्वनीवरुन संपर्क साधला व त्यांची विचारपूस देखील केली. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत वरील निर्णय घेण्यात आला. धनगर आरक्षणासाठी समिती स्थापन करण्याचा महत्वाचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे आंदोलक त्यांचे उपोषण मागे घेणार आहेत.

### काय म्हणाले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ?

● या बाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे ही मागणी खूप वर्षे प्रलंबित आहे. याची अंमलबजावणी करण्यासाठी कायद्याच्या विहीत पद्धतीचा अवलंब करावा लागणार आहे. त्यासाठी सचिव स्तरावर तातडीने पाठपुरावा करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. यात राज्याचे महाधिवक्ता, विधी व न्याय विभाग यांचा सल्ला घेतला जाईल. तसेक आदिवासी विकास विभागासह संबंधित अन्य विभागांचे सचिव तसेच समन्वय समितीच्या सदस्यांचा सक्रिय सहभाग घेऊन अन्य मागण्यांबाबत तातडीने कार्यवाही केली जाईल.

» पान ७ वर

## दर्शन बाप्पाचे !

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे:** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट येथे भेट देऊन बाप्पांचे दर्शन घेतले यावेळी उद्योजक पुनीत बालन यांनी त्यांचा यथोचित सन्मान केला.

## जरांगेंचे उपोषण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराटी येथून वर्षभरापुर्वी आंदोलनाला सुरवात करणारे मनोज जरांगे पाटील मध्यरात्रीपासून सहाव्यांदा उपोषणाला बसणार आहेत. आधीच्या पाच उपोषणातून काय साध्य झाले? समाजाच्या पदरात काय पडले ? असे विचारणाऱ्यांना जरांगे पाटील यांनी वेळोवेळी उत्तरे दिली आहेत. पण मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण, सगेसोयरेचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाकडे सरकारने दुर्लक्ष केले असा आरोप केला जातो, त्याचा परिणाम लोकसभा निवडणुकीत महायुतीला मराठवाडा आणि महाराष्ट्रात भोगावा लागला. मनोज जरांगे पाटील यांनी यापुर्वी पाच वेळा उपोषण केले, सरकारने आश्वासने, शब्द, अद्यादेश, परिपत्रके काढून वेळ

» पान ७ वर

## विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विकास कामे मंजूर

# सत्ताधारी आमदारांना निधीची खैरात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सुमारे साडेचारशे ते पाचशे कोटी रुपयांची कामे मंजूर केली आहेत. या कामांच्या प्रशासकीय मान्यता आचारसंहितेपूर्वी होऊ शकतात. मात्र, खूप कार्यारंभ आदेश होणे अवघड आहे. जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) निधीमधून एकूण आराखड्याच्या 300 कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे कामे आणि निधीवाटप करण्यात आले आहे.

या यादीवर जिल्ह्यातील सत्ताधारी आमदारांच्या पारड्यात 70 ते 80 टक्के हिस्सा टाकण्यात आला आहे. 1256 कोटी रुपयांच्या आराखड्याचे दोन टप्पे करण्यात आले असून, दुसरा टप्पा नेमका कधी होणार, हे मात्र गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे.त्याचबरोबर निमंत्रित, विशेष निमंत्रित 30 सदस्य आहेत. त्याचबरोबर जिल्ह्यातील विधानसभेचे 21 आणि विधान परिषदेचे चार आमदार आहेत. याशिवाय चार खासदार आणि राज्यसभा सदस्यांनादेखील निधीवाटपामध्ये स्थान देण्यात आले आहे. असे असले तरी प्रत्यक्षात सत्ताधारी ग्रामीण क्षेत्रातील आमदारांना जादा निधी देण्यात आला आहे. जिल्हा नियोजन समितीचा सन 2024-25 या वर्षासाठी पुणे जिल्ह्याचा 1256 कोटी रुपयांचा सर्वसाधारण आराखडा आहे. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात तीनशे कोटी रुपयांच्या मंजूर कामांमध्ये ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी 175 कोटी रुपये, नागरी सुविधांसाठी 35 कोटी 33 लाख रुपये, ग्रामीण रस्त्यांसाठी तीस कोटी रुपये, इतर जिल्हा मार्गांसाठी दहा कोटी रुपये, शाळाइमारती, अंगणवाड्या दुरुस्तीसाठी 18 कोटी रुपयांची तरतूद यामध्ये आहे.




## राहुल यांची जीभ कापणाऱ्यास ११ लाख - गायकवाड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्याला ११ लाख रुपयांची ऑफर दिल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. आरक्षण व्यवस्था रद्द करण्याबाबत राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्यावर टीका करताना गायकवाड यांनी हे वक्तव्य केले. परदेशात असताना राहुल गांधी म्हणाले होते की, त्यांना भारतातील आरक्षण व्यवस्था संपवायची आहे.

» पान ७ वर

# राज्याला गृहमंत्री आहेत कि नाही- आदित्य ठाकरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात गुन्हेगारीचे अनेक प्रकार घडताहेत, पण कोणावरही कसलीही कारवाई होत नाही. राज्याला गृहमंत्री आहेत की नाही अशी स्थिती असल्याची टीका माजी मंत्री शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली. ठाकरे यांनी सोमवारी पुण्यातील मानाच्या तसेच महत्वाच्या गणेश मंडळांना भेट देत आरती केली. आनंदाश्रमात ठाण्यामध्ये जे काही झाले तेच ते बाहेरही करत असतात. आनंदाश्रमात झाले ते वाईट झाले. तिथे केलेली कारवाई ही तोंडदेखली कारवाई आहे. कोणावरही कसलीही कारवाई करायची नाही असेच त्यांचे धोरण आहे. प्रश्न विचारणाऱ्या महिला पत्रकाराला अवमानकारक बोलणाऱ्या व्यक्तीवर कारवाई केली का? पुण्यात आज ते आहे म्हणतात, तर आजच जिल्ह्यात तीन ठिकाणी गोळीबार झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळेच या राज्याला गृहमंत्री आहेत का असा प्रश्न पडतो. विधानसभा निवडणुकीसाठी आम्हाला विचारले जाते, मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण? त्याचा निर्णय होईल, पण महायुती गद्दारीचा, भ्रष्टाचाराचा चेहरा घेऊन निवडणुकीला सामोरी जात आहे.

» पान ७ वर

# मंडईतून सकाळी साडेदहाला विसर्जन मिरवणुकीला सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी मानाच्या गणपती मंडळांसह शहरातील सर्वच मंडळांनी जय्यत तयारी सुरू केली आहे.फुलांची आरास तसेच दिव्यांची आकर्षक रोषणाई, सामाजिक संदेश देणारे विसर्जन रथ साकारण्यासाठी मंडळांच्या कार्यकर्त्यांनी धडपड सुरू झाली आहे. याखेरीज, बँण्ड, ध्वज, लेझीम, टिपरी तसेच ढोल-ताशा पथकेही गणरायाच्या विसर्जन मिरवणुकांसाठी सज्ज झाले आहेत.महात्मा फुले मंडईतून उद्या सकाळी साडेदहाला मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. पुण्याची वैभवशाली परंपरा असलेल्या व जगाच्या कानाकोपऱ्यातून पाहिल्या जाणाऱ्या पुण्याच्या गणेशोत्सवाची सांगता आज होत आहे.


श्री उमांगमलज रथ

## कसबा गणपती मंडळ

**सुरुवात : सकाळी १० वाजून ३० मिनिटे**

महात्मा फुले मंडईतील टिळक पुतळा येथून मुख्य विसर्जन मिरवणुकीला सकाळी दहा वाजून तीस मिनिटांनी प्रारंभ होईल. उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते श्रींची आरती होईल. मिरवणुकीत नगारखाना, रमणबाग, कामयानी, परशुराम, रुद्रगर्जना, प्रभात बँडचे वादन होईल.

## तांबडी जोगेश्वरी:

**मिरवणुकीत सहभाग : सकाळी १० वाजून ३० मिनिटे**

जोगेश्वरी चौकातील मांडवातून पारंपरिक पद्धतीने श्रींचे पालखीत विराजमान होऊन सकाळी 9 वाजता प्रस्थान होईल. त्यानंतर सकाळी 10 वाजून 30 मिनिटांनी महात्मा फुले मंडईतील टिळक पुतळा येथून मुख्य विसर्जन मिरवणुकीत सहभागी होईल. मिरवणुकीत सतीश आढाव यांचे नगारा वादन, न्यू गंधर्व ब-ास बँड, समर्थ प्रतिष्ठान, शिवमुद्रा व ताल ढोल-ताशा पथकांचे वादन होणार आहे. या वेळी विष्णूनादचे कार्यकर्ते पालखी पुढे शंख नाद करणार आहेत. अशी असेल पालखी : पारंपरिक पद्धतीच्या चांदीच्या पालखीत श्रींची मूर्ती विराजमान होणार आहे. अब्दागिरी, मानचिन्हांसह पालखी कार्यकर्ते स्वतः आपल्या खांद्यावरून वाहून मिरवणुकीमध्ये सहभागी होतील.

## श्री केसरीवाडा मंडळ

**मिरवणुकीत सहभाग : सकाळी १० वाजून ३० मिनिटे**

महात्मा फुले मंडईतील लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून केसरीवाडा गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. मिरवणुकीत श्रीराम, शिवमुद्रा, आवर्तन ढोल-ताशा पथक तसेच बिडवे बंधूंचा सनई-चौघडा असणार आहे. इतिहास तज्ज्ञ मोहन शेटे हे लोकमान्यांच्या वेशभूषेत मिरवणुकीत सहभागी होतील.

## आदिशक्ती' रथातून निघणार शारदा गजानन

**मिरवणुकीत सहभाग : सायंकाळी ७ वाजता**

अखिल मंडई मंडळाची विसर्जन मिरवणूक 'आदिशक्ती' रथातून सायंकाळी सात वाजता निघणार आहे. मिरवणुकीच्या अग्रभागी जयंत नगरकर बंधू यांचे नगारावादन त्यामागे गंधर्व बँड तसेच शिवगर्जना आणि शिवमुद्रा वाद्य पथकाचे वादन मिरवणुकीत होणार आहे. कलादिग्दर्शक विशाल ताजणेकर आणि सहकाऱ्यांनी रथ साकारला आहे. आदिशक्ती रथावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. असा असेल रथ : रौद्र रूपातील कालीमातेची 15 फूट उंचीची मूर्ती यामध्ये असेल. दरवर्षी मिरवणुकीत श्रीशारदा गजाननाचे फक्त समोरूनच दर्शन घेता येते. त्यामुळे यंदा प्रथमच श्रीशारदा गणपतीची मूर्ती 60 अंशांत फिरणार असून, दोन्ही बाजूने भाविकांना दर्शन घेता येणार आहे. रथाची उंची कमी करण्यासाठी हायड्रोलिक तंत्रज्ञानाचादेखील वापर करण्यात आले आहे. रथाचा आकार 14 बाय 18 आणि उंची 27 फूट आहे. मेट्रोच्या लकडीपूल येथील पुलामुळे हायड्रोलिक तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे.

## श्रीमंत दगडूशेठ गणपती

**मिरवणुकीत सहभाग : दुपारी ४ वाजता**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीसाठी जटोली शिवमंदिराच्या विषयाप्रमाणे कलादिग्दर्शक विराज खटावकर यांनी श्री उमांगमलज रथ साकारण्यात आला आहे. मिरवणुकीत रुग्णसेवा रथ अग्रभागी असणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदा सामाजिक विषयांतर्गत आरोग्यविषयक जनजागृती रथावरून केली जाणार आहे. याखेरीज मिरवणुकीत प्रभात ब-ास बँड, दरबार ब-ास बँड, स्वरूपवर्धिनीचे ढोल-ताशा पथक, सनई-चौघडा असा लवाजमा असणार आहे. तर, दुपारी 4 च्या दरम्यान श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पा विसर्जन मिरवणुकीत लक्ष्मी रस्त्याने सहभागी होईल.

**असा असेल रथ :** आकर्षक विद्युत रोषणाई केलेल्या या रथाच्या माथ्यावर जटा सोडलेली श्रीशंकराची मूर्ती असणार आहे. त्याच्या बाजूला त्रिशूळ आणि डमरूदेखील आहे. कळस म्हणून मोठा रुद्राक्ष दाखविण्यात आला आहे. नागाच्या फण्यावर हा तोललेला आहे.

## श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट

**मिरवणुकीत सहभाग : रात्री ८ वाजता**

विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी सकाळी सात वाजून 30 मिनिटांनी अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या हस्ते अनंत चतुर्दशी पूजा होणार आहे. त्यानंतर सकाळी आठ वाजून 30 मिनिटांनी रथ वरद विघ्नेश्वर वाडा येथून मिरवणुकीसाठी प्रस्थान करेल. त्यानंतर रात्री आठ वाजता टिळक पुतळा येथून मुख्य मिरवणुकीला प्रारंभ होईल.

---

राष्ट्रसंचार गणेशोत्सव रा

# 'मयूरपंख रथा'तून निघणार बाप्पाची विसर्जन मिरवणूक

**'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्ट' गणपतीच्या मिरवणुकीला रा. आठ वाजता होणार प्रारंभ**

**पुणे :** हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती असलेल्या 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'च्या बाप्पाची विसर्जन मिरवणूक दरवर्षीप्रमाणे यंदाही आकर्षक विद्युत रोषणाईने सजवलेल्या मयूरपंख रथामधून निघणार आहे.



मंगळवारी रात्री आठ वाजता टिळक पुतळा येथून या विसर्जन मिरवणुकीला सुरवात होईल, अशी माहिती ट्रस्टचे विश्वस्त आणि उत्सव प्रमुख पुनीत बालन यांनी दिली.

'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती'च्या मिरवणुकीबाबत माहिती देताना उत्सवप्रमुख पुनीत बालन म्हणाले, "दरवर्षीप्रमाणे यंदाही बाप्पाची विसर्जन मिरवणूक लक्षवेधक अशीच असेल. आचार्य स्वामी गोविंद गिरी महाराज यांच्या हस्ते सकाळी साडेसात वाजता अनंत चतुर्दशीची पूजा होईल. त्यानंतर साडेआठ वाजता वरद विघ्नेश्वर वाडा येथून बाप्पाचा 'मयुरपंखी रथ' विसर्जन मिरवणुकीसाठी मंडईतील टिळक पुतळ्याकडे मार्गस्थ होईल. दिवसभरात मानाच्या गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर रात्री आठ वाजता श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टच्या बाप्पाच्या वैभवशाली मिरवणुकीला सुरुवात होईल. या मिरवणुकीसाठी आकर्षक विद्युत रोषणाईने मयूरपंख रथ सजविण्यात आला असून या रथासमोर पारंपरिक पद्धतीने ढोल-ताशा पथके जोरदार वादन करणार आहेत. श्रीराम, शिवमुद्रा आणि समर्थ या ढोल ताशा पथकांबरोबरच मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक होणार आहेत. " वेळेत विसर्जन मिरवणूक संपविण्याचा आमचा प्रयत्न असेल असेही बालन यांनी सांगितले.

> पुण्यातील बाप्पाची विसर्जन मिरवणूक हे जगभरातील गणेश भक्तांचे प्रमुख आकर्षण असते. त्यामुळे ती मिरवणूक देखणी, आकर्षक आणि दिमाखदार कशा प्रकारे होईल, असा सर्वच गणेश मंडळांचा प्रयत्न असतो. आमचाही असाच प्रयत्न राहणार आहे. अधिकाधिक गणेश भक्तांनी या विसर्जन मिरवणुकीत सहभागी होऊन आनंद घ्यावा आणि बाप्पाला भक्तीभावाने निरोप द्यावा."
>
> **- पुनीत बालन,** विश्वस्त व उत्सवप्रमुख, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट

# लोणीच्या एमआयटीने पटकावला 'पुणे फेस्टिव्हल करंडक



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ३६व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये 'व्हॉईस ऑफ पुणे फेस्टिव्हल' स्पर्धेत हर्षाली कालेकर मानकरी ठरल्या आणि 'पुणे फेस्टिव्हल करंडक' एम.आय.टी. कॉलेज, लोणीने जिंकला. बालगंधर्व रंगमंदिरात रविवार, दि. १५ सप्टेंबर रोजी झालेल्या या स्पर्धेला युवकांनी प्रचंड गर्दी केली होती. अनुराधा भारती यांनी पुणे फेस्टिव्हल करिता याचे संयोजन केले होते.

व्हॉईस ऑफ पुणे फेस्टिव्हल स्पर्धेत ४० वर्षा खालील महिला व पुरुष आणि ४० वर्षा वरील महिला व पुरुष अशा ४ गटात १५० हून अधिक स्पर्धकांनी या गायन स्पर्धेत सहभाग घेतला होते. त्यापैकी २८ स्पर्धक अंतिम फेरीसाठी निवडले गेले. या स्पर्धेत ४० वर्षाखालील महिला गटात हर्षाली कालेकर आणि स्नेहा केळकर आणि 40 वर्षाखालील पुरुष गटात यश निरालगी आणि प्रसाद उलांडे यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवले. 40 वर्षावरील महिला गटात प्रीती वते आणि स्नेहा अभ्यंकर आणि 40 वर्षावरील पुरुष गटामध्ये उल्हास भानू आणि दिलीप नाज़रे यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवले.

पुणे फेस्टिव्हल करंडक स्पर्धेत १० महाविद्यालयांनी भाग घेतला होता. त्यातील अंतिम फेरीसाठी ३ महाविद्यालयांची निवड झाली. त्यामध्ये लोणी येथील एम.आय.टी. कॉलेजने हा करंडक पटकावला.

अंतिम फेरीत, डुएट ग्रुप मध्ये उन्मेष नाईक आणि स्नेहा केळकरने प्रथम पुरस्कार जिंकला, तर रूपलेखा हेगडे आणि नितीन कुलकर्णी यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.



> **कलेप्रती योगदानाचे हे यश**
>
> एमआयटी एडिटी मध्ये केवळ अभ्यास नाही तर कलेबाबत डिव्होटेड जीवनशैली आत्मसात केली जाते . कलेप्रती विद्यार्थ्यांचे योगदान , सचोटी आणि नेमके मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी हे यश खेचून आणले, याचा सार्थ अभिमान आहे."
>
> **— डॉ. मंगेश कराड**

# बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीत घुमणार 'अयोध्यापती ताल'



**पुणे :** अयोध्यापती प्रभू रामचंद्र यांचे 'रामजी की निकली सवारी' आणि 'भारत का बच्चा बच्चा' या गीतांवर आधारित नवीन ठेका यंदा विसर्जन मिरवणुकीत घुमणार आहे. तालवादनाने याचा प्रारंभ नुकताच झाला. मानाचा दुसरा गणपती श्री तांबडी जोगेश्वरी येथे उत्सवमंडपात या नवीन तालाचे वादन झाले. समर्थ प्रतिष्ठानच्या रौप्य महोत्सवी (२५) वर्षाचे औचित्य साधत हिंदी दिनानिमित्त हिंदी भाषिक उत्तर प्रदेशातील गीतांवर आधारित हा नवीन ताल रचण्यात आला आहे. यावेळी 'भगवाधारी' या पथकाच्या नवीन नाम फलकाचे उद्घाटन देखील करण्यात आले. श्री तांबडी जोगेश्वरी गणपती मंडळाचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, खजिनदार प्रशांत टीकार, विश्वास नेऊरगावकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सातपुते यांच्या संकल्पनेतून हा ताल बसवण्यात आला आहे.

# गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी महावितरणची यंत्रणा सज्ज

**पुणे :** लक्ष्मी रस्ता आणि टिळक रस्त्यावरील विसर्जन मिरवणुकीसाठी मोदी गणपती परिसरात तात्पुरता नियंत्रण कक्ष सुरू करण्यात येणार आहे. या ठिकाणी अभियंते व कर्मचाऱ्यांची विशेष नियुक्ती करण्यात येत आहे, अशी माहिती मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी दिली आहे.पुणेकरांच्या सर्वाधिक उत्साहाच्या व आनंदाच्या गणेशोत्सवामध्ये मंडळांनी उभारलेले देखावे, विद्युत रोषणाई पाहण्यासाठी भाविकांची गर्दी वाढली आहे. या उत्सवात सुरळीत वीजपुरवठा व वीज सुरक्षेसाठी महावितरणची पुणे परिमंडल अंतर्गत यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

# गुडविलतर्फे खा. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते शाळा व विद्यार्थ्यांना संगणक भेट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गरजू विद्यार्थ्यांची संगणका विषयी गोडी वाढावी आणि विद्यार्थी दशेतच तो आधुनिक जगाशी त्याचा संबंध जोडला जावा म्हणून गुडविलने खासदार मेधा कुलकर्णी यांचे हस्ते 15 संगणक शिवणे, कोपरे, जे पी नगर, नऱ्हे , वारजे, कोंढवे धावडे, गोद्रे (जुन्नर), येथील जिल्हा परिषद शाळा, पालकर शाळा कर्वेनगर, कृषी औद्योगिक विद्यालय चांबळी या शाळांना व गरजू विद्यार्थ्यांना भेट दिले.

याप्रसंगी गुडविल इंडियाने खा. मेधा कुलकर्णी यांनी आत्तापर्यंतच्या नगरसेवक व आमदारकीच्या काळात केलेल्या उल्लेखनीय कामाबद्दल सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून युनिव्हर्सल कंपनीचे श्री रोहिदास मोरे,विश्राम कुलकर्णी, सुनील शिंदे, गिरीश दांगट, विवेक विप्रदास,आशिष खैरे, अरुण दांगट, सुभाष नाणेकर, प्रसाद घारे, प्रशांत व्यास, कोपरे गावचे ग्रामस्थ, तसेच गुडविलचे कालिदास मोरे, अनिश मोरे, संपदा अलाटे, स्वप्निल माळी आणि महेश कुलकर्णी उपस्थित होते

मेधा कुलकर्णी यांनी त्यांच्या भाषणात महिलांबाबत बोलताना म्हणाल्या स्त्री ही आधीपासूनच सक्षम आहे. तीला पुरुषांनी विरोध करण्याऐवजी पाठिंबा व प्रोत्साहन देऊन अधिक सक्षम केले पाहिजे. संस्थेबद्दल बोलतांना त्या म्हणाल्या "गुडविलने सामाजिक दायित्वाची भूमिका गेले 13 वर्ष सक्षमपणे निभावलेली आहे" त्यांनी संस्थेच्या चारही सामाजिक उपक्रमांचे मनापासून कौतुक केले.

# ३६व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये महान कलाकारांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'सत्यम शिवम सुंदरम', 'वक़्त ने किया क्या हसी सीतम', 'किसीकी मुस्कुराहटों पे हो निसार', 'ये गलियाँ ये चौबारा', 'लग जा गले', 'सिमटी सी' अशा अनेक सुमधुर गाण्यांनी बहरलेला 'लिजंट्स ऑफ बॉलीवूड' हा पुणे फेस्टिव्हल अंतर्गत बालगंधर्व रंगमंदिरात सादर झालेला कार्यक्रम रसिक प्रेक्षकांच्या कायम लक्षात राहिला. ज्येष्ठ पार्श्व गायक मोहम्मद रफी, ज्येष्ठ संगीतकार मदन मोहन आणि ज्येष्ठ अभिनेते राज कपूर व गुरुदत्त यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त या संगीत व नृत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महक पुणे संस्थेच्या प्रख्यात गायिका मनीषा निश्चल आणि पायलवृंद संस्थेच्या निकिता मोघे यांनी या कार्यक्रम सादर केला. याची निर्मिती मनीषा निश्चल यांनी केली असून गायक मनीषा निश्चल आणि मकरंद पाटणकर होते. पायलवृंद संस्थेच्या कलाकार नमितो नवले, पूजा खिवंसरा, वैष्णवी मंधलकर, मानसी देवकुळे, गौरव डोंगरे, अजय कणसे आणि अनिकेत सुतार यांनी गाण्यांवर आधारित नृत्य सादर केली. या संपूर्ण कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण निवेदन मनिष गोखले यांनी केले. अमान सय्यद, अमोल कांगारे, नितिन शिंदे, अभिजीत भदे आणि मास्टर मोहनिश यांनी वाद्यसंगत केली. येतील अनेक गाण्यांना प्रेक्षकांने वन्समोअर दिले. पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य समन्वयक ॲड. अभय छाजेड आणि मोहन टिल्लू यांनी कलाकारांचे सत्कार केले.

३६व्या 'पुणे फेस्टिव्हल'चे महाराष्ट्र पर्यटन विभागाचे पर्यटन संचालनालय आणि कोहिनूर ग्रुप हे मुख्य प्रायोजक असून, पंचशील, सुमा शिल्प लि.,भारत फोर्ज आणि नॅशनल एग्ज को-ऑर्डिनेशन कमिटी हे सहप्रायोजक आहेत. डॉ. डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी, बढेकर ग्रुप,अहुरा बिल्डर्स आणि सिंहगड इन्स्टिट्यूट हे उपप्रायोजक आहेत.



# आता झाडाची छाटणी केल्यास ५० हजार दंड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता झाडाची छाटणी केली किंवा साल काढल्यास ५० हजार रुपयांचा दंड होणार आहे. सूत्रांच्या म्हणण्यानुसार, राज्यात लागू असलेल्या वृक्षतोड नियंत्रण कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे.राज्य शासनाने ग्रामीण भागातील झाडांबाबत कडक नियम लागू केला आहे.



महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत नियमन कायदा १९६४' मध्ये सुधारणा करण्यासाठी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी ५ सप्टेंबर २०२४ रोजी एक अध्यादेश जारी केला आहे. त्यानुसार आता झाडे तोडण्याची व्याख्यादेखील विस्तारीत केली आहे. झाड मारून टाकण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी झाड जाळणे किंवा कापणे किंवा छाटण्याची कृती केल्यास कायद्याचा भंग होईल.

तसेच झाडाच्या बुंध्याभोवतालची साल कोरल्यास (गर्डलिंग) किंवा झाडाची साल काढल्यास ही कृती वृक्षतोड म्हणून गृहीत धरली जाईल. अशी कृती करणारी व्यक्ती ५० हजार रुपयांच्या दंडास पात्र असेल.

वृक्षतोडीसंदर्भात कायद्यात दिलेली कोणतीही गैरकृती केल्यास वृक्ष अधिकारी चौकशी करेल. संबंधित व्यक्तीला बाजू मांडण्याची संधी देईल आणि त्यानंतर दंड करेल, असे अध्यादेशात नमूद करण्यात आले आहे.

वृक्षतोडीला पूर्वी केवळ एक हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा होती. १९६४ पासून या दंडात कोणतीही वाढ केली नव्हती. त्यामुळे वृक्षतोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.


#रा

# श्रीं चे विसर्जन करा दुपारनंतर


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उद्या मंगळवारी अनंत चतुर्दशी आहे.या दिवशी चतुर्दशी तिथी दुपारी पावणेबारा वाजताच संपत असली तरीही त्यानंतरही श्री गणेशमूर्तीचे विसर्जन करता येईल, अशी माहिती दाते पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिली. पुढच्या वर्षी गणपती बाप्पांचे आगमन लवकर म्हणजे २७ ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहे.

मंगळवारी अनंत चतुर्दशीला बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला जाणार आहे. अनंत चतुर्दशीला गणेश चतुर्थीच्या दिवशी प्रतिष्ठापना केलेल्या श्री गणेशमूर्तींचे विसर्जन होणे आवश्यक आहे आणि ते पाण्यामध्ये करावे, असे धर्मशास्त्र सांगते. वाहत्या पाण्यामध्ये विसर्जन करावे, असे नसून पाण्यात विसर्जन करावे, असे आहे. त्यामुळे तलावात किंवा स्वतंत्र टँकमध्ये, घरी मोठ्या बादलीमधील पाण्यातसुद्धा विसर्जन करता येते. विसर्जनानंतर ती मूर्ती पाण्यात विरघळणे आवश्यक आहे, असेही दाते यांनी सांगितले.



# शरद पवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र



**पुणे :** राज्यात स्पर्धा परीक्षा देणारा विद्यार्थी वर्ग हा मोठ्या प्रमाणावर आहे. स्पर्धा परीक्षेत होणारा विलंब, त्यातून विद्यार्थ्यांमध्ये झालेला असंतोष यात मार्ग काढणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांमधील असंतोष आणि काही दिवसापूर्वी झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या रास्त मागण्या पूर्ण होण्यासाठी तसेच स्पर्धा परीक्षा लवकरात लवकर घेण्याकरिता राज्याचे माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून भेटीची मागणी केली," अशी माहिती शरद पवार यांनी सोशल मीडियाद्वारे दिली आहे.

शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे की, "महाराष्ट्र राज्यात ३२ लाखाहून अधिक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. मोठ्या जिद्दीने आणि चिकाटीने अहोरात्र अभ्यास करणाऱ्या या विद्यार्थ्यांची भरती प्रक्रिया वेळेवर व्हावी तसेच वेळेवर नियुक्त्या मिळाव्यात हीच एकमात्र अपेक्षा असते. परंतु सद्यस्थितीत रखडलेल्या नियुक्त्या, अनेक परीक्षांच्या प्रलंबित असलेल्या जाहिराती, परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यास होत असलेला विलंब यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठा असंतोष आहे."

दरम्यान, शरद पवार यांनी या पत्रातून विद्यार्थ्यांच्या मागण्याही मांडल्या आहेत. त्यांनी म्हटलं आहे की, "विद्यार्थ्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. ऑगस्ट २०२४ मध्ये नियोजित असलेल्या राज्यसेवा परीक्षेच्या दिवशी IBPS परीक्षा येत असल्याने राज्य सेवा परीक्षा पुढे ढकलावी तसेच राज्यसेवेच्या परीक्षेत कृषीच्या २५८ जागांचा समावेश करावा या मागण्यांसाठी पुणे येथे स्पर्धा परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले असता आयोगाने परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला होता. परंतु परीक्षा पुढे ढकलत असताना परीक्षा नेमकी कधी घेण्यात येईल याबाबत तसेच कृषी सेवेच्या जागांबाबत स्पष्टीकरण आयोगाकडून देण्यात आले नव्हते. आज जवळपास तीन आठवडे उलटूनही आयोगाने परीक्षेची तारीख घोषित केलेली नाही तसेच कृषीच्या जागांसंदर्भात देखील निर्णय घेतलेला नाही. ऑक्टोबर महिन्यात आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने या संदर्भात त्वरित निर्णय घेण्यात यावा. २. संयुक्त पुर्व परिक्षा (गट-ब, गट-क) दरवर्षी एप्रिल किंवा मे महिन्यात आयोजित होते, परंतु यंदा सदरील परिक्षेसंदर्भात अद्यापही काहीही ठोस प्रक्रिया करण्यात आलेली नाही. तरी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी सदरील परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध होणे गरजेचे आहे.

तसेच सदरील परीक्षेच्या जाहिरातीत विद्यार्थ्यांना अपेक्षित असलेल्या पदांची वाढ करण्यात यावी. ३. राज्यसेवा, कृषी सेवा, पोलिस उपनिरिक्षक, विक्रीकर सहाय्यक वगैरे सरळ सेवेतील अनेक पदांवर निवड होऊन बराच कालावधी उलटूनही पात्र उमेदवारांना नियुक्त्या मिळालेल्या नाहीत तरी रखडलेल्या नियुक्त्यांचा आढावा घेऊन पात्र विद्यार्थ्यांना त्वरित नियुक्ती आदेश द्यावेत. ४. लिपिक पदांकरीता ७००० हून अधिक जागांची भरती यासह काही अन्य भरती प्रक्रिया न्यायालयीन प्रकरणांत अडकलेल्या आहेत, त्यावर त्वरित निर्णय घ्यावा. ५. राज्यात शिक्षक तसेच प्राध्यापकांच्या देखील बहुतांश जागा रिक्त असल्याने रिक्त जागांचा नव्याने आढावा घेऊन शिक्षक भरती तसेच प्राध्यापक भरतीला देखील गती द्यावी."

# शिवसेनेला किती जागा मिळतात याची उत्सुकता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी निवडणूक भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुती म्हणून लढणार आहे. ज्या मतदारसंघात ज्या पक्षाचा विद्यमान आमदार, तो मतदारसंघ त्या पक्षाला, असे प्राथमिक सूत्र निश्चित करण्यात आले आहे. वडगावशेरी आणि हडपसर विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहेत, तर कसब्यासह शिवाजीनगर, कोथरूड, पर्वती, पुणे कॅन्टोन्मेंट आणि खडकवासला या मतदारसंघांवर भाजपचा दावा आहे. शिवसेनेचा शहरात सध्या एकही आमदार नाही.

आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीमध्ये शिवसेनेला केवळ हडपसर विधानसभा मतदारसंघ मिळण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने शिवसेनेच्या आढावा बैठकीत चाचपणी करण्यात आली असून, शिवसेनेचे खासदार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे गणपतीनंतर लगेच पुणे दौरा करणार आहेत.त्यामुळे तीन जागांची आस बाळगून असलेल्या शिवसेनेला प्रत्यक्षात किती जागा मिळतात याची उत्सुकता असेल.

शिवसेनेने शहरातील हडपसर, वडगावशेरी आणि खडकवासला या तीन विधानसभा मतदारसंघ घ्यावेत, अशी मागणी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठ नेत्यांकडे केली होती. मात्र, या तीन जागांऐवजी केवळ हडपसर विधानसभा मतदारसंघ शिवसेनेच्या वाट्याला येण्याची दाट शक्यता आहे. त्या दृष्टीने शिवसेनेचे सचिव संजय मालशेकर यांनी शहरात आढावा घेतला. त्या वेळी हडपसर विधानसभा मतदारसंघात तयारी करण्याची सूचनाही त्यांनी केली. या सगळ्या समीकरणांत शिवसेनेला हडपसर विधानसभा मतदारसंघ मिळण्याची शक्यता आहे.

## अवतीभवती
CITY UPDATE

## लाडकी बहीण योजनेमुळे अन्य योजनांकडे होतेय दुर्लक्ष

**पुणे :** लाडकी बहीण'साठीच संपूर्ण शासकीय यंत्रणा कामात जुंपली आहे. तसेच निधीच्या अभावामुळे इतर योजनांच्या लाभार्थ्यांची फरफट सुरू असल्याचे चित्र आहे. याचा फटका शिष्यवृत्तीलाही बसू लागला आहे. शासनाने निराधार महिला, अनाथ बालके, एक महिला, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध शासकीय योजना सुरू केल्या आहेत. मात्र, मागील दोन महिन्यांपासून 'लाडकी बहीण' योजना सुरू झाल्याने या योजनांवर गडांतर आले आहे. विद्यार्थी देशाचे भविष्य असून, त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शासनस्तरावर विविध शिष्यकृत्ती योजना राबवल्या जात आहेत. शेतकरी, निराधार महिलांना, अनाथ बालके यांना आर्थिक हातभार लाकून सक्षमतेसाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. विविध टप्प्यावर त्यांची अंमलबजावणीदेखील सुरू होती. मात्र, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना जुलैपासून सुरू केली.

स्कातंत्र्यदिनाच्या पूर्कसंध्येपासून या योजनेचे अनुदानही महिलांच्या खात्यावर जमा होत आहे. निधीची तरतूद नसताना योजना जाहीर होताच, त्करित अंमलबजावणी व लाभ दिला गेल्याने शासनाच्या इतर योजनांसाठी निधी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे योजनांच्या अंमलबजावणीवर मर्यादा येत असल्याची चर्चा सर्कत्र सुरू आहे. परिणामी बहुतांश योजनांच्या लाभापासून लाभार्थी वंचित राहिले आहेत. विद्यार्थ्यांच्या पंजाबराव देशमुख शिष्यवृत्ती योजनेसह विविध शिष्यवृत्तींचे पैसेदेखील अद्यापि जमा झाले नाहीत, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य टांगणीला लागले आहे.

# पुण्यातील दोन जागांसाठी तब्बल ४० जण इच्छुक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरातील आठ विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीतील मित्र पक्षांकडून इच्छुकांचे अर्ज मागविण्यात आले आहेत. या आठ जागांसाठी महाविकास आघाडीतील तीनही पक्षांकडून तब्बल ८५ जण इच्छुक असल्याचे समोर आले आहे. असे असले तरी यातील निम्मे इच्छुक हे अवघ्या दोन मतदारसंघांमध्ये आहे.

या दोन मतदारसंघांमध्ये ठाकरेंची सेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून तब्बल ४० जणांनी दावा ठोकला आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला प्रचंड यश मिळालं. त्यामुळे महाविकास आघाडीतील इच्छुकांचा विश्वास द्विगुणीत झाला आहे. महाविकास आघाडीचे तिकीट म्हणजे विजयाची हमखास 'गॅरंटी' असंच काहीसे महाविकास आघाडीच्या इच्छुक नेत्यांना वाटत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. सध्याचे पुण्यातले चित्र पाहिले तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडे सर्वाधिक इच्छुक असून तब्बल ४१ जणांनी आगामी विधानसभा निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्या खालोखाल २४ जण हे काँग्रेसकडून इच्छुक आहेत. तर शिवसेना ठाकरे गटाकडून देखील वीस जणांनी आगामी विधानसभा निवडणूक लढवण्याचा चंग बांधला आहे. यामध्ये सर्वाधिक इच्छुक उमेदवार हे शिवाजीनगर आणि वडगाव शेरी या विधानसभा मतदारसंघात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात आठ इच्छुक उमेदवार आहे. उदय महाले, किशोर कांबळे श्रीकांत पाटील, निलेश निकम ,सुकेश पासलकर, अरुण शेलार, औदुंबर पाटील, आणि किसन गारगोटे यांचा समावेश आहे.

## गणपती बाप्पा मोरया

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या घरील गणपती बाप्पा. समवेत संस्थेच्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा व नातवंडे.

## चारही धरणे भरली, पुणेकरांचा वर्षभराचा पाण्याचा प्रश्न मिटला

**पुणे :** पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणक्षेत्रात गेल्या २ महिन्यांमध्ये झालेल्या जोरदार पावसामुळे चारही धरणं १०० टक्के भरली आहेत.पुणेकरांचा वर्षभराच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे मिटला आहे. कारण पुणे शहराला पाणीपुरवठा करणारी चारही धरणं पूर्ण क्षमतेने भरली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पुणेकरांची तहान भागवणाऱ्या खडकवासला धरणातून सोडण्यात येणारे पाणी रात्रीपासून पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. संपूर्ण विसर्ग हा आता बंद केला आहे. चार ही धरणात १०० टक्के पाणीसाठा असल्याने चार ही धरणातील विसर्ग बंद करण्यात आला आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनाचे टेन्शन मिटलं आहे.

पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या टेमघर, वरसगाव, पानशेत ही तीन धरणं १०० टक्के भरली आहेत. तर खडकवासला धरण ९९.१६ टक्के भरलले आहे. पुणे शहरानंतर आता जिल्ह्याला देखील पाणीपुरवठा करणारी धरणं चांगल्या क्षमतेने भरली आहेत. नीरा खोऱ्यातील पवना धरण, कासारसाई धरण, कळमोडी धरण, चासकमान धरण, भामा आसखेड धरण, आंध्रा धरण, वडिवळे धरण, शेटफळ धरण, नाझरे धरण, गुंजवणी धरण, भाटघर धरण, नीरा देवघर धरण आणि वीर धरण या धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली आहेत. या सर्व धरणांमध्ये १२५.६३ टीएमसी पाणीसाठा जमा झाला आहे.तर कुकडी खोऱ्यातील पिंपळगाव जोगे धरण, माणिकडोह धरण, येडगाव धरण, वडज धरण, डिंभे धरण, चिल्हेवाडी धरण आणि घोड धरण या धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे.

# नियमित शैक्षणिक शुल्काच्या पाचपट शुल्क आकारणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

> हेल्पिंग हँडसएकीकडे शासन आणि प्रशासन मोफत शिक्षणाचा गाजावाजा करत आहे, तर दुसरीकडे खासगी शैक्षणिक संस्थांमार्फत अमाप लूट केली जात आहे. एका हाताने देण्याचे आणि दुसऱ्या हाताने परत घेण्याचे हे राज्यकर्त्यांचे धोरण आहे. यात शिष्यवृत्ती किंवा कोणतीही शासकीय सवलतही देण्याची तरतूद नाही. शासकीय जागा कमी असल्याने विद्यार्थ्यांकडे पर्याय नसतो, त्यामुळे त्यांना पाचपट रक्कम भरण्यास भाग पाडले जातील म्हणून अशा निर्णयांचा कडाडून विरोध करत आहोत."
>
> — **कुलदीप आंबेकर,** अध्यक्ष, स्टुडंट

**पुणे :** असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र संघटनेच्या निवेदनाच्या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत शुल्कासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित महाविद्यालयांनी शुल्क निश्चितीबाबत महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदीस अनुसरून शुल्क नियामक प्राधिकरणाने नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, असे देखील स्पष्ट केले आहे. राज्यातील खासगी विनाअनुदानित आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात संस्थात्मक कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांकडून शुल्काच्या पाचपट शैक्षणिक शुल्क आकारण्यास हरकत नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# ३६ व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये हास्यकल्लोळची धम्माल!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ३६व्या पुणे फेस्टिव्हलच्या अंतर्गत श्री गणेश कला क्रीडा रंगमंचावर रविवार १५ सप्टेंबर रोजी 'हास्यकल्लोळ धम्माल महाराष्ट्राच्या विनोदवीरांची' या विनोदी कार्यक्रमाने प्रेक्षकांची मनं जिंकली. प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रियदर्शनी इंदलकर, रसिका वेंगुर्लेकर, रोहित माने आणि प्रथमेश शिवलकर यांनी आपल्या हास्याने रंगमंचावर अक्षरशः हशाचा कल्लोळ निर्माण केला. प्रेक्षकांच्या हास्यध्वनीने संपूर्ण हॉल दणाणून गेला.



विनोदी अभिनयासोबतच ऑर्केस्ट्रा म्युझिक बँड, दोन गायक आणि वादकांनी कार्यक्रमात संगीताची रंगत वाढवली. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला, आणि संपूर्ण हॉल हसण्या-खिदळण्याने भरून गेला. हा कार्यक्रम पुणे फेस्टिव्हलच्या सांस्कृतिक वैविध्याचे एक प्रमुख आकर्षण ठरला. पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य समन्वयक ॲड. अभय छाजेड आणि महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या पर्यटन संचलनालयाच्या पुणे विभागाच्या उपसंचालिका सौ. शमा पवार यांच्या हस्ते कलाकारांचे सत्कार करण्यात आले.

३६व्या 'पुणे फेस्टिव्हल'चे महाराष्ट्र पर्यटन विभागाचे पर्यटन संचालनालय आणि कोहिनूर ग्रुप हे मुख्य प्रायोजक असून, पंचशील,भारत फोर्ज आणि नॅशनल एग्ज को-ऑर्डिनेशन कमिटी हे सहप्रायोजक आहेत. डॉ. डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी, आणि सिंहगड इन्स्टिट्यूट हे उपप्रायोजक आहेत.

## RS NEWS DIGEST

### पोलीसांची कारवाई

## गोळीबार प्रकरणी ६ जणांना अटक

**पुणे :** आर्थिक देवाणघेवाणीतून दोघांवर गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोन महिलांसह सहा जणांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावणी आहे.बापू ऊर्फ दशरथ विठ्ठल शितोळे (वय ४६), नीलिमा बापू ऊर्फ दशरथ शितोळे (वय ४२), जिग्नेश बापू ऊर्फ दशरथ शितोळे (वय १९), आशा सुरेश भोसले (वय १२), अक्षय सुरेश भोसले (वय २९) आणि निखिल अशोक भोसले (वय २५, सर्व रा. इनामदार वस्ती, कोरेगाव) अशी कोठडी सुनावण्यात आलेल्यांची नावे आहेत. इनामदार वस्ती येथे शनिवारी (ता. १४) सकाळी बारच्या सुमारास हा गोळीबार झाला होता. याबाबत शरद कैलास गोते (वय ३६, रा. भिवर) यांनी फिर्यादी दिली आहे. त्यानुसार उरुळी कांचन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपींनी केलेल्या गोळीबारात फिर्यादी आणि काळुराम महादेव गोते हे गंभीर जखमी झाले आहेत.बापू शितोळे याने फिर्यादी यांच्याकडून ४० लाख रुपये उसने घेतले होते. शनिवारी फिर्यादी आणि काळुराम गोते हे पैसे आणण्यासाठी बापू शितोळे याच्या घरी गेले. त्यावेळी त्यांच्यात वाद झाल्याने बापू याने फिर्यादी आणि काळूराम गोते यांच्यावर गोळीबार केला.

### आरोग्य शिबीर

## वैद्यकीय तपासणी शिबीर संपन्न

**पुणे :** थोरले बाजीराव मित्र मंडळ कसबा पेठ आयोजित वैद्यकीय तपासणी शिबिर संपन्न विस्डम सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बाणेर यांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सदर शिबिराचे उद्घाटन मुख्यमंत्री वैद्यकीय कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते करण्यात आले सदर शिबिरात हृदयरोग अस्थीरोग गुडघे दुखी, स्त्रीरोग तपासणी, BP/BMI /ECG /BSL-R इ. तपासणी करण्यात आल्या. सदर शिबिरात एकुण दोनशेहून अधिक जणांची तपासणी करण्यात आली. डॉ संदेश साळुंखे, डॉ अस्मिता पाटील, माधुरी ढाके, सुदर्शन पवार, पल्लवी पाटील, दादासाहेब शिंदे, रोहित भोपाळ यांनी तपासणी साठी सहकार्य केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी सहदेव गोळे (मार्केटिंग मॅनेजर) व विक्रांत पाचपोर (मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह) यांनी विशेष परिश्रम घेतली आहे.



### गुन्हेगारी

## एनडीपीएस गुन्ह्यातील आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर

**पुणे :** अमली पदार्थ व सायकोट्राफिक पदार्थ कायदा १९८५(NDPS ACT ) अंतर्गत अटक झालेल्या आरोपीला विशेष सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस.जे. डोरले यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत पोलीस कर्मचारी पेट्रोलिंग करत असताना त्यांना बातमी मिळाली की २१ वर्षाचा मुलगा मध्यभागी पांढ-या रंगाची पट्टी असलेला टी-शर्ट व खाली काळया रंगाची शॉर्ट जीन्स पँट घातलेली, ज्यामध्ये गांजा हा अंमली पदार्थ घेवुन स्वतः ओढण्यासाठी शिवाजीनगर येथील कृषीभवन समोर, शिवाजीनगर पुणे येथे येणार आहे. पोलिस पथकाने त्याला पकडल्यानंतर त्याच्याकडे 30 मिलिग्रॅम एवढा हिरवट रंगाचा व उग्र वास येत असलेला अंमली पदार्थ प्लॅस्टीक पिशवीसह, सोबत ओढण्याचे साहीत्य असे ओढण्याच्या उद्देशाने असा सर्व माल अनाधिकाराने बेकायदेशीररित्या जवळ बाळगुन मिळुन आला. त्यामुळे पोलिसांनी त्याला अटक केली व सदर आरोपी विरुद्ध एन.डी.पी.एस. ॲक्टचे कलम 27(अ), 29 प्रमाण फिर्याद दाखल केली.

आरोपीच्या वतीने वकिलांनी युक्तिवाद करताना सांगितले की,एनडीपीएस शेड्युलनुसार आरोपीकडे आढळून आलेल्या गांजाचे प्रमाण हे कमी आहे त्यानुसार आरोपीला फक्त एक वर्षाची शिक्षा होऊ शकते शिवाय आरोपीला पोलिसांनी प्रथम दर्शनी पकडले असता त्याला अटक केली नाही. सदरील घटना बघता आरोपीस एनडीपीएस कायद्यानुसार कलम २९ लावू शकत नाही. तसेच आरोपीकडून ॲप्पल कंपनीचा मोबाईल व लाईटर हे देखील जप्त केले आहे. त्यामुळे आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर करावा. आरोपी न्यायालयाच्या सर्व आदेशांचे पालन करेन. विशेष न्यायालयासमोर ठेवण्यात आलेल्या पुराव्यांचा विचार करता व आरोपीचे वकील ॲड. स्वप्निल जोशी यांनी केलेल्या युक्तिवाद मान्य करून आरोपीला अटकपूर्व जामीन न्यायालयाने मंजूर केला. यावेळी आरोपीचे वकील म्हणून ॲड. स्वप्निल जोशी ॲड. विजय बाबर यांनी काम पाहिले.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक १. श्री. गणेश हनुमंत जुनवणे, २. सोनाली प्रदीप हुलावळे, ३. बेबी हनुमंत जुनवणे, ४. नारायण हनुमंत जुनवणे सदर मिळकत आमचे आशिलांना देण्याचे कबुल करूण तशी बोलणी आमचे आशिलांसोबत चालु आहेत. सदर मालकांनी सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी व बोजारहीत असलेबाबत आमचे आशिलांना खात्री व भरवसा दिलेला आहे. सबब कोणाचाही सदर मिळकतीशी कसल्याही व कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबापावती, कुलमुखत्यारपत्र, विकसनकरार, साठेखत, कूळ, खरेदीखत, क्लेम, हिस्सा, वारसा, पोटगी, गहाण, तारण, दान, जप्ती, बक्षिस, लीन, लीज, कुळ, वहिवाट इ. अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन २८ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिषी आमची खात्री करून दयावी, अन्यथा सदर मिळकतीवर कोणचाही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे. असे समजुन आमचे आशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही, कसल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

अ) तुकडी पुणे पोट तुकडी तालुका व मे. दुय्यम निबंधक हवेली यांचे हीतील, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालीका यांचे हीतील गांव मौजेकवळे येथील १. सर्व्हे नं. ७३/२अ/१ यांसी एकुण क्षेत्र ०२ हेक्टर ५७ आर यांसी आकार ०६ रुपये ७७ पैसे पैकी क्षेत्र ०० हे. ०१ आर म्हणजेच १००० चौ. फुट म्हणजेच ९२.९३ चौ. मी. अशी मिळकत. यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे –

**पुर्वेस** : याच स. नं. पैकी १. श्री. गणेश हनुमंत जुनवणे, २. सोनाली प्रदीप हुलावळे, ३. बेबी हनुमंत जुनवणे, ४. नारायण हनुमंत जुनवणे यांची मिळकत. **पश्चिमेस** : सर्व्हे नं. पैकी उर्वरित मिळकत. **दक्षिणेस** : १५ फुट सामाईक वापराचा रस्ता. **उत्तरेस** : श्री. दत्तू हरी तरस यांची मिळकत.

**२.** सर्व्हे नं. ७३/२अ/१ यांसी एकुण क्षेत्र ०२ हेक्टर ५७ आर यांसी आकार ०६ रुपये ७७ पैसे पैकी क्षेत्र ०० हे. ०२ आर म्हणजेच २००० चौ. फुट म्हणजेच १८५.८७ चौ. मी. अशी मिळकत. यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे –

**पुर्वेस** : श्रीमती चटर्जी यांची मिळकत. **पश्चिमेस** : श्री.काळे यांची मिळकत, **दक्षिणेस**: श्री.यशवंत नारायण तरस यांची मिळकत, **उत्तरेस** : रस्ता.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

दिनांक : १६/०९/२०२४.

**ॲडव्होकेट श्री. अमित व्ही. गायकवाड**

शॉप नं.२, राजदेवता कॉर्नर, केशवनगर, चिंचवडगाव, पुणे – ३३. मो.९०११८८९९३३

# पर्यावरणाचा 'ढोल'

पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीसह गणेशोत्सवात सहभागी होणा-या ढोल-ताशा पथकांमध्ये ३० जणांचाच सहभाग असावा, अशी मर्यादा राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) घातली होती. त्याला नुकतीच सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या पीठाने राज्यातील अधिका-यांवर याबाबत नोटिसा बजावल्या आहेत. पुण्यात ढोल-ताशांना सांस्कृतिक महत्त्व आहे. जवळपास १०० वर्षांची परंपरा आहे आणि त्याची सुरुवात लोकमान्य टिळक यांनी केली आहे. 'एनजीटी'ने ३० ऑगस्ट रोजी जारी केलेल्या आदेशामुळे याला बाधा पोहोचणार आहे असा युक्तिवाद करण्यात आला होता. एनजीटीच्या आदेशाला पुण्यातील एका ढोल-ताशा वादक मंडळाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. अनंत चतुर्दशीला काही दिवस शिल्लक असल्याने याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती न्यायालयाला करण्यात आली होती. त्यानुसार सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय खंडपीठाने गुरुवारी संक्षिप्त सुनावणी घेतली. याचिकाकर्त्यांचे वकील अमित पै यांनी ढोल-ताशांचे सांस्कृतिक महत्त्व सांगितले. एनजीटीने वादकांच्या संख्येवर लावलेल्या निर्बंधांचा अनेक मंडळांना मोठा फटका बसेल. त्यामुळे या आदेशाला स्थगिती द्यावी, असा युक्तिवाद पै यांनी केला. यावर खंडपीठाने ढोल-ताशे वाजू द्या, ते पुण्याची शान आहेत, असे नमूद करत एनजीटीच्या आदेशाला स्थगिती दिली. तसेच या प्रकरणी राज्य सरकारला नोटीस जारी करत आपली भूमिका मांडण्यास सांगितले. ध्वनिप्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर उत्सवाच्या काळात आवाजाची तीव्रता वाढू नये, यासाठी राष्ट्रीय हरित लवादाकडे याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेची दखल घेत हरित लवादाने गणेशोत्सव काळात ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही अटी-शर्ती ठेवल्या होत्या. आवाजाची तीव्रता वाढू नये, यासाठी काही नियम लावले होते. कर्कश आवाजाचा त्रास लहान बालके, ज्येष्ठ व्यक्ती तसेच आजारी व्यक्तींना होत असतो. परंतु लवादाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते की, वर्षातून एक दिवस असतो आणि त्यामध्येही तुम्ही ध्वनिप्रदूषणाच्या नावावर अटी लावल्या तर चुकीचा संदेश जातो. हरित लवादाच्या निर्णयावर सुप्रीम कोर्टाकडून तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषण नियमांचे उल्लंघन झाल्याप्रकरणी श्रवणतज्ज्ञ डॉ. कल्याणी मांडके यांनी ॲड. मैत्रेय घोरपडेमार्फत 'एनजीटी'त याचिका दाखल केली होती. ही याचिका ३० ऑगस्टला निकाली काढताना ढोल-ताशा पथकातील वादकांच्या संख्येवर नियंत्रण आणले होते. विसर्जन मिरवणुकीत प्रत्येक ढोल-ताशा-झांज पथकातील वादकांची संख्या ३० पेक्षा जास्त नसावी. या नियमांचे उल्लंघन झाल्यास पोलिसांनी ही वाद्ये जप्त करावीत, असे निर्देश 'एनजीटी'ने दिले होते. त्याविरोधात पुण्यातील वंदे मातरम संघटनेच्या युवा वाद्य पथक ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अनिश पाडेकर, ॲड. अमित पै व ॲड. तेजस दंडगव्हाळ यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी घेण्यात आली. खंडपीठाने राज्य सरकार व पुणे प्रशासनाला नोटीस बजावण्याचा आदेश दिला, तसेच ढोल-ताशा-झांज पथकातील वादकांच्या संख्येवर मर्यादा आणणा-या 'एनजीटी'च्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली. या प्रकरणी चार ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने 'एनजीटी'च्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिल्यामुळे ढोल-ताशा पथकांना गणेश विसर्जन मिरवणुकीत वाजवायची अन् गाजवायची संधी मिळाली आहे. आता अनेक गणेश मंडळे या वादक पथकांना म्हणतील, बजाव भाई बजाव! पुणे पोलिसांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर याआधीच एक नियमावली प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार एका पथकात ४० ढोल आणि १० ताशांना परवानगी दिली आहे. त्याची अंमलबजावणी काही वर्षांपासून होत असून, यंदा तीच नियमावली कायम असेल. ढोल-ताशा हा महाराष्ट्राचा खोलवर रुजलेला सांस्कृतिक वारसा असून, तो गणेशोत्सवाचा अविभाज्य घटक आहे. ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी 'एनजीटी'ने आपल्या आदेशात नऊ निर्देश दिले आहेत. त्यापैकी केवळ ढोल-ताशा पथकातील वादकांच्या संख्येवर मर्यादा आणण्याच्या निर्देशाला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. अन्य आठ निर्देशांचे पालन करावे लागेल. गणेशोत्सव फक्त मनोरंजनाचे साधन नाही तर अत्यंत महत्त्वाचे जबाबदारीचे काम आहे हे तरुणाईने लक्षात घेणे गरजेचे आहे. ध्वनिप्रदूषणविरहित वातावरणात, पारंपरिक वाद्यांचा वापर करून गुलालाऐवजी फुलांची उधळण करत विहित मुदतीत 'श्रीं'च्या मूर्तींचे विसर्जन करायला हवे. दरवर्षी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले जाते. परंतु त्याची फारशी दखल घेतली जाताना दिसत नाही. पर्यावरणपूरक गणेशोत्सव म्हणजे केवळ पीओपीची गणेशमूर्ती न आणणे एवढ्यापुरता हा विषय मर्यादित नाही. शाडूच्या मातीपासून तयार केलेली गणेशमूर्ती, थर्माकोल किंवा प्लास्टिकचा वापर न करता केलेली सजावट, निर्माल्याची शास्त्रोक्त पद्धतीने लावली जाणारी विल्हेवाट, गणेशोत्सवात कर्णकर्कश लाऊड स्पीकरचा वापर न करणे, विसर्जन मिरवणुकीत आवाजाची मर्यादा पाळणे अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. दरवर्षी गणेशोत्सवाचे वेध लागले की सर्वांत आधी विषय येतो तो गणेशमूर्तींचा. पीओपीच्या गणेशमूर्तींवरील बंदीची चर्चा होऊ लागते. तोवर शेकडो मूर्तिकारांच्या मंडपात गणेशमूर्ती तयार होत आलेल्या असतात. त्यामुळे ही बंदी काही प्रत्यक्षात येत नाही. गणरायाला एकदा निरोप दिला की, पुढल्या वर्षी पुन्हा या विषयावर चर्चा झडू लागते. पुन्हा पहिले पाढे पंचावन्न अशी परिस्थिती निर्माण होते. याचा अर्थ पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे प्रयत्न अपयशी ठरत आहेत असा होत नाही. पीओपीच्या गणेशमूर्तींचा खप निश्चितच कमी होत आहे. बदल घडतो आहे, लोकांची मानसिकता बदलते आहे. गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याकडे कल वाढतो आहे. ■

अलिकडेच कर्नाटक उच्च न्यायालयाने पतीपासून वेगळे राहणाऱ्या एका महिलेच्या मागणीवर आक्षेप घेतला. पतीने दरमहा सहा लाख रुपयांपेक्षा अधिक भत्ता देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली. मात्र न्यायालयाने म्हटले, की एखादी महिला महिनाभरात एवढा खर्च करू इच्छित असेल तर तीने स्वत: कमवायला हवे. या सुनावणीदरम्यान न्या.ललिता कनगेगंती यांनी न्यायालयीन अधिकाराचा दुरपयोगाबाबत याचिकाकर्त्या महिलेवर ताशेरे ओढले. कायद्याचा दुरपयोग करण्याचा जे विचार करतात, त्यांनी अशा गोष्टी टाळायला हव्यात, अशी तंबी दिली. जून २०१८ मध्ये मद्रास उच्च न्यायालयाने तीला त्रास देणे किंवा जबरदस्तीने त्याच्याकडून पैसे वसूल करण्यासाठी या अधिकाराचा वापर होऊ नये असे म्हटले होते. कायद्याचे सोडा, एक चिंतनीय प्रश्न आहे, आपण एक याचक म्हणून ऐशोरामासाठी पैसे मागत असू तर ते खरच नितीमत्तेला धरून आहे का?

# लगाम कायद्याच्या 'दुरुपयोगा'ला

अलीकडील काळात देशातील विविध न्यायालये महिला सुरक्षेसाठी तयार केलल्या कायद्यांच्या वाढत्या दुरुपयोगांबाबत सातत्याने चिंता ---- करत आहेत. तरीही या कायद्यांचा चुकीचा होणारा वापर थांबलेला नाही आणि त्याचा पायंडा पडत चालला आहे. हा एक प्रकारे 'एककल्ली स्त्रीवादा' च्या विचारसरणीचा परिपाक आहे. बऱ्याच प्रकरणांमध्ये पतीनं पत्नीला घटस्फोटानंतर पोटगी म्हणून काही रक्कम पत्नीला दर महिन्याला द्यावी, असे निकाल न्यायलयांनी दिले आहेत. मात्र, काही प्रकरणात या कायदेशीर हक्काचा महिलांकडून गैरवापर केला जात असल्याचेही निदर्शनास आलं आहे. अलिकडेच कर्नाटक उच्च न्यायालयाने पतीपासून वेगळे राहणाऱ्या एका महिलेच्या पोटगीसंदर्भातील मागणीवर आक्षेप घेतला. पतीने दरमहा सहा लाख रुपयांपेक्षा अधिक भत्ता देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली. मात्र न्यायालयाने म्हटले, की एखादी महिला महिनाभरात एवढा खर्च करू इच्छित असेल तर तीने स्वत: कमवायला हवे.

महिलेच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायाधीश ललिता कनगेगंती यांनी न्यायालयीन अधिकाराचा दुरपयोगाबाबत याचिकाकर्त्या महिलेवर ताशेरे ओढले. कायद्याचा दुरुपयोग करण्याचा जे विचार करतात, त्यांनी अशा गोष्टी टाळायला हव्यात, अशी तंबी दिली. कलम २४ म्हणजे काही पत्नीशी वाद असल्याबद्दल पतीला दिलेली शिक्षा नाहीये. तुम्ही अशा मागण्या करताना विचार करायला हवा. तुम्ही काहीही आकडे सांगाल आणि न्यायालय कोणत्यातरी किमतीला होकार देईल असं होणार नाही, अशा शब्दांत न्यायालयाने याचिकाकर्त्या महिलेला सुनावले.

अर्थात न्यायालयाकडून अशा प्रकारचे ताशेरे ओढले जाणे ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी जून २०१८ मध्ये मद्रास उच्च न्यायालयाने हरिहर राजकलिंगराय विरुद्ध आरती या प्रकरणात पत्नीला तात्पुरत्या प्रमाणात उदरनिर्वाहाची सुविधा देण्यास नकार देताना न्यायालयाने म्हटले, की उदरनिर्वाह भत्त्याची तरतूद हा एक सामाजिक तोडगा असून तो पत्नीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करतो; मग ती कुटुंबात असो विभक्त झालेली असो. परंतु त्या अधिकाराचा गैरवापर होऊ नये. पतीला त्रास देणे किंवा जबरदस्तीने त्याच्याकडून पैसे वसूल करण्यासाठी या अधिकाराचा वापर होऊ नये. विशेषत: पत्नी नोकरदार असेल आणि तिच्याकडे बऱ्यापैकी पैसा असेल तर अशावेळी या अधिकाराचा वापर करत मागणी करणे गैर राहू शकते. हे दोन्ही निर्णय न्यायालयीन व्यवस्थेवर विश्वास निर्माण करतात. अर्थात उदरनिर्वाह, सांभाळ हा कायदेशीर मुद्दा नसून तो त्यापेक्षाही अधिक नितीमत्तेशी संबंधित आहे.

भारतीय समाजात क्रांतिकारी बदल होत असून आपला समाज संक्रमणातून जात आहे. एकीकडे लिंग समानतेवरून जोरदार दावे केले जात आहेत. त्याचवेळी देशातील स्त्री हक्क संघटनांकडून महिलांचे सक्षमीकरण आणि यश हे केवळ अर्थाजनापुरतेच मर्यादित असून कुटुंब आणि विवाहसंस्थेला दुय्यम स्थान असल्याचे ठासून सांगितले जात आहे. हा महिला सक्षमीकरणासंदर्भातील तर्क पाश्चिमात्य देशांतील विचारसरणीतून प्रेरित झालेला आहे. अर्थात स्वावलंबन हा प्रत्येक महिलेचा अधिकार आहे. कारण आर्थिक सक्षमता ही स्वावलंबन अधिक मजबूत करते. स्वकष्टाने मिळवलेले पैसे हे स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात आणि निर्णयक्षमतेला पाठबळ देतात. मात्र स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते हे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाची पाठराखण करताना कुटुंबाच्या पालन पोषण करण्याची जबाबदारी पुरुषांवरच आहे असे सांगतात आणि त्यातही पत्नीच्या सर्व गरजा भागवणे हे पतीचे कर्तव्य आहे असे मांडतात. पण त्यात ऐशोराम, चैनी, विलासीपणा यांचाही समावेश करतात.

समाजमान्यता लाभलेल्या जबाबदाऱ्या पाहिल्या तर पुरुषांच्या कमाईवर केवळ पत्नी आणि मुलांचा पूर्ण अधिकार असतो, असे म्हटले जाते. मात्र महिलांनी कमावलेल्या संपत्तीवर पूर्णपणे महिलांचाच हक्क असेही सांगितले जाते. जबाबदाऱ्यांबाबतची विसंगती ही लिंग समानता प्रस्थापित करण्याच्या दुटप्पी निकषाला अधोरेखित करते. पत्नी आपल्या जीवनातील मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी पतीवर अवलंबून असेल आणि स्वत: कमवत नसेल तर विभक्त झाल्यानंतर तिची जबाबदारी ही पतीची असते. परंतु एखादी महिला विभक्त होण्याच्या मार्गावर असेल आणि ती उच्च शिक्षित आणि नोकरदार असतानाही आपल्या ऐशोरामाच्या गरजा भागविण्यासाठी कायद्याचा एखाद्या शस्त्रासारखा वापर करत असेल आणि पतीवर ओझे लादत असेल तर हे कृत्य नैतिकेला धरून नाही. अर्थात वेगळी राहणारी पत्नी स्वावलंबी असतानाही उदरनिर्वाहाच्या नावाखाली पतीकडून अधिकाधिक पैसे उकळत असेल तर ती मानसिकता केवळ भारताचीच आहे, असे समजण्याचे कारण नाही.

**डॉ. ऋतू सारस्वत**

पश्चिमी देशांतही तथाकथित आधुनिकतेच्या नावावर हजारोंच्या संख्येने महिला एकीकडे लिंग समानतेचा दावा करतात आणि दुसरीकडे आपल्या ऐशोरामासाठी पतीकडून पैसे काढण्याचा मार्ग निवडतात.

हार्वर्ड येथील समाजशास्त्र विभागाचे प्रोफेसर अलेक्झांड्रा किल्लेवाड यांच्या मते, आपली समाजव्यवस्था पुरुषांकडून कमाईची अपेक्षा करते आणि कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडाव्यात असे गृहित धरले जाते. अमेरिका असोसिएशन ऑफ मेट्रोमोनियल लॉयर्सचे अध्यक्ष एलिझाबेथ लिंडसे यांचे वक्तव्य अलेक्झांड्रा यांच्या विचाराशी मिळतेजुळते आहे. लिंडसे म्हणतात, उदरनिर्वाहाच्या बाबतीत न्यायालय पत्नी आर्थिक सक्षम असतानाही बहुतांशवेळा पतींकडूनच कुटुंबाचे पोषण व्हावे, अशी अपेक्षा बाळगते. भारताची न्यायालयीन व्यवस्था देखील याच विचारापाशी घुटमळताना दिसते. मात्र भारताचा उदरनिर्वाह कायदा स्त्री-पुरुष समानतेला पुरक आहे. १९५५ मध्ये हिंदु विवाह अधिनियम कलम २४ नुसार पती देखील आपल्या उदरनिर्वाहासाठी पैशाची मागणी करू शकतो, असे म्हटले आहे. यावर्षी एप्रिल महिन्यांत मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश शर्मिला देशमुख यांनी निकाल देताना बेरोजगार पतीला नियमितपणे मासिक भत्ता देण्याचे निर्देश पत्नीला दिले होते. हा निर्णय पारंपरिक कायद्याच्या अधिष्ठानाला आव्हान देणारा आहे.

कर्नाटकातील प्रकरणामध्ये याचिकाकर्त्या महिलेच्या वकिलांनी न्यायालयासमोर ही ६ लाख १६ हजार ३०० रुपयांची रक्कम कशासाठी हवी आहे, याचीही माहिती सादर केली होती. यामध्ये सदर महिलेच्या गुडघ्यांच्या उपचारांसाठी ४ ते ५ लाख रुपयांची मागणी केली होती. त्याशिवाय महिन्याला फक्त बूट आणि कपड्यांसाठी १५ हजार रुपये, घरात जेवण करण्यासाठी ६० हजार रुपये आणि याव्यतिरिक्त बाहेर कधी जेवायचे वेळ येते तेव्हासाठी आणखी काही हजारांची रक्कम पोटगीदाखल महिलेने मागितली होती. प्रत्येक गोष्टीसाठी मागितलेली रक्कम वाचून न्यायमूर्तींनी सदर महिलेची चांगलीच कानउघडणी केली. कायद्याचे सोडा, एक चिंतनीय प्रश्न आहे, आपण एक याचक म्हणून ऐशोरामासाठी पैसे मागत असू तर ते खरंच नितीमत्तेला धरून आहे का?

मुळात, न्यायालयाकडून अनेकदा इशारे देऊनही महिलांकडून या कायद्याचा होणारा गैरवापर हा एकप्रकारे 'एककल्ली स्त्रिवाद' च्या विचारसरणीचा परिपाक आहे. अशा विचारातून समोर आलेली महिलाशक्ती साम दाम दंड आणि भेद या नितीवर विश्वास ठेवते आणि त्याचा अंतीम उद्देश हा प्रभुत्व मिळवण्याचा आहे.वास्तविकपणे महिलशक्ती किंवा स्त्रीशक्तीचा पहिला अध्याय हा महिला सक्षमीकरणातून निर्माण झाला आणि ही बाब तत्कालिन काळात सामाजिक व्यवस्थेच्या सर्वंकष विकासासाठी आणि संतुलनासाठी गरजेची होती. कारण या काळात विविध कारणांमुळे जगभरात महिलांना मागे ढकलले जात होते. याशिवाय महिलावर्ग सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवरच्या उणिवांशी संघर्ष करत होता. या काळात भारतात हुंडा प्रथा हे एक मोठे आव्हान होते. त्याचा मुकाबला करण्यासाठी हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ मंजूर करण्यात आला. काळानुसार बदल झाला आणि आताच्या मुली पूर्वीच्या तुलनेत अधिक धाडसी, प्रशिक्षित आणि अधिकाराबाबत अधिक जागरुक म्हणून समोर येऊ लागल्या आहेत. यादरम्यान 'एककल्ली महिला शक्ती'ने भारतात घुसखोरी केली. या विचारसरणीने महिलांना अधिराज्य गाजविण्याची मुभा दिली. याचा परिणाम म्हणजे विवाहसंस्था ही प्रभुत्व मिळवण्याचा मार्ग ठरला आणि त्यातही कायदे ठरले महिलांचे अस्त्र-शस्त्र. पण देशातील न्यायव्यवस्थेने या कायद्यांच्या दुरुपयोगाला वेसण घातली आहे. ■

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**मंगळवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२४**
भाद्रपद शु. १४ बृहस्पती पूजन श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू, प्रौष्ठपदी पौर्णिमा अनंत चतुर्दशी, पौर्णिमा प्रारंभ सकाळी ११.४४, शुभ दिवस (स. ११.४४ पर्यंत.)
**सूर्योदय :** स.०६.०३ **सूर्यास्त :** सायं.०६.१२ वा
**नक्षत्र** : शततारका, **योग :** धृति शूल, करण : विष्टि
**राहू काळ : दुपारी :** ३:०० ते ४:३०

**दिनविशेष**

*१८८७ : सर जीन्स जेम्स हॉपवुड स्मृतिदिन *१९३२ : ब्रिटिश वैद्यशास्त्रज्ञ रोनॉल्ड रॉस स्मृतिदिन *क्षेपणास्त्राची लक्ष्य भेदण्यात असलेल्या समस्येचे निराकरण करणारे भारतीय वंशाचे शास्त्रज्ञ अभिजित महालनोबीस यांना अमेरिकेतील अल्पसंख्यांक समाजातील शास्त्रज्ञाला दिला जाणारा सर्वोत्तम शास्त्रज्ञ पुरस्कार. *१७३६ : पाऱ्याचा वापर करून कार्यक्षम तापमापक तयार करणारे जर्मन भौतिकशास्त्रज्ञ ग्रॅबिएल डॅनिएल फॅरनहाइट यांचे निधन. तापमान मोजण्याची श्रेणी त्यांच्या नावाने ओळखली जाते. पाण्याचा उत्कलनबिंदू वातावरणातील दाबानुसार बदलतो, हे त्यांचे शोध. *१९०७ : गायक वामनराव सडोलीकर यांचा जन्म. *१९४२ : ज्येष्ठ साहित्यिक ना. धों. महानोर यांचा जन्म. *१९४८ : सिकंदराबादमध्ये भारतीय सैन्य बिनशर्त येऊ देण्यास निजामाची मान्यता. रझाकारांवर बंदी. *१९५८ : कामगार शिक्षण योजनेची सुरुवात. *१९६३ : मलेशिया स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात आले. *१९८२ : इस्त्रायली सैन्याने बेरूतवर ताबा मिळवला.

**राशीभविष्य**

* मेष : मनाजोग्या घटना घडतील. *वृषभ : दुपारनंतर दिवस चांगला. *मिथुन : भीती बाळगू नका. *कर्क : कामांचा वेग वाढेल. *सिंह : येणाऱ्या संधी ओळखा. *कन्या : नवी दालने खुली होतील. *तुळ : अर्थकारणाची घडी बिघडेल. *वृश्चिक : विश्वासाला सार्थ ठराल. *धनु : कर्तव्यात कसूर करू नका. *मकर : शुभवार्ता समजतील. *कुंभ : कौटुंबिक सौख्य लाभेल. *मीन : आनंददायी दिवस.

**मेसेज आया**

सुख आहे सगळ्यांजवळ पण ते अनुभवायला
वेळ नाही. इतरांकडे सोडा पण स्वतःकडे बघायला वेळ नाही.
जगण्यासाठी चाललेल्या धावपळीत
आज जगायलाच वेळ नाही. आणि सगळ्यांची नावं
मोबाइमध्ये सेव्ह आहेत पण चार शब्द बोलायला
वेळ नाही. टुथ ऑफ लाईफ.



**व्यक्तीविशेष**

## शरच्चंद्र चट्टोपाध्याय

विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळीतील एक अत्यंत लोकप्रिय लेखक म्हणून शरच्चंद्र चट्टोपाध्याय ओळखले जातात. १७ सप्टेंबर १८७६ रोजी बंगालमधील हुगली जिल्ह्यतील देबानंदपूर नावाच्या खेड्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या घरी अठरा विश्व दारिद्य होते. शरच्चंद्र यांच्या सुरूवातीच्या लिखाणात त्यांना अनुभवाव्या लागणाऱ्या दारिद्र्याचे चित्रण दिसते. त्यांच्या साहित्यात ग्रामीण बंगाली समाजाचे वर्णन दिसते. अंधश्रध्दा आणि अत्याचार याबद्दल त्यांना मनस्वी चीड होती. त्याविरुध्दच ते लिहित असत. आयुष्याच्या एका टप्प्यावर त्यांनी काही काळासाठी संन्यासही घेतला होता. मंदिर ही त्यांची प्रकाशित झालेली पहिली कथा. त्या काळातील स्त्रियांच्या स्थितीबद्दल ते जास्त संवेदनशील होते आणि त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कादंबऱ्यात आढळते. देवदास आणि परिणिता या त्यांच्या कादंबऱ्या आजही आवडीने वाचल्या जातात. त्यावर हिंदी चित्रपटही तयार करण्यात आले. देवदास ही कादंबरी त्यांनी १९०१ मध्ये लिहिली आणि ती १९१७ मध्ये प्रकाशित झाली. तर परिणिता १९१४ मध्ये प्रकाशित झाली. १६ जानेवारी १९३८ रोजी यकृताच्या कर्करोगाने त्यांचे कोलकाता येथे निधन झाले.

**बोधकथा**

## उंदराचा पिंजरा

एका गावात शेतकरी आणि त्याची बायको सुखाने राहत होते. शेतकऱ्याने कोंबडी, डुक्कर आणि म्हैस पाळले होते. त्याच्या शेतात एक उंदीरही राहत होता. एकदा या उंदराने शेतकऱ्याच्या घरात उंदीर पकडण्या पिंजरा बघितला. तो खूप घाबरला. कोंबडी, डुक्कर आणि म्हैस तिघेही उंदराला चिडवू लागले. आता तो सापळ्यात आडकणार आणि मरणार म्हणून घाबरवू लागले. उंदीर बिचारा हिरमुसला. पण एकदा त्या पिंजऱ्यात उंदराऐवजी एक विषारी सापच अडकला. या सापाला शेतकऱ्याची बायको बाहेर काढायला गेली तर त्याने तिलाच दंश केला. शेतकऱ्याने वेळीच तिच्यावर उपचार करून घेतले. डॉक्टरांनी तिला चिकन सूप प्यायला सांगितले. शेतकऱ्यांनी कोंबडी कापली. आणि चिकन सूप तयार केले. आजारी बायकोला पहायला पाहुणे आले, त्यांना खाऊ घालण्यासाठी शेतकऱ्याने डुक्कर कापले. त्याची बायको आजारात मरण पावली. तेव्हा सगळे गावच त्याच्या सांत्वनाला आले, तेव्हा सगळ्या लोकांच्या भोजनाची व्यवस्था करण्यासाठी त्यांनी म्हैस कापली. उंदीर हे सर्व पाहत होता. त्याच्यासाठी आणलेल्या सापळ्यात तो वगळता इतरच अडकले होते. **तात्पर्यः- दुसऱ्यावर आलेल्या संकटाकडे बेसावधपणे पहाणे धोक्याचे असते, ते संकट आपल्यावरही येऊ शकते.**

**भूगोल**

## पृथ्वीवर जीवसृष्टीची सुरुवात सस्तन प्राणी

साडेसहा कोटी वर्षांपूर्वी जेव्हा डायनासोर पृथ्वीवरून लुप्त झाले तेव्हा जगात पृष्ठवंशीय सस्तन प्राण्यांचे वर्चस्व होते. त्यात पाण्यात, जमिनीवर आणि हवेत राहणाऱ्या प्राण्यांचा समावेश होता. खऱ्या अर्थाने पहिले सस्तन प्राणी म्हणता येईल असे थेराप्सीडस हे प्राणी होते. ते आकाराने लहान, उंदरासारखे प्राणी होते. मेगॅझोस्ट्रोडॉन हे या प्राण्यांचे नाव. हे प्राणी साधारण वीस कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर होते. म्हणजे डायनासोरच्या काळातही ते प्राणी अस्तित्वात होते. सस्तन प्राण्यांची अनेक वैशिष्टये होती. यातील काही डायनासोरचे वंशजही होते. हे प्राणी अतिशय चपळ आणि उद्योगी होते. त्यामुळे त्यांचे रक्त गरम होते. अंगावरील लांब केसांमुळे त्यांना आपल्या शरीराचे तापमान संतुलीत राखता येत होते. पायांची रचना सुधारलेली होती त्यामुळे त्यांना गतिमान हालचाली करणे शक्य होत असे. अपत्यांना थेट जन्म देत असल्याने त्यांच्या वाढीसाठी मातेच्या दुधातून अन्नाचा तात्काळ पुरवठाही झाला. याचा परिणाम या प्राण्यांची वाढ अतिशय वेगाने होऊ लागली. साडेसहा कोटी वर्षांपूर्वी मेसोझॉइक कालखंडाच्या अखेरपर्यंत सस्तन प्राण्यांच्या अनेक जाती प्रजाती अस्तित्वात आल्या होत्या.

**नवं संशोधन**

## फुलांचे परागीकरण करणारा रोबो

सध्या अनेक प्रकारचे रोबो पाहायला मिळत असतात. आता पोलंडच्या व्हर्साय युनिव्हर्सिटीतील संशोधकांनी एक असा रोबो बनवला आहे, जो फुलांना शोधून त्यांच्यामधील परागीकरणाच्या क्रियेस योगदान देईल. हा रोबो फुलझाडांच्या ओळींमधून फिरुन फुलांचा शोध घेऊ शकतो. त्यांचे परागीकरण करण्याचे तंत्र त्याला अवगत आहे.

या नवीन रोबोचे नाव 'बी-ड्रॉईड' असे आहे. हा रोबो माणसाकडून रिमोट कंट्रोलद्वारे संचालित होत नाही. तो स्वतःच हे काम करु शकतो. आपल्या अद्ययावत सॉफ्टवेअरच्या सहाय्याने तो कोणतेही नुकसान न करता फुलांचे परागीकरण घडवून आणू शकतो. एका अर्थी तो हे काम वारा किंवा कीटकांसारखे करीत असतो. निसर्गात अशाच माध्यमातून परागीकरणाची क्रिया घडत असते. रफाल डालेवस्की यांनी याबाबतची माहिती दिली. या रोबोच्या क्षमतेची स्ट्रॉबेरीसारख्या फळझाडांबाबत तसेच लसणाबाबतही चाचणी घेण्यात आली आहे. यामुळे फळ लवकर धरण्यास झाडांना मदत मिळू शक

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ४३९**

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4 | |
| 4 | 2 | | 1 |
| | | 2 | 3 |
| | 3 | | |

**क्रमांक ४३८ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 4 | 3 | 2 |
| 3 | 2 | 4 | 1 |
| 4 | 1 | 2 | 3 |
| 2 | 3 | 1 | 4 |

**हास्यविनोद**

बंड्याने बाबाला विचारले बाबा, मी एवढा मोठा कधी होणार की आईला न सांगता घराबाहेर पडू शकेन.
बाबा सुस्कारा सोडत म्हणाले,
एवढा मोठा तर मीही अजून झालो नाहीये रे...!



**महिलायन**

## रंग मैत्रीचे

मैत्रीचं नातं प्रत्येकासाठीच महत्त्वाचं असतं. पण, पुरुषांपेक्षाही स्त्रियांसाठी ते अधिक गहिरं असतं. मैत्रीच्या या रंगांशिवाय इतर सारे रंग फिके पडतात.

काही दिवसांपूर्वी मित्रांच्या टोळक्यात एका मेसेजची चलती होती. त्यामध्ये म्हटलं होतं, काही नाती ही टॉम अँड जेरीसारखी असतात. सतत परस्परांना हैराण करणं, परस्परांची छेड काढणं, पण परस्परांशिवाय राहू न शकणं, असं त्यांच्यामध्ये सुरु असतं. मैत्रिणींचं नातंही काहीसं असंच आहे. जगामध्ये मैत्रीच्या नात्यात जेवढे रंग भरलेले आहेत तेवढे दुसऱ्या कोणत्याच गोष्टीमध्ये नसावेत. प्रेम, तक्रारी, राग, आपलेपणा, थोडा द्वेष, अनेक प्रकारची आश्वासनं आणि थोडीशी बेपवाईही.

कोणत्याही मुलींच्या कॉलेजमध्ये किंवा त्यांच्या होस्टेलमध्ये पाऊल ठेवल्यानंतर तेथे मुली गप्पा मारुन आजुबाजूचं वातावरण आनंदी बनवण्याचा प्रयत्न करत असल्याचं दिसतं. मैत्रिणींच्या त्या टोळक्यात एखादी मुलगी आपल्या मैत्रिणीच्या हेअर स्टाईलवर विनोद करत असते तर कधी तिच्या नव्या ड्रेसचं कौतुक करत असते. तर कधी तिच्या मदतीसाठी आपला खांदा पुढे करण्यातही ती मागे राहत नाही. **(पूर्वार्ध)**

**घरगुती औषध**

*खसखसही शक्तीवर्धक आहे. ही मूठभर दुधात वाटून गोळा करावा आणि त्यात २५० ग्रॅम दूध घालून चुलीवर ठेवावा. *चांगले दाट झाल्यावर गोड लागेल इतकी साखर घालावी व थंड झाल्यावर यावी हिची लापसी शक्तीवर फार उत्तम आहे याने शक्ती येते *सुका खोकला थांबतो, संग्रहणीने फार परसाकडे होत असल्यास तेही बंद होते. संग्रहणी बरी झाल्यानंतर शक्ती येण्यासाठी लापशी खातात. *लहान मुलास म्हणजे ५ महिन्यांची झाल्यावर हिची लापशी करून द्यावी, याने मुले अंग धरतात व दातांपासून हगवणीची बाधा बिलकूल होत नाही. हिची बोंडे शेकण्यास फार उपयोगी पडतात.

**कलाकुसर**

## खेळण्यातले प्राणीसंग्रहालय

**साहित्य :** पातळ पुठ्ठा, पुठ्ठ्याची एक ते दोन इंची व्यासाची नळी, रंग, फेव्हिकॉल इत्यादी. **कृती :** प्रथम पातळ पुठ्ठ्यांवर आपल्या आवडत्या प्राण्यांच्या चेहऱ्याचे चित्र काढून घ्यावे. याच उंचीचा मागचा भाग कापून त्यावर शेपूट काढावी. चेहऱ्याचा आकार कात्रीने व्यवस्थित कापून त्यावर रंग देवून कान, डोळे, ना, इत्यादी अवयव काढावे. नंतर या दोन्ही भागांच्या बरोबर मध्ये पुठ्ठ्याची नळी आकारानुसार कापावी आणि फेव्हिकॉलने चिकटवावी. चेहऱ्याच्या भागालाच कापताना पायाचा आकारही कापावा. म्हणजे पुढचे दोन आणि मागचे दोन असे चार पाय तयार होतील आणि मधला नळीचा भाग म्हणजे पोटाचा भाग होईल. हत्ती, सिंह, गाय, वाघ, असे किती तरी प्राणी तुम्ही तयार करू शकता आणि शोकेसमध्ये छानसे प्राणीसंग्रहालय बनवू शकता.

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# सिडकोच्या अध्यक्षपदी संजय शिरसाट यांची नियुक्ती



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मंत्रिमंडळात स्थानाच्या प्रतीक्षेत असलेल्या शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाटांची महामंडळावर वर्णी लावण्यात आली आहे. संजय शिरसाट यांची सिडकोच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तशा प्रकारचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

**काय आहे शासन निर्णय?**

शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) महामंडळाच्या रिक्त असलेल्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय**

०१. शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको) च्या आर्टिकल ऑफ असोशिएशन मधील आर्टिकल २०२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन श्री. संजय शिरसाट, वि.स.स. यांची शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको) च्या अध्यक्ष पदावर (मंत्री दर्जा) नियुक्ती करण्यात येत आहे.

०२. श्री. संजय शिरसाट, अध्यक्ष, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको) यांना वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक शासाऊ-१०.०२/प्र.क्र.०६/०३/सा.उ., दि.२२ ऑगस्ट, २००३ आणि शासन निर्णय क्रमांक शासाऊ १०.१०/प्र.क्र.९६/१०/सा.उ., दि.१३ मार्च, २०१२ मधील तरतुदींनुसार सेवा सुविधा उपलब्ध असतील.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०९१६१६२४३०६५२५ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

# शरद पवारांची मॅन टू मॅन मार्किंग

## महाजनांविरुद्ध तगडा नेता गळाला लावला!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय नेत्यांनी जोरदार केली आहे. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असाच सामना रंगणार असून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी महायुतीला रोखण्यासाठी मॅन टू मॅन मार्किंग सुरु केल्याचे दिसून येत आहे. रविवारी भाजपचे आमदार जयकुमार रावल यांच्या शिंदखेडा विधानसभा मतदारसंघात शरद पवारांनी मेळावा घेतला. तर आज थेट भाजपचे संकटमोचक म्हणून ओळख असलेले गिरीश महाजन यांच्या विरोधात भाजपचा मातब्बर नेता गळाला लावलं आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला महाराष्ट्रात मोठा फटका बसला तर महायुतीला चांगलं यश मिळाल्याचे दिसून आले. लोकसभेला मिळालेल्या यशानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत मोठी इनकमिंग सुरु आहे. काही दिवसांपूर्वीच कागल विधानसभा मतदारसंघात भाजप नेते समरजित घाटगे यांनी तुतारी हाती घेतली. यामुळे अजित पवार गटाचे नेते हसन मुश्रीफ यांच्या अडचणी वाढणार असल्याचे बोलले जात आहे. तर इंदापूर विधानसभेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे आणि भाजपचे हर्षवर्धन पाटील हे इच्छुक आहेत. हर्षवर्धन पाटील भाजपची साथ सोडून तुतारी फुंकणार असल्याची चर्चा आहे. तसेच महाराष्ट्रातील अनेक बडे नेते शरद पवारांच्या संपर्कात असल्याची माहिती मिळत असून शरद पवारांकडून आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीला रोखण्यासाठी खेळी सुरु असल्याचे बोलले जात आहे.

शरद पवारांचा जयकुमार रावलांच्या मतदारसंघातून हल्लाबोल काल शरद पवार यांनी आमदार जयकुमार रावल यांच्या शिंदखेडा विधानसभा मतदारसंघात शेतकरी मेळावा घेतला होता. या मेळाव्यातून शरद पवारांनी जोरदार हल्लाबोल केला. येथे एक प्रकारची गुंडगिरी सुरु आहे. माजी मंत्री हेमंत देशमुख सारख्या नेत्याला तुरुंगात टाकण्याचे काम केले. हा सत्तेचा गैरवापर आहे. सरकार लोकांच्या सेवेसाठी असते. काही जणांना सत्तेचा माज आला आहे. त्यांना जागा दाखविण्याचे काम या निवडणुकीत आपल्याला करायचे आहे, असे म्हणत त्यांनी आमदार जयकुमार रावल यांच्यावर निशाणा साधला. तर विधानसभेचे माजी सभापती अरुणभाई गुजराथी यांनी आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचाच उमेदवार निवडून येणार, असे म्हटले. तर काही दिवसांपूर्वीच जयकुमार रावल यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे कामराज निकम यांनी शरद पवार गटात प्रवेश केला आहे. हा जयकुमार रावल यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

तर आज शरद पवारांनी गिरीश महाजन यांच्या विरोधात भाजपच्या मातब्बर नेत्याला गळाला लावल्याची माहिती मिळत आहे. भाजपचे जळगाव जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दिलीप खोडपे हे शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा 21 तारखेला जळगाव जिल्ह्यात दाखल होणार आहे. या यात्रेला शरद पवार देखील उपस्थित राहणार आहेत. या यात्रेदरम्यान खोडपे यांचा पक्ष प्रवेश होणार असल्याची माहिती समोर येत आहे. दिलीप खोडपे यांची जळगाव जिल्ह्यात मराठा नेता म्हणून ओळख आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

# नांदेडमध्ये भावी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांचे बॅनर्स

## मुख्यमंत्रीपदासाठी रस्सीखेच?




**मुंबई -** राज्यात आगामी विधानसभेच्या अनुषंगाने राज्यात मोठी तयारी झाली आहे, अशातच आता राज्याच्या मुख्यमंत्रीपदासाठी देखील मोठी रस्सीखेच सुरू झाल्याचं चित्र आहे.विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीतील नेत्यांमध्ये खडाजंगी उडत आहे.अशातच बॅनर वार मधून देखील आपलाच मुख्यमंत्री राहणार आशा आशयाचे बॅनर लागत आहेत. अशातच आता कार्यकर्त्यांकडून आपापल्या नेत्यांच्या मुख्यमंत्रीपदासाठीच्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. नांदेडमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून बॅनर्स लागले आहेत. नांदेड शहरातील अनेक मुख्य चौकात हे बॅनर लागल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. सध्या या बॅनरची जोरदार चर्चा सुरू आहे. महायुतीत जागा वाटपावरून आणि मुख्यमंत्री पदावरून वाद सुरू असून हा वाद आता चव्हाट्यावर येताना दिसत आहे.

बारामतीत उपमुख्यमंत्री अजित पवारांचे भावी मुख्यमंत्री म्हणून बॅनर लागले आहेत. सध्या गणपती उत्सव साजरा केला जात आहे. बारामती शहरातील अखिल भारतीय तांदुळवाडी वेस या गणपती मंडळाने अजित पवारांचा भावी मुख्यमंत्री असा उल्लेख केलेला बॅनर सगळ्यांचं लक्ष वेधून घेत आहे. गेल्या अनेक दिवसापासून बारामतीतील कार्य कर्त्यांची इच्छा आहे की अजित पवार पवार मुख्यमंत्री व्हावेत.. या आधी देखील अनेक वेळा अजित पवारांचे भावी मुख्यमंत्री आशा आशयाचे फ्लेक्स लागले होते.

» Selected

## धक्कादायक! अभिनेत्रीला खोट्या गुन्ह्यात अटक

**मुंबई** : आयपीएस अधिकाऱ्यांनी मुंबईतल्या एका अभिनेत्रीला खोट्या प्रकरणात गोवून, तिला अटक करुन तिचा छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी आंध्र प्रदेशातल्या तीन आयपीएस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. मुंबईतील एका अभिनेत्रीला खोट्या प्रकरणात गोवणे, तिला अटक करणे आणि तिचा छळ करण्याचे आरोप या तिघांवर सिद्ध झाले आहेत. सरकारने यासंबंधी खात्यांतर्गत चौकशी केली होती.मुंबईतील एका मॉडेल आणि अभिनेत्रीने एका व्यासायिकाविरोधात लैंगिक छळाची तक्रार दिली होती. ही तक्रार मागे घेण्यासाठी तिच्यावर दबाव होता. पण, तिने तक्रार मागे घेतली नाही, म्हणून तिला आंध्र प्रदेशमध्ये खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आले आणि तिचा सुमारे दीड महिना शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात आला.

## 'मला संगमनेरमधूनच विधानसभा लढवायला आवडेल- सुजय विखे

**राहाता** -अहमदनगर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत निलेश लंके यांनी पराभव केल्यानंतर माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी आता विधानसभा निवडणुकीसाठी शड्डू ठोकला आहे. काही दिवसांपूर्वी सुजय विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत संगमनेर किंवा राहुरी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली होती. यानंतर आता पुन्हा एकदा सुजय विखेंनी संगमनेरमधून निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर आता राज्यात विधानसभा निवडणुकीची वेध लागले आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीकडून विधानसभेची जोरदार तयारी करण्यात येत आहे. लोकसभा निवडणुकीत अहमदनगरच्या जनतेने सुजय विखेंना डावलून निलेश लंके यांना पसंती दिली होती. यानंतर आता सुजय विखेंनी विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली आहे. सुजय विखेंनी संगमनेर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केल्याने काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात विरुद्ध सुजय विखे पाटील यांच्यात सामना रंगण्याची शक्यता आहे.

# शिक्षण विभागाच्या धरसोडीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान

**अमरावती :** शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) 25 टक्के राखीव जागांवरील प्रवेशाची वाढीव मुदत संपल्यानंतरही अमरावती विभागातील 9 हजार 920 पैकी 3 हजार 416 जागा रिक्त आहेत. प्रवेश प्रक्रियेदरम्यान झालेल्या गोंधळाचा फटका प्रवेशासाठी इच्छूक असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना बसला आहे.

सरकारच्या नियम बदलाच्या फेऱ्यात अर्धे शैक्षणिक वर्ष संपल्याने पालकांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश इतर शाळांमध्ये करून घेतले, त्यामुळे इच्छा असतानाही त्यांना 'आरटीई'तून प्रवेश घेता आले नाहीत. सरकारची दिरंगाई आणि खासगी शाळाधार्जिण्या धोरणामुळे प्रवेश प्रक्रियेला विलंब झाल्याने 3 हजार 416 विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याचे चित्र आहे.

वंचित घटक, सामाजिक आणि आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना आरटीईअंतर्गत 25 टक्के राखीव जागांवर खासगी शाळांमध्ये प्रवेश दिला जातो. यंदा शिक्षण विभागाने 'आरटीई' प्रवेशांच्या नियमांत बदल केल्यामुळे गोंधळ निर्माण झाला. परिणामी न्यायालयात याचिका दाखल होऊन प्रवेशप्रक्रिया ठप्प झाली होती. मात्र, शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशात केलेले बदल घटनाबाह्य असल्याचा निकाल उच्च न्यायालयाने दिला. तसेच खासगी शाळांनी आधी दिलेले प्रवेश अबाधित ठेवून आरटीईअंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा आदेश दिला. त्यानुसार प्रवेशासाठी प्रक्रिया राबविण्यात आली होती.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने यंदा फेब्रुवारी-मार्च 2024 मध्ये शिक्षण हक्क कायद्यात बदल केला. या बदललेल्या नियमानुसार एक किलोमीटर परिसरात शासकीय आणि अनुदानित शाळा असल्यास तेथील खासगी शाळेत 'आरटीई' अंतर्गत प्रवेशास मज्जाव केला. म्हणजे अशा विद्यार्थ्यांना शासकीय किंवा अनुदानित शाळेतच प्रवेश घ्यावा लागणार होता. ही व्यवस्था 'आरटीई'चा कायदा 2009 अस्तित्वात येण्यापुर्वीपासून होती. 'आरटीई'च्या नवीन धोरणामुळे अधिक संख्येने शाळा या प्रक्रियेअंतर्गत समाविष्ट झाल्याचा दावा करणाऱ्या शालेय शिक्षण विभागाने गरीब मुलांवर अन्याय केल्याची प्रतिक्रिया उमटली.

# भुजबळांचे भाषण सुरु असताना मध्येच सुरु झाली हनुमान चालिसा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे भाषण करत असताना अचानक हनुमान चालिसा सुरू झाली. त्यावेळी भुजबळांनी भाषणात व्यत्यय आल्याने त्यांनी मंदिर प्रशासनाला आवाज कमी करण्याची विनंती केली. सध्या सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल होत आहे. यावरुनच खासदार संजय राऊत यांनी भुजबळांना टोला लगावला आहे.

**नेमकं काय घडलं?**

नाशिक- छत्रपती संभाजी नगर राज्य मार्गावरील पिंपळस ते येवला पर्यंत चौपदरी काँक्रिटीकरण रस्त्याचे तसेच चांदवड हद्दीतील लासलगाव विंचूर व म्हसोबा माता ते धारणगाव खेडला झुंगे या रस्त्याचे 694 कोटी रुपयांचे काँक्रिटीकरण भूमिपूजन राज्याचे



अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी भाषण सुरू असताना मध्येच हनुमान चालीसा सुरू झाली. तेव्हा भुजबळ यांनी मंदिर प्रशासनाला आवाज कमी करा, अशी विनंती केली. मी सुद्धा बजरंग बलीचा भक्त आहे बाबा, पण आवाजात भाषण कसे करणार? पोलिस इस्पेक्टर तेवढी दखल घ्या, असंही भुजबळांनी म्हटलं आहे. नंतर भुजबळांनीच जय जय बजरंग बली तोड दे दुश्मन की नली, अशा घोषणाही त्यांनी दिल्या.

**भुजबळ काय म्हणाले?**

सुंदर असे दिल्लीत महाराष्ट्र सदन बांधल्याने जेलमध्ये जावे लागले. पैसे दिले नाही तर भ्ष्टाचार कसला असे म्हणत कोर्टाने केस डिस्चार्ज केली. येवला लासलगाव विधानसभा मतदारसंघात 2 हजार कोटी रुपयांचे काम सध्या सुरु आहे. या मतदारसंघात विकास कामे करण्यासाठी आलो आहे.

**संजय राऊत काय म्हणाले?**

हनुमान चालिसा प्रकरणावरुन संजय राऊत यांनी टोला लगावला आहे. याच्यावरती अजित पवार साहेब यांनी बोललं पाहिजे त्यांचे जे नेते आहेत बॉस आहेत. हनुमान चालीसा ज्या बाई आहेत. अमरावतीतल्या त्या नाशिकला पोहोचल्या पाहिजे आणि भुजबळ फॉर्मवर त्यांनी हनुमान चालीसा वाचायला पाहिजे आहे. का आता तुमची हिम्मत कारण भुजबळ तुमच्या पक्षाशी संबंधित आहेत, असा टोला राऊतांनी लगावला आहे.

# सहा तासांच्या विलंबानंतर मुंबई-दोहा इंडिगो विमान रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** मुंबईतील इंडिगो एअरलाईन्सबाबत सातत्याने नवनवीन अपडेट्स समोर येत असतात. अशातच आज इंडिगो विमानतळावर हवाई प्रवाशांचा मोठा खोळंबा झाल्याची माहिती मिळत आहे. मुंबइहून दोहा-कतारला जाणारे इंडिगोचे विमान तब्बल 6 तासानंतर रद्द करण्यात आले. त्यामुळे या विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी इंडिगोबाबत तीव संताप व्यक्त केला आहे.

» प्रवाशांचा संताप !

मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे 3 वाजून 55 मिनिटांच्या सुमारास उड्डाण करणार होते. मात्र विमानात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे हे विमान 6 तासांनंतर रद्द करण्यात आले.

या विमानात 200 ते 300 प्रवासी होते. प्रवाशांना विमानात चढवल्यानंतर विमान तासनतास विमानतळावरच उभे होते. सुमारे 5 तास प्रवाशांनी विमान उड्डाण होण्याची वाट पाहिली तसेच त्यांना विमानातून उतरण्याची परवानगी देखील दिली नव्हती. परंतु प्रवाशांचा संताप वाढल्यावर क्रू मेंबर्सनी त्यांना फ्लाइटमधून उतरण्याची परवानगी दिली आणि इमिग्रेशन वेटिंग एरियामध्ये नेले. तांत्रिक बिघाडामुळे उड्डाण रद्द करण्यात आल्याचे इंडिगोने म्हटले.

**प्रवाशांचा संताप**

प्रवाशाने असा दावा केला की, या काळात त्याला पाणी आणि अन्नही मिळाले नाही.

**इंडिगोने काय म्हटले?**

इंडिगो एअरलाइन्सने या प्रकाराबाबत एक निवेदन जारी केले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, 'आम्ही विमान एकदा किंवा दोनदा उतरण्याचा प्रयत्न केला, परंतु यश आले नाही. त्यामुळे आम्ही फ्लाइट रद्द केली आहे. पुढील फ्लाइटसाठी रिबुकिंग केले जात आहे. तसेच विमानतळावरील आमच्या टीमने त्यांना खाद्यपदार्थ पुरवले आणि प्रत्येक गरजेमध्ये मदत केली.



होनाजी तरुण मंडळ ट्रस्ट गवळी आळी पुणे

## बाप्पा चालले गावाला...


मिरवणुकीसाठी १७ रस्ते आज बंद आज ता १७ सकाळपासून बुधवारी ता १८ मिरवणूक संपेपर्यंत वाहतूक व्यवस्थे बदल करण्यात आला आहे. प्रमुख १७ रस्ते वाहतुकीस बंद राहणार आहे.




## शिव पार्वती विवाह सोहळा

नवजावान गणेश मंडळ सदाशिव पेठ पुणे





सुवर्ण मंदिर, राजाराम मित्र मंडळ



लकडी पूल येथील श्री छत्रपती संभाजी मंडळाने यंदाच्या वर्षी हनुमान लीला हा पौराणिक हलता देखावा सादर केला आहे.त्याला नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे.



हत्ती गणपती, सदाशिव पेठ



तानाजी मालुसरे यांचा जिवंत देखावा, शिवाजी नगर गावठाण

## तब्बल ३२०० पोलिसांचा तगडा बंदोबस्त

# बाप्पाच्या विसर्जनासाठी पोलीस प्रशासन सज्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरातील मंगळवारी (दि. १७) होणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुकांसाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून त्यानिमित्त विसर्जन घाटांसह ठिकठिकाणी चोख बंदोबस्त ठेवला जाणार आहे. विसर्जन मिरवणुकीत ३२०० पोलिसांचा तगडा बंदोबस्त राहणार आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सुमारे २ हजार १४ सार्वजनिक गणेश मंडळांनी 'श्रीं'ची प्रतिष्ठापना केली. त्यातील सांगवी, तळेगाव दाभाडे यासह काही ठिकाणी सातव्या दिवशी गणेश मंडळांच्या गणपतींचे विसर्जन झाले आहे. उर्वरित सार्वजनिक मंडळांसह घरगुती गणपतींचे आज मंगळवारी (दि. १७) विसर्जन होणार आहे. त्यानिमित्त, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पोलीस सह-आयुक्त डॉ. श्रीकांत महावारकर, अतिरिक्त आयुक्त डॉ. वसंत परदेशी यांनी बंदोबस्तासाठी नियोजन करण्यात आले आहे.

अनंत चतुर्दशीच्या दिवशी सर्वत्र भव्य विसर्जन मिरवणुका निघत असल्याने ठिकठिकाणी गर्दी असते. चिंचवडगावातील चापेकर चौक व पिंपरीतील शगुन चौक या मार्गांवरून मोठ्या संख्येने अनेक गणेश मंडळे मार्गस्थ होतात. तसेच, शहरासह इतर भागांतही मिरवणुकीचे भव्य नियोजन केले जाते. यासह विसर्जन घाटांवरही भाविक मोठ्या संख्येने गर्दी करतात. मोठ्या उत्साहात लाडक्या गणरायाला निरोप दिला जातो. या दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून ठिकठिकाणी बंदोबस्त नेमण्यात येणार आहे. वरिष्ठ अधिकारी सर्व हालचालींवर लक्ष ठेवून आहेत.



### वाहतूक कोंडी टाळण्याचे नियोजन...

● मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी पोलिसांनी वाहतुकीचे चोख नियोजन केले आहे. अनेक मार्गांत बदल केले असून नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. तसेच, पोलिसांनी पथसंचलन, कोम्बिंग ऑपरेशन यासह तडीपार, मोक्का, स्थानबद्ध अशी कारवाईही मोठ्या प्रमाणात केली आहे. गणेशोत्सव शांततेत पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज आहे. सर्वत्र कडेकोट बंदोबस्त नेमण्यात आला आहे. काही संशयास्पद आढळल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी केले आहे.

### असा असेल बंदोबस्त..

| | |
|---|---|
| पोलीस उपायुक्त - ६ | अंमलदार - २४०० |
| साहाय्यक पोलीस आयुक्त - ८ | होमगार्ड - ५०० |
| पोलीस निरीक्षक - ५३ | एसआरपीएफ कंपनी - १ |
| साहाय्यक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक - २४५ | बीडीडीएस पथक - १ |
| | आरसीपी स्ट्रायकिंग - ११ |

"महापालिकेतर्फे गणेशमूर्तींचे संकलन केले जात आहे. घाटांवर कृत्रिम हौद उभारले आहेत. अग्निशमन विभागाने २७ घाटांवर लाइफ जॅकेट, लाइफ रिंग, गळ, बोट, मेगा फोन, दोरी अशा रेस्क्यू साहित्यासह जवान तैनात आहेत. पवना, मुळा, इंद्रायणी नदी घाटांसह क्षेत्रीय कार्यालय स्तरावर विविध ८५ ठिकाणी मूर्तीदान व संकलन केंद्रांची व्यवस्था केली आहे."

— प्रदीप जांभळे पाटील
अतिरिक्त आयुक्त, महापालिका

## आळंदी परिसरात थंडी तापाच्या रुग्णात वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आळंदी शहर परिसरात थंडी तापाचे रुग्ण बऱ्याच प्रमाणात आढळून येत आहेत. उपचारासाठी शहरातील विविध ठिकाणच्या दवाखान्यामध्ये रुग्णांची गर्दी दिसून येत आहेत. काहींना व्हायरल इन्फेक्शन मुळे ताप येऊन प्लेटलेट्स कमी झाल्याने तर काही डेंगूमुळे रुग्ण हॉस्पिटलमध्ये दाखल झाले आहेत.



बहुतांशी दवाखान्यामध्ये थंडी तापाचे रुग्ण उपचारासाठी येत आहेत. पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचून डासांची पैदास झाली आहे. डासांमुळे विविध प्रकारच्या तापाचा प्रसार होत आहे. डासप्रतिबंधक साधनांचा लोकांच्या खिशावर भार पडतो आहे. शहरात डास जास्त प्रमाणात पैदास होऊ नये तसेच डासांपासूनविविध प्रकारचे विषाणूजन्य रोग पसरू नये यासाठी डास प्रतिबंधक औषध फवारणी करणे गरजेचे आहे.

## » Selected



## कान्हे उपजिल्हा रुग्णालयाचे काम अंतिम टप्प्यात

**वडगाव मावळ :** कान्हे उपजिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आले असून त्या कामांची आमदार सुनील शेळके यांनी नुकतीच पाहणी केली. रुग्णालयातील प्रलंबित कामे लवकर पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. रुग्णालयाचे लवकरच लोकार्पण केले जाणार असल्याची माहिती शेळके यांनी दिली.

कान्हे उपजिल्हा रुग्णालयाचे काम बहुतांशी पूर्ण झाले आहे. काही किरकोळ कामे अंतिम टप्प्यात आहेत. रुग्णालयातील सोयी सुविधा, विविध विभागांतील वैद्यकीय सामग्री ही कामे त्वरित पूर्ण करावीत. ट्रॉमा केअर सेंटरमध्येही आवश्यक त्या ठिकाणी सुधारणा कराव्यात तसेच जादा निधीची आवश्यकता भासल्यास तांत्रिक कार्यवाही पूर्ण करुन उर्वरित कामांना गती दिली जावी, अशा सूचना आमदार शेळके यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

## डोणे गावातील मुलांनी दिला स्वच्छतेचा संदेश

**ऊर्से :** गणपती विसर्जन करताना परिसरात कचरा होऊ नये यासाठी नागरिकांकडून काळजी घेतली जाते. मात्र, गणपती विसर्जन करण्यासाठी आलेल्या नागरिकांकडून अनेकदा प्लॅस्टिक, निर्माल्य रस्त्यावर टाकून दिले जाते. त्यामुळे परिसरात कचरा निर्माण होतो. त्यामुळे डोणे येथील काही मुलांनी परिसरात पडलेल्या निर्माल्य आणि प्लॅस्टिकची सफाई केली.

नुकतेच काही गावातील गणपती विसर्जन झाले. यामध्ये डोणे येथील सार्वजनिक गणपतीचे विहिरीत विसर्जन करण्यात आले. मात्र, विसर्जन करताना प्लॅस्टिक, निर्माल्य तेथेच टाकून देण्यात आले. हे निर्माल्य बाजूला रस्त्यावर पडलेले दिसले असताना गावातील वेदांत घारे, राजवीर काळभोर, ऋत्विज काळभोर, शंभूराजे घारे, समर्थ घारे, आराध्या घारे या मुलांनी साफ सफाई केली. बालचमुनी केलेल्या या कार्याची एकता प्रतिष्ठानचे संस्थापक बाळासाहेब घारे यांनी कौतुक केले.

## घोरावडेश्वर डोंगर परिसर 'हरित' करण्याचा संकल्प



**सोमाटणे :** धार्मिक आणि पर्यटनस्थळ असलेल्या घोरावडेश्वर डोंगर परिसरात हवामान आल्हाददायक असावे या उद्देशाने महाविद्यालयीन विद्यार्थी आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्याने एक हजार एक वृक्ष लागवडीचा 'हरित घोरावडेश्वर'चा संकल्प सोडण्यात आला आहे. त्याची नुकतीच सुरुवात करण्यात आली.

घोरावडेश्वर विकास प्रतिष्ठान, नगरसेवक रघुवीर शेलार स्नेहग्रुप आणि डॉ.डी.वाय.पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्यावतीने हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत पहिल्या टप्प्यात घोरावडेश्वर डोंगरावर अर्जुन, वड, कदंब, पारिजात, बेल, करंज, पुत्रवंती, काशीद, कडुनिंब, चिंच आदी जातीचे एक हजार एक वृक्ष लागवड करणे व त्यांचे जतन करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे, भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद, नगरसेवक रघुवीर शेलार, नगरसेवक किशोर भेगडे, पुरुषोत्तम महाराज मोरे, रवींद्र भेगडे, डॉ. मोहन वामन आदींच्या उपस्थितीत वृक्षदिंडी काढण्यात आली.

## अल्पवयीन मुलावर निगडीत कोयत्याने वार; आरोपीस अटक

**निगडी :** 'आमची ज्या लोकांबरोबर भांडणे झालेली आहेत, त्या लोकांबरोबर फिरतो का,' असे म्हणत पंधरा वर्षीय मुलाला लाथाबुक्यांनी बेदम मारहाण करीत डोक्यात कोयत्याने वार केला. ही घटना निगडीतील ओटास्कीम येथे घडली. याप्रकरणी निगडीतील पंधरा वर्षीय मुलाने फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी अली आदम शेख व आरमान ऊर्फ डायमंड मुन्ना खान (दोघेही रा. ओटास्कीम, निगडी) यांना अटक केली आहे.

फिर्यादी हे घरी जात असताना दुचाकीवरून आलेल्या आरोपींनी ओटास्कीम येथे फिर्यादीसमोर दुचाकी थांबवली. 'तू आमचे ज्या लोकांबरोबर भांडणे झालेली आहेत, त्या लोकांबरोबर फिरतो काय, तुला आता जिवंत सोडत नाही' असे म्हणत फिर्यादीस जिवे मारण्याच्या उद्देशाने जबरदस्तीने त्यांच्या दुचाकीवर बसवून अरमान खान याच्या रूममध्ये घेऊन गेले. रूम बंद करून दोघांनी फिर्यादीला कमरेच्या पाट्याने, हाताने व लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. आरोपी अली शेख याने फिर्यादीला जिवे मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या डोक्यात कोयत्याने मारले.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा




**पिंपरी :** विसर्जन मिरवणुकी दरम्यान सुरळीत वीजपुरवठा व वीज सुरक्षेसाठी महावितरणची पुणे परिमंडल अंतर्गत यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. पुणे व पिंपरी चिंचवड शहर तसेच मुळशी, वेल्हे, हवेली, आंबेगाव, जुन्नर, खेड व मावळ तालुक्यांमध्ये सुमारे ४ हजार ५७५ अभियंते,तांत्रिक कर्मचारी तसेच दुरुस्ती कामांसाठी नेमलेल्या कंत्राटदारांचे कर्मचारी आवश्यक साहित्य व साधनसामुग्रीसह वीज ग्राहकांना सेवा देत आहेत. गणेशोत्सव व विसर्जन मिरवणुकीमध्ये वीजसुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेण्यात यावी असे आवाहन महावितरणने केले आहे.

गणेशोत्सवामध्ये मुख्य अभियंता राजेंद्र पवार वीजपुरवठ्याचा सातत्याने आढावा घेत आहे. तसेच वीजसुरक्षेसाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यामध्ये सार्वजनिक गणेश मंडळांची ठिकाणे आणि मोठ्या मिरवणुका निघणारे मार्ग या ठिकाणी गणेशोत्सवापूर्वी वीजयंत्रणेची पाहणी करून देखभाल व दुरूस्तीचे कामे करण्यात आली आहेत.गर्दीच्या ठिकाणी किंवा मिरवणुकीच्या मार्गावर नागरिक किंवा लहान मुले फिडर पिलरवर चढू नयेत यासाठी फिडर पिलरवर खिळे लावण्यात आले आहेत.

## रानभाज्या महोत्सव...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** डॉ डि. वाय .पाटील महाविद्यालयाच्या वनस्पती शास्त्र विभागाच्या पुढाकाराने रानभाज्या महोत्सवानिमित्त जंगलात जाऊन वनस्पती अभ्यासक प्रा.किशोर सस्ते यांच्या मार्गदर्शनाखाली या रानभाज्या गोळा करण्यात आल्या.

# डि. वाय. पाटील महाविद्यालयात 'रानभाज्या महोत्सव'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** रानभाज्यांचे आहारातील महत्त्व ओळखून त्यांचे आजुबाजूच्या जंगलात संगोपन आणि संवर्धन होऊन जंगल राखली जावीत या उद्देशाने पिंपरी चिंचवडमधील डॉ डि. वाय .पाटील महाविद्यालयाच्या वनस्पती शास्त्र विभागाच्या पुढाकाराने वनस्पती अभ्यासक प्रा. किशोर सस्ते यांच्या उपस्थितीत रानभाज्या महोत्सव आयोजित करण्यात आला होता .

या महोत्सवानिमित्त आदल्या दिवशी जंगलात जाऊन वनस्पती अभ्यासक प्रा.किशोर सस्ते यांच्या मार्गदर्शनाखाली या रानभाज्या गोळा करण्यात आल्या. जंगलातील गोळा केलेल्या भाज्यांच्या विविध पाककृती मुलांनी दुसऱ्या दिवशी महाविद्यालयात सादर केल्या. या भाज्यां मध्ये झेला, खडक अंबाडी,निवडुंग, तालिमखाना, करांदे, गोमटी, टाकळा, आघाडा, चिचू, दिंडा, भारंगी, चाई मोहर, रानकरडई, बाफळी, चिचुर्डा, भोवरी आणि कर्टुली अशा अनेक रानभाज्यांचे प्रदर्शन आणि पाककृती सादर केल्या गेल्या.

विद्यार्थ्यांनी जंगली वनस्पतींच्या आंबट, कडू, तुरट, गोड अशा चवी अनूभवल्या. या रानभाज्या आहारातील महत्त्व,औषधी गुणधर्म, ओळख आणि पाककृती या विषयावर प्रा किशोर सस्ते यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. मुलांनी वेगवेगळ्या रानभाज्यांचा वापर करून विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे रुचीरंजन केले .

विद्यार्थ्यांना रानभाज्यांचा रंग वापरून पुलाव, विविध सरबते, पेय आणि चहा केला होता. रानभाज्या च्या विविध पाककृती मध्ये वड्या, भजी, चाट, थालीपीठ, भाजी आणि रानमेवा लोणचे अशा विविध पाककृती सादर केल्या होत्या. प्रा. किशोर सस्ते यांनी रानभाज्या पाककृती स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

## पाळीव श्वानांना मनोरंजन व खेळण्याची व्यवस्था

# महापालिकेच्या 'डॉग पार्क'ची श्वानप्रेमी नागरिकांना भुरळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे सौदागर :** पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक उच्चभ्रू सोसायटीत पाळीव श्वानांची संख्या वाढत असल्यामुळे महापालिकेने पिंपळे सौदागर-मधील गोविंद चौकात ६५ गुंठ्यांत सर्व सोयी-सुविधा असलेले शहरातील पहिलेच 'डॉग पार्क' तयार केले आहे. या 'डॉग पार्क' ला शहरातील विविध भागातील श्वानप्रेमी नागरिकांना चांगलीच भुरळ पडली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने सुमारे दीड हजार श्वान परवाने वितरित केले आहेत. शहरातील वाकड, पिंपळे सौदागर, पिंपळे निलख, नवी सांगवी, रहाटणी, पिंपळे गुरव, रावेत या भागात श्वान परवाना धारक नागरिकांची सर्वाधिक संख्या आहे. श्वान परवाना घेणा-या नागरिकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. शहरातील श्वानप्रेमी नागरिक रस्त्यावर आणि फुटपाथवर श्वानांना फिरवत असतात. त्यामुळे अनेक भागात अस्वच्छता निर्माण होते. त्या श्वानांना स्वतंत्र पार्क असावे, तेथे श्वानांना खेळण्यास जागा असावी, अशी मागणी श्वान प्रेमी नागरिक करत होते. त्यानुसार महापालिकेने पिंपळे सौदागर येथे स्वराज चौक, गोविंद गार्डन जवळ 'डॉग पार्क' विकसित केले आहे. मनुष्य आणि प्राणी यांच्यामधील संघर्ष कमी करण्यासाठी महापालिकेने हे 'डॉग पार्क' उभारले आहे. या मध्ये पाळीव श्वानांना मनोरंजन व खेळण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.



### 'डॉग पार्क' मधील सुविधा...

● **पिंपळे सौदागरमधील डॉग पार्कमधील श्वानांना सुविधा तयार करण्यात आल्या आहेत. यामध्ये २ फूट उंच दगडी भिंतीवर बाह्य कुंपण ५ फूट उंच आहे, वेगवेगळ्या कुत्र्यांसाठी वेगवेगळी खेळण्यासाठी लॉन, श्वानांना फिरण्यास फुटपाथ, मोकळे खेळण्यास डॉग माऊंन्ड, सेलिब्रिशन पॉईन्ट, डॉग कॅफे, पिण्याच्या पाण्याची सोय, मालकांसाठी विश्रांती कक्ष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

# ससून हॉस्पिटलमध्ये ४.१८ कोटीचा घोटाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** ससून रुग्णालय पुन्हा अडचणीत आले आहे. यावेळी अकाउंटंट आणि कॅशियरसह २४ कर्मचाऱ्यांवर ४.१८ कोटी रुपयांची चोरी केल्याचा आरोप आहे. रुग्णालयाच्या खात्यातून पैसे गहाळ झाल्याने रुग्णालयाचे अधिकारी गोरोबा आवटे यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. दोन्ही आरोपींनी त्यांच्या अधिकाराचा वापर करून परवानगीशिवाय स्वत:च्या आणि इतर कर्मचाऱ्यांच्या खात्यात पैसे ट्रान्सफर केल्याचे तपासात उघड झाले आहे. हा विश्वासार्हतेचा गंभीर भंग आहे. रुग्णालयाचा पैसा हा रुग्णांच्या सेवेसाठी आहे, वैयक्तिक फायद्यासाठी नाही. आवटे यांनी त्वरीत कारवाई आणि चोरीची रक्कम वसूल करण्याचे आश्वासन दिले.


गेल्या आठवड्यात शनिवारी बंड गार्डन पोलिस ठाण्यात फसवणूक, गुन्हेगारी विश्वासाचा भंग आणि भारतीय दंड संहितेच्या कलमांतर्गत समान हेतूने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ३१ जुलै २०२३ ते २४ जानेवारी या कालावधीत घडली. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे पाठवला जात आहे.

## पालिकेच्या विविध विभागात १६२ विद्यार्थी रुजू

# विद्यार्थ्यांना महापालिकेत प्रशिक्षणाची संधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** युवकांना प्रत्यक्ष कार्याचा अनुभव देऊन त्यांच्यात रोजगार क्षमता निर्माण करण्यासाठी महापालिकेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. त्यानुसार शहरातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन महापालिकेत काम करण्यासाठी नोकरीची संधी देण्यात आली आहे. यामध्ये पालिकेच्या आस्थापनेवर विविध विभागात १६२ विद्यार्थी रुजू झाले असून १२० विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणासाठी नोंदणी केली आहे. या विद्यार्थ्यांना पालिकेत प्रशिक्षणासह रोजगाराची संधी मिळाली आहे.



महापालिकेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत १२ वी, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या सुमारे ५७५ युवकांना प्रशिक्षणासाठी संधी देण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना विद्यावेतन दिले जात आहे. त्यामध्ये १२ वी उत्तीर्ण उमेदवाराला दरमहा ६ हजार , आयटीआय किंवा पदविका उत्तीर्ण उमेदवाराला दरमहा ८ हजार तसेच पदवी किंवा पदव्युत्तर पदवीधारक उमेदवाराला दरमहा १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येते.

पालिकेच्या आस्थापनेवर मंजूर असलेल्या एकूण पदांच्या ५ टक्के पदे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत तात्पुरत्या कालावधीसाठी भरण्याचा निर्णय घेण्यात आला. शहरातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरी मिळवण्यास, उद्यमशीलता वाढवण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवली आहे.

महापालिकेत सामान्य प्रशासन विभागात लिपिक ३२, शिपाई १८, उद्यान विभागात माळी ४, समाज विकास विभागात फिल्ड सर्वेअर १६, माहिती व तंत्रज्ञान विभागात ३४, डीटीपी ऑपरेटर २, स्थापत्य विभागात सिव्हिल इंजिनिअर ३२, वायरमन ४, इलेक्ट्रिकल इंजिनिअर ४, आरोग्य विभागात ४, आयटीआय १२ असे एकूण १६२ जण रुजू झाले आहेत. तब्बल १२० विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या पदासाठी नावनोंदणी केलेली आहे. हे सर्वजण ९ सप्टेंबर २०२४ पासून महापालिकेच्या आस्थापनेवर प्रशिक्षण कालावधी ६ महिन्यांसाठी रुजू झाले आहे.


#रा

# वाढत्या प्रदूषणास २९ टक्के कारखाने कारणीभूत
# प्रदुषणामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** गेल्या तीन वर्षात प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांच्या संख्येत ४६ टक्क्यांनी वाढ झाली असून त्यात वायू, जल आणि घातक टाकावू पदार्थांचे प्रदूषण करणाऱ्या जादा ६३० कारखान्यांची भर पडली आहे. शहर परिसरातील वाढत्या प्रदूषणास २९ टक्के कारखाने कारणीभूत ठरत असल्याचे पर्यावरण अहवालातून समोर आले आहे. यावर वेळीच उपाययोजना न केल्यास परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता पर्यावरण अभ्यासकांनी व्यक्त केली आहे.

**प्रदूषणांचे उगममार्ग...**
- वायुप्रदूषण कंपन्यांतून निघणाऱ्या धुरामुळे
- जलप्रदूषण नदीपात्रात रासायनिक सांडपाणी मिसळण्यामुळे
- घातक पदार्थाचे प्रदूषण
- टाकाऊ पदार्थांच्या निपटाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे




## ३००% नफा देण्याच्या आमिषाने महिलेची फसवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** स्टॉक मार्केटमध्ये शेअर्स खरेदी-विक्री करून तीनशे टक्के नफा देण्याचे आमिष दाखवून महिलेची दहा लाख रुपयांची फसवणूक केली. हा प्रकार पिंपरीगाव येथे घडला.याप्रकरणी पिंपरी गावातील ३९ वर्षीय महिलेने पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यातआला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी यांच्या मोबाईलवर कॉल व मेसेजद्वारे संपर्क साधला. स्टॉक मार्केटमध्ये शेअर्स खरेदी विक्री करून ३०० टक्के नफा देतो, असे फिर्यादीला सांगितले. त्यानंतर वेगवेगळ्या बँक खाते क्रमांकावरून शेअर्स खरेदीच्या नावाने शेअर्समध्ये पैसे गुंतविण्यास सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन करीत त्यांची दहा लाख १९ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली. पिंपरी पोलीस तपास करीत आहेत.

## » Selected



## गणेशमूर्ती विसर्जनासाठी मनपा-कडून कृत्रिम हौदाची व्यवस्था

**पिंपरी :** गणेश विसर्जनासाठी नगरपरिषदेकडून शहरातील विविध ठिकाणी कृत्रिम विसर्जन हौदासह निर्माल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी पर्यावरणाच्यादृष्टीने त्याचा वापर करावा, असे आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

गणपती विसर्जन मिरवणुकीसाठी सर्व मिरवणूक मार्गावर भाविकांच्या सोयीसाठी इतर अडथळे, झाडांच्या फांद्या, झाडे-झुडपे काढून घेण्यात आल्या आहेत. घरगुती व सार्वजनिक मंडळांच्या गणपती विसर्जनासाठी शहरात व क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यकक्षेत कृत्रिम विसर्जन हौद व निर्माल्य कलश ठेवण्यात आले आहेत. तसेच आवश्यकतेनुसार कॅनॉल व नदीपात्राच्याकडेला बॅरिकेडिंग उभे करण्यात आले आहेत. कॅनॉल व नदी पात्रात पूर्णवेळ सुरक्षेसाठी सतर्क असणार असून अग्निशमन विभागाचे पथक तैनात आले आहेत.



## फिजिओथेरपी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सन्मान

**आकुर्डी :** फिजिओथेरपी क्षेत्रातील वाढती मागणी पाहता, विद्यार्थ्यांसाठी या क्षेत्रात करिअर करण्याची उत्तम संधी असल्याचे मत इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट (आय ए पी) महाराष्ट्र वूमन सेलच्या प्रमुख डॉ. सुवर्णा गणवीर यांनी व्यक्त केले.

आकुर्डी येथील रत्नलोक हॉटेलमध्ये रविवारी (दि. १५) (आय ए पी) पिंपरी चिंचवड शाखा आणि वूमेन सेलच्यावतीने आयोजित कार्यक्रमात, पुणे आणि पिंपरी चिंचवड येथील फिजिओथेरपी महाविद्यालयातील १५ पदवीधर व ८ पदव्युत्तर परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा आणि काही डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुवर्णा गणवीर आय.ए.पी महाराष्ट्र वूमन सेलच्या प्रमुख, डॉ. उज्वल येवले आय ए पी महाराष्ट्र हेड पिंपरी चिंचवड शाखेच्या प्रमुख डॉ. संजीवनी कांबळे, आय ए पी पिंपरी चिंचवड शाखा प्रमुख डॉ. जयश्री कोतवाल, डॉ. तुषार पालेकर, डॉ. स्नेहल घोडे , डॉ. फरहीन पटेल, डॉ. गौरांग बक्षी, डॉ. मयुरा देशमुख, डॉ. स्मिता शिंदे उपस्थित होते.

## ना. धों. महानोर यांच्या गीतांनी रसिक मंत्रमुग्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपळे सौदागर :** शेत शिवराचे नातं सांगणारे " दूरच्या रानात केळीच्या बनात ", श्रृंगार रसाची उधळण करणारे " चांद केवड्याची रात ", वाडी - वस्तीवरील जीवनाचे चित्र रेखाटणारे " आम्ही ठाकरं ठाकरं " या एकापेक्षा एक सरस कविता आणि गीतांची मैफल " नभं उतरु आलं " उपस्थित रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात रंगली. मराठीतील ख्यातनाम कवी पद्मश्री ना. धों. महानोर यांच्या जन्मदिनानिमित्त भाजपा सांस्कृतिक प्रकोष्ट आणि पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सदर मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. रविवार दि. १५ रोजी सांगवी येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहात ही मैफल संपन्न झाली. प्रारंभी ना. धों. महानोर यांच्या कन्या सरला शिंदे, हभप जांभुळकर महाराज, विजय भिसे, उन्नती सोशल फाऊंडेशनचे संचालक डॉ. कुंदाताई भिसे, संजय भिसे यांच्याहस्ते दिपप्रज्वलन आणि ना. धों. च्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर रसिकांच्या प्रतिसादात रंगत गेलेल्या या मैफलीत सतिश इंगळे, धनंजय पवार, मनिषा निश्चल आणि भारती न्यायाधीश या गायक कलावंतांनी शेत - शिवाराची निगडीत बहारदार गाणी सादर करुन रसिकांची मने जिंकली .

दोन ते अडीच तास उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या मैफलीचे सुत्रसंचलन संतोष घुले यांनी केले. मिहिर भडकमकर यांच्या संगीत संयोजनाने नटलेल्या या मैफलीत गायकांना अमान सय्यद ( सिंथ ), विक्रम भट ( तबला ) , पद्माकर गुजर ( साईड रिदम ) पिनाक न्यायाधीश ( गिटार ), अभिजित भदे ( ऑक्टोपॅड ) या वादक कलावंतांनी साथसंगत केली. पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशनचे संस्थापक विजय भिसे यांनी ना. धों. महानोरांना श्रद्धांजली अर्पण करण्याच्या दृष्टीकोनातून हा उपक्रम राबविला असल्याचे आपल्या प्रास्ताविकात नमुद केले.

## एमआयटी महाविद्यालयात नॉलेज फ्यूजन फेस्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आळंदी येथील एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज वाणिज्य विभाग तर्फे तीन दिवसीय कॉमर्स एरिना, नॉलेज फ्यूजन फेस्ट २०२४ आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ४२७ महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभाग घेतला . या कॉमर्स एरिना, नॉलेज फ्यूजन फेस्ट २०२४ ने विद्यार्थ्यांना विविध वाणिज्य क्षेत्रातील ज्ञान आणि कौशल्ये वाढवण्यासाठी एक गतिमान व्यासपीठ उपलब्ध करून दिले. या कार्यक्रमात पहिल्या दिवशी श्रीनिवास आणि दुसऱ्या दिवशी साजित खेतानी (स्ट्रॅटेजी कन्सल्टंट) यांनी विद्यार्थ्यांच्या करिअर विकास, उद्योजकता आणि स्टार्ट-अप करिअरसाठी प्रेरक असणाऱ्या उपक्रमाची माहिती दिल .

यामध्ये विविध संघांनी नाविन्यपूर्ण व्यवसाय कल्पना प्रदर्शित केल्या. प्रामुख्याने स्टॉक मार्केट सिम्युलेशन, मार्केट डायनॅमिक्समध्ये ,मार्केटिंग स्ट्रॅटेजी आणि चॅलेंज, सर्जनशील विपणन अंर्गत विकसित केल्या मॉडेलसची मांडणी करून सादरीकरण केले. याव्यतिरिक्त, उद्योजकीय मानसिकता वाढवण्यासाठी उद्योजकता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, यामध्ये आर्थिक साक्षरता प्रश्नमंजुषा, सहभाग वित्त आणि अर्थशास्त्राच्या ज्ञानाची चाचणी घेण्यात आली. सध्याच्या आर्थिक समस्यांवरील विषयांवर चर्चा करण्यात आली. डी वाय पाटील कॉलेज , नवरोसजी वाडिया कॉलेज, प्रतिभा कॉलेज, एम आय टी एओई कॉलेज या महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभाग घेतला.



पान १ वरून

## पुण्यातून धावली 'वंदे भारत'

पाटील, खा. मेधा कुलकर्णी, आमदार सुनील कांबळे, भीमराव तापकीर, माधुरी मिसाळ, विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे, पुणे मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राला पुणे- हुबळी, पुणे- कोल्हापूर आणि नागपूर सिकंदराबाद या तीन वंदे भारत रेल्वेची भेट दिली आहे. यामुळे महाराष्ट्रातील प्रवाशांचा प्रवास गतिमान आणि सुखकर होणार आहे. ही भारताने स्वत: आपल्या देशात तयार केलेली आंतरराष्ट्रीय दर्जाची ट्रेन आहे, असेही ते म्हणाले.

तत्पूर्वी केंद्रीय राज्यमंत्री श्री. मोहोळ म्हणाले, देशामध्ये १६ वंदे भारत ट्रेनचे लोकार्पण होत असताना महाराष्ट्रात तीन आणि पुण्यासाठी दोन ट्रेन सुरू होत असल्याची पुणे शहरासाठी आनंदाची बाब आहे. गेल्या दहा वर्षात रेल्वेच्या विकासासाठी २३ लाख ६४ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यामध्ये नवीन रेल्वे स्थानकांची कामे, अमृत योजना, आदर्श रेल्वे स्थानक आदी अनेक कामे सुरू असून जवळपास १ हजार ६४ स्थानकांचा कायापालट त्यांच्या नवीनीकरणाच्या कामातून होत आहे, असेही ते म्हणाले. मोहोळ यांनी पुढे सांगितले, पुणे- लोणावळा तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेचे कामही लवकरच सुरू होईल. त्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार प्रत्येकी २ हजार ५०० कोटी रुपये देणार असून त्यामुळे पुणे-मुंबई प्रवासातील वेळ तर कमी करण्यासाठी उपयुक्त होणार आहे. पुणे ते दिल्ली स्लीपर वंदे भारत ट्रेनबाबतही केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे मागणी करण्यात आली आहे. पुणे रेल्वे स्थानकाची जागा अपुरी पडत असल्यामुळे पुढील काळात ऊरुळी कांचन येथे भव्य हार्बर टर्मिनल उभे करण्याबाबतचा आराखडा करण्यात आला असून लवकरच याबाबत कार्यवाही सुरू होईल, असेही श्री. मोहोळ म्हणाले.यावेळी खासदार श्रीमती कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे यांनी प्रास्ताविक केले.

## पुणे पुन्हा हादरले

नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर गोळीबार करून त्यांची हत्या करण्यात आली होती. ही घटना ताजी असतानाच दुसरी गोळीबाराची घटना घडल्याने पुणे शहरातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पुण्यात माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची हत्या रविवारी सायंकाळी पुण्यातील नाना पेठे येथे वनराज आंदेकर यांच्यावर गोळीबार करून त्याचबरोबर कोयत्याने वार करण्यात आला. जवळपास 12-13 जणांची वनराज आंदेकर यांच्यावर हल्ला केल्याचं सीसीटिव्हीच्या माध्यमातून समोर आलं आहे. सदर प्रकरणी पुणे पोलिसांनी अनेकांना ताब्यात घेतलं आहे. या घटनेनंतर आंदोकर यांच्या बहीण, मेहुणा, भाचा यांच्यासह 15 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, आरोपींना अटक करण्यात आली आहे. प्रथमदर्शी ही हत्या कौटुंबिक वादातून केल्याचं समोर आलं मात्र, आता या घटनेबाबत अनेक नवनवीन खुलासे समोर येऊ लागले आहेत. या घटनेला एक महिनाही झाला नाही, तोपर्यंत उरूळी कांचन येथे गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे.

## राहुल यांची जीभ कापणाऱ्यास ११ लाख - गायकवाड

यामुळे काँग्रेसचा खरा चेहरा समोर आला आहे. नुकत्याच झालेल्या अमेरिका दौऱ्यात राहुल गांधी यांनी आरक्षण संपवण्याची भाषा केली होती. त्यातून मुळातच आरक्षणाला विरोध करणारी मानसिकता दिसून येते. राहुल गांधींची जीभ कापणाऱ्याला मी ११ लाख रुपयांचे बक्षीस देईन, असे गायकवाड यांनी या व्हिडिओत म्हटले आहे.

राहुल गांधी यांच्या वक्तव्याला जनतेचा सर्वात मोठा विश्वासघात असल्याचे सांगत शिवसेना आमदार म्हणाले की, मराठा, धनगर आणि ओबीसी सारखे समाज आरक्षणासाठी लढत आहेत, पण त्याआधी राहुल गांधी त्याचे फायदे संपवण्याची भाषा करत आहेत. गायकवाड यांनी राहुल गांधी यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून महाराष्ट्रातील अनेक काँग्रेस नेत्यांनी गायकवाड यांच्यावर टीका केली. विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी शिवसेनेच्या आमदाराचे वक्तव्य बकवास असल्याचे सांगत



त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. असे वक्तव्य करणे कायद्याच्या विरोधात आहे. अन्यथा येत्या काळात महाराष्ट्राची जनता तुम्हाला तुमची जागा दाखवून देईल.

काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले की, संजय गायकवाड हे समाजात आणि राजकारणात राहण्याच्या लायकीचे नाहीत. महाराष्ट्राचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस गायकवाड यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करतात का, हे पाहावं लागेल.

तर काँग्रेसचे आमदार भाई जगताप यांनीही या वक्तव्याचा निषेध करत या लोकांनी राज्याचे राजकारण बिघडवले आहे, असे म्हटले आहे.

## सरकारचे सकारात्मक पाऊल

या सोबतच या बैठकीत धनगर आणि धनगड एकच असून या बाबत लवकरच जीआर काढण्याचं महत्वाचं आश्वासन देण्यात आलंन आहे. हा जीआर कायद्याच्या कसोटीवर न्यायालयात टिकवा या साठी त्याचा मसुदा तयार करण्यात येणार आहे, असे संभूराज देसाई म्हणाले. यासाठी दोन वरिष्ठ सनदी अधिकारी व सखल धनगर समाजाच्या पाच प्रतिनिधींची समिती स्थापन केली जाणार आहे. ही समिती पुढच्या चार दिवसांत मसुदा तयार करणार आहे. यानंतर हा मसुद्यावर राज्याच्या महाधिवक्त्यांचे मत घेतले जाणार आहे. शंभुराज देसाई म्हणाले, धनगर व धनगड एकच असल्याचा जीआर सरकारने काढावा, अशी मागणी गेल्या अनेक दिवसांपासून धनगर समाजाची होती. या मागणीवर या बैठीकीत सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

**आचारसंहितेपूर्वीच अधिसूचना निघणार ; पडळकर**

राज्यात मराठा, ओबीसी, धनगर व मुस्लीम आरक्षणाचा प्रश्न तापलेला असतानाच भाजपाचे विधान परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकरांनी धनगर आरक्षणाबाबत मोठं वक्तव्यकेलं आहे. विधानसभा निवडणुकीआधी आचारसंहिता जाहीर होण्याआधीच धनगर आरक्षणाबाबतची अधिसूचना जारी केली जाईल, असा दावा गोपीचंद पडळकर यांनी केला आहे. लवकरच धनगर आरक्षणाचा प्रश्न सुटेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## जरांगेंचे उपोषण

मारून नेली, असा आरोप केला जातो. आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारला वेळ देत उपोषणाला बसण्याचे जाहीर केले आहे.त्यानूसार मध्यरात्रीपासून मनोज जरांगे पाटील अंतरवाली सराटीत पुन्हा उपोषणाला बसणार आहेत. मला राजकारण करायचे नाही, माझ्या समाजाला राजकारण करायचे नाही. हक्काचे आरक्षण द्या, तुम्हीच दिलेले शब्द, आश्वासन पुर्ण करा, असे आवाहन या निमित्ताने मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला केले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आतापर्यंत केलेल्या पाच उपोषणातून सरकारला अनेक धक्के बसले आहेत.

## राज्याला गृहमंत्री आहेत कि नाही- आदित्य ठाकरे

त्याचे काय? असा प्रश्न ठाकरे यांनी केला. शिवसेनेचे संपर्क प्रमुख सचिन अहिर, शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे व अन्य पदाधिकारी ठाकरे यांच्यासमवेत होते. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंडळालाही ठाकरे यांनी भेट दिली. त्यानंतर शहरातील मानाचे तसेच अन्य महत्वाच्या गणपती मंडळात जाऊन त्यांनी गणपतीची आरतीही केली.

## प्रमाणपत्राअभावी ११ गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड रद्द

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका आस्थापनेवर क संवर्गातील विविध प्रवर्गातून लिपिक पदावर निवड झालेल्या ११ उमेदवारांनी महापालिका प्रशासनाशी कोणातही संपर्क साधला नाही. महापालिका सामन्य प्रशासनाने संपर्क करूनही त्याला प्रतिसाद न दिल्याने या सर्व उमेदवारांची निवड महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने रद्द केली आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी याबाबतचा आदेश काढला आहे. महापालिका आस्थापनेवरील लिपिक पदाकरिता नोकरभरती करण्यात आली. याकरिता घेतलेल्या परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची निवड व प्रतीक्षा यादी पालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने २० फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिद्ध केली होती.

त्या निवड यादीमधील गुणत्ताधारक उमेदवारांना पुर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी व शारिरीक पात्रता तपासणी करून त्याचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. मात्र तीन उमेदवारांनी ही प्रमाणपत्र सादर केली नाहीत. तर एका उमेदवाराने शारिरीक पात्रता तपासणी प्रमाणपत्र सादर केले नाही. या उमेदवाराला मुतदवाढ देऊन संधी देऊनही त्याने वेळेत हे प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यामुळे त्याची उमेदवारी रद्द करण्यात आली आहे.

## रोझ व्हॅली सोसायटीत पर्यावरण-पूरक प्रकल्प

**पिंपळे सौदागर :** येथील रोझ व्हॅली सोसायटीतील रहिवाशांनी सोसायटीमध्ये विविध पर्यावरणपूरक प्रकल्प राबविले असून ते यशस्वीपणे राबवले जात आहेत. यापैकी एक उपक्रम म्हणजे स्वयंचलित लिफ्टची स्थापना, ज्यामुळे समाजासाठी ३०% वार्षिक ऊर्जा बचत अपेक्षित आहे, ज्यामुळे आर्थिक भार कमी होईल आणि लक्षणीय बचत होईल. या प्रकल्पाचे उद्घाटन १५ सप्टेंबर २०२४ रोजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, नगरसेविका शीतल नाना काटे आणि पिंपरी चिंचवड शहर पोलीस उपायुक्त माधुरी कांगणे यांच्या हस्ते करण्यात आले.

**१५ ते २० वाहनांची तोडफोड**

# शहरात वाहन तोडफोडीचे सत्र सुरुच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शहरात गेल्या काही दिवसांपासून वाहन तोडफोडीचे सत्र सुरु आहे. आता पिंपळे-गुरव परिसरात दोघांनी १५ ते २० वाहनांची तोडफोड केली आहे. ही घटना रविवारी (दि. १५) पहाटे चार वाजताच्या सुमारास मयूर नगरी येथे घडली.

सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पिंपळे गुरव परिसरातील मयूर नगरी येथे रस्त्याच्या बाजूला पार्क केलेल्या वाहनांची दोन अनोळखी तरुणांनी तोडफोड केली. पहाटे चार वाजताच्या सुमारास दोघेजण तोंडाला रुमाल बांधून



आले. त्यांनी दिसेल त्या वाहनावर कोयत्याने मारून वाहनांचे नुकसान केले.

वाहनांच्या काचा फोडण्यात आल्या आहेत. घटनेची माहिती मिळतात सांगवी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तोडफोडीचा संपूर्ण प्रकार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज हस्तगत केले आहे. तोडफोड करणाऱ्या दोघांचा शोध सांगवी पोलीस घेत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून शहरातील समाजकंटक वाहनांची तोडफोड करत असल्याचे दिसून येत आहे. शहराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये हे तोड-फोडीचे प्रकार सुरुच आहेत. तोडफोड प्रकरणांमध्ये वाहनांच्या काचा फुटल्याने त्याबाबत विमा संरक्षण देखील वाहन मालकांना मिळत नाही. त्यामुळे वाहन मालकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. अशा समाजकंटकांवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

#रा

## स्थानिक गुन्हे अन्वेषण व उरुळी कांचन पोलिसांची कारवाई

# एक बंदुक,२१५ जिवंत काडतुस केले हस्तगत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन** आर्थिक देवाण - घेवाणीतून उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोळीबार करुन खुनाचा प्रयत्न करणारा लँड माफिया दशरथ उर्फ बापू शितोळेला रेल्वे रुळाच्या पलीकडे असलेल्या शेतातून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून पोलिसांनी एक बंदुक, १७५ जिवंत काडतुस व पिस्टलचे ४० जिवंत काडतुस केले हस्तगत केले. याप्रकरणी एकूण ५ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण (ग्रामीण) व उरुळी कांचन ग्रामीण पोलिसांनी हि




कारवाई केली आहे.

आरोपी बापू उर्फ दशरथ विठ्ठल शितोळे (वय - ४६), निलीमा बापु उर्फ दशरथ शितोळे (वय - ४२), जिग्नेश बापू उर्फ दशरथ शितोळे (वय-१९), आशा सुरेश भोसले (वय-५२), निखील अशोक भोसले (वय- २५), सर्व रा. इनामदारवस्ती, कोरेगाव मुळ ता. हवेली) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयाने बुधवार (ता. १८) पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. पंकज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. पंकज देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी शेतकरी काळुराम महादेव गोते व शरद कैलास गोते (दोघे रा.बिवरी ता. हवेली) यांचे आरोपी बापू उर्फ दशरथ विठ्ठल शितोळे यांच्याशी आर्थिक व्यवहार होते. यामध्ये गोते यांचे शितोळे यांच्याकडे चाळीस लाख रुपये दीड वर्षापूर्वी दिलेले होते. काळुराम गोते यांना त्यांचे पैसे परत देतो माझ्या घरी या असे सांगितले होते.

घरी बोलावून पैसे परत मागितल्याच्या रागातून बापू शितोळे यांनी त्यांच्याकडील परवाना असलेल्या पिस्टलमधुन काळुराम गोते यांच्यावर जिवे ठार मारण्याचे उद्देशाने चार राऊंड फायर केले. यामध्ये काळूराम गोते यांना हाताला व पायाला गोळ्या लागून गंभीर जखमी झाले आहेत. तर शरद गोते यांना मारहाण करण्यात आली.याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी घटनास्थळी भेट दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून स्थानिक गुन्हे शाखा, उरुळी कांचन पोलीस स्टेशन कडील वेगवेगळी पथके तयार करुन आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली.

## वडज उपसा सिंचन योजनेचे प्रत्यक्ष काम चालू करा



### मिना खोऱ्यातील जनतेचा ४० वर्षाचा संघर्ष थांबवा
### म.न.से.तालुका अध्यक्ष तानाजी तांबे यांची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** फक्त तोंडी मंजुरी आणि निधी मिळून वडज उपसा सिंचन योजना होईल असे भासविले जात आहे,आचार संहिता तोंडावर असूनही प्रकल्प कार्यालयातून काहीच हालचाली होताना दिसत नाही,सर्व्हे चुकीच्या पद्धतीने करून किंवा वेळ लावून गेली अनेक वर्ष प्रकल्प असाच रेंगाळत आहे २०१९ पासून मंजुरीच्या गोष्टी ऐकून ऐकून येथील शेतकरी हवालदिल झालेला दिसत आहे. पुन्हा ५ वर्ष असेच चालू राहील आणि वर्षेनवर्ष हा प्रश्न तसाच चालू राहतो की काय? असे येथील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

मीना खोऱ्यातील या पाणी प्रश्नावर मात करण्यासाठी महत्वाची योजना वडज उपसा सिंचन या योजनेसाठी शासनाने ३५ कोटी ५० लक्ष रू.निधी मंजूर करत प्रकल्पाला मान्यता दिली असल्याचे जाहीर झाले होते. या योजनेच्या माध्यमातून सावरगाव, खिलारवाडी, निमदरी, धोंडकरवाडी, एकनाथवाडी,काचळवाडी,पाबळवाडी, निळोबाराय नगर यांसह इतर वाड्या वस्त्यांना याचा लाभ होणार आहे.मात्र हा फक्त वेळ घालवण्याचा खेळ आहे.

यासाठी १९९१ पासून शेतकरी आंदोलन करत आहेत.मागील वर्षी ३० जुलै २०२४ ला मोठ्या संख्येने महिला भगीनी,तरुण वर्ग व शेतकरी सतत अगदी भर पावसात उपोषणासाठी तहसील कचेरी समोर बसले होते.




> गेली ४० वर्ष सरकार फक्त निवडणुकीसाठी जनतेला फसवत आहे, अगोदर निविदा काढा मगच नारळ फोडा, उगाच जनतेला फसवू नका अन्यथा प्रकल्प कार्यालयासमोर मनसे स्टाईलने आंदोलन करण्यात येईल.
> — तानाजी तांबे, म.न.से.तालुका अध्यक्ष

त्यानंतर १५ ऑगस्ट ला जलसमाधी घेण्यापर्यंत विषय गेला.मात्र वर्षा मागून वर्ष गेली मात्र आमच्या नशिबी फक्त घोषणाच आल्या. प्रत्यक्षात काहीच झाले नाही आणि होईल असे वाटत नसल्याने वडज उपसा सिंचन योजनेची प्रत्यक्ष निविदा काढून आचारसंहिता लागायच्या अगोदर योजना चालू व्हावी अशी मागणी मनसे तालुका अध्यक्ष तानाजी तांबे यांनी केली आहे. अन्यथा मोठा उद्रेक होऊन जलसंपदा विभागाच्या कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## माणूस उभा आहे वर्दीतला म्हणून सण साजरा होतोय गर्दीतला

### पोलिसांनी घेतला पोलिस स्टेशनच्या गणेशोत्सवाचा आनंद





**शिक्रापूर ता. शिरुर पोलिसांच्या गणपतीची निघालेली मिरवणूक व सहभागी पोलीस अधिकारी आणि ढोल वाजवण्याचा आनंद घेताना पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** पोलिसांना कोणतेच सण उत्सव साजरे करण्याचा आनंद घेता येत नसतो, प्रत्येक वेळी कोणत्याही सण उत्सव वेळी पोलिसांची सुट्टी देखील रद्द होत त्यांना बंदोबस्तावर हजर रहावे लागते मात्र शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी पोलीस स्टेशनमध्ये बसवलेल्या गणपतीचे मोठ्या उत्साहात विसर्जन करत गणेशोत्सवाचा आनंद घेतला आहे.

शिक्रापूर ता. शिरुर पोलीस स्टेशन येथे सर्व पोलिसांच्या वतीने गणेशोत्सव साजरा करत गणपती बसवण्यात आलेला होता, त्यांनतर दररोज पोलीस अधिकारी, कर्मचारी, पत्रकार यांच्या हस्ते आरती करत गणेशोत्सव साजरा करण्यात आला,सध्या सर्वत्र गणेश विसर्जन कार्यक्रम सुरु होणार असल्याने पोलिसांना बंदोबस्तावर हजर रहावे लागणार असताना पोलीस स्टेशनच्या गणपतीचे विसर्जन आज करण्यात आले, यावेळी सर्व पोलिसांनी उपस्थित राहत सर्वांनी फेटे बांधत गणपतीची पारंपारीक वाद्यच्या तालात मिरवणूक काढत मोठ्या जल्लोषात गणपतीचे विसर्जन करण्यात आले यावेळी पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप साळुंखे, राहुल देशमुख, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहिणी सोनावले, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे, महेश डोंगरे, यांसह सर्व पोलीस अधिकारी कर्मचारी तसेच महिला कर्मचारी सहभागी झाले होते, दरम्यान अनेक पोलीस कर्मचाऱ्यांनी मिरवणुकीमध्ये नाचण्याचा आनंद घेतला तर सर्व पोलिसांना फेटे बांधलेले असल्याने आणि शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणूक निघाल्याने या मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते तर यावेळी बोलताना कोणताही सण उत्सवाचा आंनद आम्हाला घेता येत नसतो मात्र आज गणेशोत्सवाचा आनंद साजरा करता येत असल्याचे समाधान आम्हाला असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पेन्शनच्या लढाईत कायम शिक्षकांबरोबर राहणार : आमदार संजय जगताप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

### जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार संपन्न



**सासवड :** समाज, देश, राष्ट्र घडविण्याचे काम शिक्षक करीत आहेत. सर्व प्रगत देशांत शिक्षकांना मोठी प्रतिष्ठा असून शिक्षणावर सर्वाधिक खर्च केला जातो. मात्र आपल्या देशातील शासन शिक्षकांकडून कोरोना काळातील तसेच निवडणूकांची कामे अशा सर्व भूमिका बजावून घेत असूनही शिक्षकांचे जूनी पेन्शनसारख्या अनेक प्रश्नांची सोडवणूक होताना दिसत नाही. शिक्षकांना पेन्शनची शाश्वतता, संचयती महत्त्वाची असून जुनी पेन्शनच्या लढ्यात कायम शिक्षकांबरोबर राहणार असल्याचे प्रतिपादन आमदार संजय जगताप यांनी केले.

सासवड येथे पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ, जिल्हा शिक्षिका संघ आणि जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडी यांच्या वतीने जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी आ संजय जगताप यांनी, शिक्षकांना मार्गदर्शन करताना शिक्षकांच्या मागण्यांसाठी कायम लढत राहणार असल्याचे सांगितले.

### शिक्षकांचे प्रश्न मांडणारा आमदार..

● आमदार मंडळी निवडणूक आल्यावर शिक्षकांच्या जवळ येतात, निवडणूकांनंतर विचारत नाहीत., मात्र आमदार संजय जगताप हे एकमेव असे आहेत ज्यांनी वेळोवेळी जूनी पेन्शन योजना, शिक्षकांचे प्रश्न विधीमंडळात मांडले. शिक्षकांविषयी तळमळ आणि शिक्षणाबाबत प्रेम असणारे आमदार म्हणून आमदार संजय जगताप यांची ओळख असल्याचे याप्रसंगी अनेक वक्त्यांनी सांगितले.

## लंडन येथे होणार श्री स्वामी समर्थांचा पादुकादर्शन सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** लंडन येथे श्री स्वामी समर्थांच्या पादुकादर्शन सोहळा होणार आहे. परदेशात प्रथमच अशा प्रकारचा पादुका दर्शन सोहळा होत आहे. लंडन येथील स्लाव्ह मित्र मंडळ यांच्या वतीने स्लाव्ह शहरात दिनांक २१ व २२ सप्टेंबर २०२४ दरम्यान श्री स्वामी समर्थ पादुका दर्शन आयोजित करण्यात आला आहे. यामुळे येथील भारतीय नागरिकांना स्वामी समर्थांच्या पादुका दर्शनाचा लाभ होणार आहे. खेड तालुक्याचे व स्वामी समर्थ मठाचे मठाधिपती संतोष कुलकर्णी (काका माऊली) यांच्या माध्यमातून व आशीर्वादाने हा धार्मिक कार्यक्रम परदेशात होत असल्याचे ज्ञानेश्वर



बोडके यांनी सांगितले. बुधवारी (दि.१८) श्री स्वामी समर्थ मठ, मोशी येथुन टाळ - मृदुंगाच्या गजरात स्वामी समर्थ यांच्या पादुकांचे लंडनला प्रस्थान होणार असल्याचे निलेश बोराटे यांनी सांगितले. या कार्यक्रमास परिसरातील राजकिय ,सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. परिसरातील भाविकांनी या प्रस्थान कार्यक्रमास व पादुका दर्शनासाठी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या पादुका दर्शन सोहळ्यात विश्वभ्रमण सोहळ्यातील दादासाहेब करांडे यांच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या देखील पादुका लंडन येथे दर्शनासाठी जात आहेत.

### स्वाक्षरीशिवाय फाईल गेली पुढे

## बायोमायनिंगची निविदा मान्यता प्रस्तावात गोंधळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बायोमायनिंगची निविदा स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पाठविण्यासाठी प्रस्ताव तयार केला. सकाळी साडेदहाच्या सुमारास हा प्रस्ताव लेखा व वित्त विभागाकडे गेला. तेथून तो अवघ्या काही वेळात दक्षता विभागात फाइल तपासणीसाठी गेली. तेथून सकारात्मक शेरा आल्यानंतर अतिरिक्त आयुक्त, आयुक्तांच्या मंजुरीनंतर प्रस्ताव नगरसचिव विभागात आयत्यावेळी दाखल झाला. त्यास दुपारी चारच्या सुमारास स्थायी समितीमध्ये मान्यता देण्यात आली. मात्र या सहा विभागांत प्रवास होताना एका महत्त्वाच्या विभागाचा प्रमुख महापालिकेत उपस्थित नसतानाही त्यांच्या स्वाक्षरीशिवाय फाइल पुढच्या विभागात गेल्याची माहिती सूत्रांनी दिली. महापालिकेत एखाद्या फाइलवर अनेक दिवस काहीच कार्यवाही होत नाही. प्रस्ताव योग्य असला तरी त्यावर निर्णय लवकर घेतला जात नाही. मात्र शुक्रवारीही घनकचरा व्यवस्थापन विभागातील जैविक उत्खननाच्या (बायोमायनिंग) निविदेचा प्रशासकीय कार्य तत्परतेमुळे प्रवास सुसाट झाला.

बायोमायनिंगची निविदा स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यासाठी सहा विभागांमध्ये अवघ्या काही तासांत फाईल फिरवल्याचा प्रकार समोर आला आहे. या निविदेत वाहतूक खर्च (टिपिंग फी) प्रतिटन १३५ रुपये जादा दराने आला होता. तडजोडीअंती ठेकेदाराने अवघ्या नऊ रुपयांनी दर कमी केला. त्यामुळे ९७ कोटींची निविदा स्थायी समितीने मान्य केली.

दोन लाख टन 'आरडीएफ'वर प्रक्रिया केल्याच्या अनुभवाची अट अनिवार्य केल्याने आर्थिक क्षमता असूनही अनेक कंपन्या अपात्र ठरल्या. तर अवघे दोन ठेकेदार पात्र ठरले. यामध्ये भूमी ग्रीन एनर्जी कंपनीने सर्वांत कमी दराची प्रति टन ९७९ रुपयांनी निविदा भरली. महापालिकेने निश्चित केलेल्या दरापेक्षा हा दर प्रति टन १३५ रुपयांनी जास्त असल्याने महापालिकेचे थेट १३ कोटी ५० लाखांचे नुकसान होणार असल्याचे समोर आले.

### महापालिकेचे १२.६० कोटी रुपयांचे नुकसान

● घनकचरा विभागाने या कंपनीला निविदेतील दराचे पृथक्करण सादर करावे आणि दर कमी करण्याबाबत सात दिवसांत कळवावे, असे पत्र महापालिकेने दिले आहे. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांच्याकडे झालेल्या बैठकीनंतर ठेकेदाराने केवळ नऊ रुपये कमी करून ९७० रुपये प्रतिटन दर दिला. तो प्रशासनाने मान्य केला. त्यामुळे महापालिकेचे १२.६० कोटी रुपयांचे नुकसान झाले .

> बायोमायनिंगच्या निविदेत ठेकेदाराने वाहतूक शुल्क नऊ रुपयांनी कमी केले असून, निविदेला स्थायी समितीने मान्यता दिली आहे. या प्रस्तावावर सर्व विभागप्रमुखांनी स्वाक्षरी केली आहे. — पृथ्वीराज बी. पी. अतिरिक्त आयुक्त, पुणे

#रा

## Selected



### नीरेतील टकले कुटुंबियांनी साकारला काबा शरीफचा हालता देखावा

**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरा येथील प्रशांत शिरीष टकले व त्यांच्या कुटुंबियांनी यंदा गौरी - गणपतीपुढे मुस्लिम धर्मियांचे पवित्र तीर्थस्थान असलेले सौदी अरेबियातील मक्का मधील काबा शरीफच्या प्रतिकृतीचा हलता देखावा तयार केला आहे. त्यातून हिंदू - मुस्लिम बांधवांमधील भाईचारा राखण्याचा अनोखा प्रयत्न केला. सांप्रदायिक क्षेत्रात असलेल्या टकले कुटुंबियांनी सादर केलेल्या मक्का शहरातील काबा शरीफचा हलता देखावा पाहण्यासाठी हिंदू- मुस्लिम बांधव गर्दी केली आहे. नीरा (ता.पुरंदर) येथे दरवर्षी सामाजिक सलोखा राखण्याचा संदेश देणारा देखावा करण्याचा प्रयत्न केला जातो. नीरा येथील प्रभाग क्रमांक एकमधील सांप्रदायिक क्षेत्रातील शिरीष टकले, श्रीकांत टकले, प्रशांत टकले कुटुंबिय दरवर्षी गौरी- गणपतीच्या सजावटीमध्ये विविध देखावे सादर करीत असतात. यंदा टकले कुटुंबियांनी जातीय सलोखा राखण्याच्या हेतूने मुस्लिम धर्मियांचे पवित्र तीर्थस्थान असलेले मक्का शहरातील काबा शरीफच्या प्रतिकृतीचा हलता देखावा तयार केला आहे. देखाव्याद्वारे जातीय सलोखा अबाधित ठेवण्याचा तसेच भाईचारा राखण्याचा प्रयत्न केला आहे.



### गणपती मिरवणुकीत हरवलेली बालिका आईच्या स्वाधीन

सणसवाडीत पोलीस हवालदार रविकिरण जाधवांची कामगिरी

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथे गणपती विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी आलेली आणि गर्दीमुळे हरवलेली बालिका पोलीस हवालदार रविकिरण जाधव यांनी आई सह पालकांच्या स्वाधीन केली असून पल्लवी राजेंद्र पांडे असे त्या बालिकेचे नाव आहे.

सणसवाडी ता. शिरुर येथे गणपती विसर्जन मिरवणूक सुरु असताना घरापासून मिरवणूक पाहण्यासाठी चार वर्षीय पल्लवी आलेली असताना अंधारामध्ये ती चुकून रस्त्याने रडत इकडेतिकडे पळू लागली यावेळी येथील नागरिकांनी याबाबतची माहिती पोलीस हवालदार रविकिरण जाधव यांना दिल्यानंतर जाधव यांनी त्या बालिकेला जवळ घेऊन तिला खाऊ देत तिची विचारपूस केली, त्यावेळी तिने वडिलांचे नाव राजेंद्र पांडे असे सांगून ते भंगाराच्या दुकानात काम करतात असे सांगितल्याने जाधव यांनी त्या बालिकेला दुचाकीवर बसवून परिसरातील भंगारांच्या दुकानात जाऊन बालिकेच्या वडिलांचा शोध घेण्यास सुरुवात केली असता तब्बल एका तासाने एका दुकानातील कामगाराने त्या बालिकेला ओळखले .

### समानतेचा व एकजुटीचा संदेश आपटाळे बिटचा ड्रेसकोड उपक्रम


**जुन्नर :** आपटाळे बीटस्तरीय सहविचार सभा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खानगाव येथे उत्साहात संपन्न झाली. या सभेसाठी उच्छिल, आपटाळे, तांबे व इंगळून या चार केंद्रांतील एकूण 34 शाळांचे शिक्षक सहभागी झाले होते. यामध्ये एकूण 32 महिला शिक्षिका व 55 पुरुष शिक्षकांचा समावेश आहे. या सर्वांनी आपटाळे बीटचा ड्रेसकोड उपक्रम अंतर्गत समान पोशाख परिधान करून एकजुटीचा व समानतेचा संदेश दिला असून या सभेची ही वैशिष्ट्यपूर्ण बाब ठरली आहे. महिला शिक्षिकांसाठी अबोली रंगाची साडी व जॅकेट तर पुरुष शिक्षकांसाठी पांढरा शर्ट, काळी पॅन्ट व जॅकेट असे ड्रेसकोड चे स्वरूप असून स्वखर्चाने सर्वांनी हा खरेदी केला आहे. हा ड्रेसकोड बीटस्तरीय सभा-संमेलने, शिक्षण परिषदा, विविध स्पर्धा इत्यादींसह शाळा, केंद्र व तालुका स्तरावरील विविध शैक्षणिक कार्यक्रमांसाठी तसेच शाळा स्तरावर ऐच्छिक स्वरूपात आठवड्यातून एका दिवशी परिधान केला जाणार आहे. एक सारखा पोशाख सर्वांनी परिधान केल्यामुळे सभेमध्ये एक वेगळे चैतन्य व आनंदी वातावरण दिसून आले.

यावेळी आपटाळे बीटच्या शिक्षण विस्तार अधिकारी संचिता अभंग यांनी प्रशासकीय विविध विषय, शालेय गुणवत्ता वाढ, शिष्यवृत्ती परीक्षा, अभ्यास पूरक व सहशालेय उपक्रम, हस्ताक्षर सुधार, इंग्रजीअध्ययन समृद्धी उपक्रम, विविध स्पर्धा सहभाग, अभिलेखे अद्ययावतीकरण, शालेय भौतिक सुविधांची उपलब्धता, लोकसहभाग, विविध स्वयंसेवी संस्थांची शालेय विकासात मदत इत्यादी विषयांबाबत मार्गदर्शन केले. पुणे जिल्हा परिषद पुणे अंतर्गत अध्यक्ष चषक 2024 स्पर्धेत उच्च प्राथमिक गटामध्ये तृतीय क्रमांकाचा पुरस्कार नुकताच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उच्छिलला जाहीर झाला आहे. याबद्दल मुख्याध्यापक अन्वर सय्यद व सर्व शिक्षक वृंदांचा बीटच्या वतीने सन्मान करण्यात आला.

## नियोजन समितीच्या कामकाजाला मिळाले हक्काचे कार्यालय

# ग्रामीण भागातले प्रश्न लागणार मार्गी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



> समितीला कामकाजात सुसूत्रता येण्यासाठी कार्यालयाची आवश्यकता होती. गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा सुरू होता. सध्या किरकोळ फर्निचरची कामे बाकी राहिली आहेत. त्यानंतर येथे कामकाज सुरू होईल
>
> — वसंत भसे, सदस्य, महानगर नियोजन समिती, पुणे

**पुणे:** ग्रामीण भागातील समस्या आणि प्रश्नासाठी प्रामुख्याने काम करणाऱ्या नियोजन समितील आता हक्काचे कार्यालय उपलब्ध झाले असून यामुळे या समितीची कामकाजाची गती वाढणार आहे. सध्या नियोजन समिती कार्यालयाकडे विकास आराखडा, अंतर्गत रस्ते, घनकचरा, पाणीपुरवठा यासोबतच नागरी कामाबाबतचे प्रस्ताव असले तरी प्रामुख्याने नदी सुधार प्रकल्पाचा मसुदा तयार करण्याची मोठी जबाबदारी या कार्यालयावर असेल पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण अंतर्गत विविध ग्रामीण भागातील पायाभूत समस्या आणि त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी नियोजन समिती काम करते. प्राधिकरणातील अधिकारी आणि समितीच्या सदस्यांमध्ये असणारा दुवा दूर झाला असून, येत्या काळामध्ये ग्रामीण भागातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी ही समिती पाठपुरावा करणार आहे. नुकतेच या समितीसाठी स्वतंत्र कार्यालय देण्यात आले आहे. त्याचे कामकाज तिथून होईल.

जिल्ह्यातील नागरीकरण सुनियोजित पद्धतीने व्हावे यासाठी राज्य शासनाने जुलै १९९९ मध्ये पुणे महानगर क्षेत्र घोषित केले. राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार राज्य शासनाने पुणे महानगर क्षेत्राची घोषणा केली. राज्य घटनेतील तरतुदी व महाराष्ट्र महानगर नियोजन समितीच्या (रचना व कामे) तरतुदीबाबत नोव्हेंबर २००८ मध्ये पुणे महानगर नियोजन समितीची स्थापना केली होती.

### बसमधून पडल्याने महिला जखमी

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा ता. शिरुर येथे बस थांब्यावर प्रवासी बसमध्ये चढत असताना चालकाच्या चुकीमुळे बसमधून खाली पाडून प्रवासी जखमी झाल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे परमेश्वर दत्तात्रय शिंदे या पीएमटी बस चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बस थांब्यावर वैशाली गुप्ता या थांबलेल्या असताना समोरून आलेल्या बसमध्ये त्या बसत असताना अचानक चालकाने बस भरधाव वेगाने पुढे नेल्याने वैशाली या तोल गेल्याने पाठीमागील दरवाजातून रस्त्यावर पडल्या.

## » Selected

### खालचा माळीवाडा मंडळाकडून शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन

**जुन्नर :** शहरातील सार्वजनिक विश्वस्त खालचा माळीवाडा सह ताजणेमळा संस्था संचलित गणेशोत्सव मंडळातर्फे वर्षभरामध्ये विविध सण-उत्सवांमध्ये सामाजिक,शैक्षणिक, धार्मिक तसेच आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन केले जाते.

यावर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने जुन्नर शहरातील शंकरराव बुट्टे पाटील विद्यालय, अण्णासाहेब आवटे विद्यामंदीर व कृष्णराव मुंढे विद्यालयातील इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या सुमारे ५०० विद्यार्थ्यांसाठी 'स्पर्धा परिक्षा' व 'दहावीनंतरच्या शैक्षणिक वाटा' या विषयावर एमपीएससी परिक्षा उत्तीर्ण होवुन डीवायएसपी पदावर नियुक्त झालेले प्रा. सचिन गुळीग यांचे प्रबोधनपर व्याख्यान आयोजित केले गेले होते.

या उपक्रमाचे संकल्पक व संस्थेचे मार्गदर्शक माजी नगराध्यक्ष अनिल मेहेर यांनी माहीती देताना विद्यार्थ्यांना भविष्यात स्पर्धा परिक्षेची तयारी करून आपल्याला शैक्षणिक वाटचालीसाठी यश प्राप्त करण्यासाठी या स्पर्धा परिक्षा व प्रा. सचिन गुळीग यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा सदुपयोग होईल अशी भावना व्यक्त केली.

हा उपक्रम यशस्वी होणेकरिता मंडळाचे अध्यक्ष संजय ताजणे, सुमंत मेहेर, सुभाष बोपले, बाळासाहेब ताजणे, स्वप्नील लोखंडे, गणेश शेटे, आदित्य बाळसराफ, शशिकांत वऱ्हाडी, गणेश थोरात, लालचंद गुप्ता यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष बळीराम थोरात, सचिव संदेश थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमासाठी सहकार्य केलेल्या श्रद्धा ज्वेलर्स, महादेव गार्डन मंगल कार्यालय व इतरांचे आभार कार्याध्यक्ष विनायक लोखंडे यांनी मानले.

### कान्हूर मेसाईत सीसीटीव्हीसह साहित्य चोरट्यांनी लांबवले

**शिक्रापूर:** कान्हूर मेसाई ता. शिरुर येथील एका बंगल्याच्या शटरचे कुलूप तोडून घरातील साहित्यांसह चक्क सीसीटीव्ही संच चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कान्हूर मेसाई ता. शिरुर येथील जगदीश पुंडे हे कामानिमित्त पुणे येथे राहत असून गावी असलेल्या घरी देखील ते येत असतात, पुंडे हे गावी आले असता त्यांना बंगल्याच्या शटरचे कुलूप तुटलेले तसेच आतमध्ये सर्व साहित्य अस्थाव्यस्त दिसल्याने त्यांनी सीसीटीव्ही ची पाहणी केली चोरट्यांनी घरातील कपडे, इलेक्ट्रिक साहित्यतसेच तसेच सीसीटीव्ही संच चोरून नेल्याचे समोर आले.

# सामाजिक उपक्रमाने सामाजिक ऐक्याचे दर्शन

## जेजुरीत मुस्लिम समाजाच्या वतीने गणेशाचे पूजन व दूध वाटप






■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत सामाजिक सलोखा कायम राखला गेला आहे. अनंत चतुर्दशी व ईद-ए-मिलाद या सणांचे औचित्य साधत जेजुरी शहरातील मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने सुवर्ण स्टार गणेश मंडळाच्या श्री गणेशाचे पूजन व पुष्पहार अर्पण करून मंडळातील कार्यकर्ते,नागरिक व भाविकांना मसाले दुधाचे वाटप केले.

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाचे सर्व जाती धर्माचे बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार हे मानकरी आहेत . तसेच मुस्लिम समाजाला देवाच्या पालखी सोहळ्यातील घोड्याचा,पालखी सोहळ्याला पानसुपारी ,देवीला बांगड्यांचा चुडा भरण्याचा मान आहे. जेजुरीत सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत. जेजुरी शहरात हिंदू व मुस्लिम धर्मियांचे सण उत्सव एकत्रित येवून साजरे केले जातात म्हणून येथे सामाजिक सलोखा पूर्वी पासून राखला गेला आहे.

जेजुरी शहरात गणेश विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली असून शहरातील हनुमान तालीम चौकात जेजुरी शहरातील मुस्लिम समाज बांधव बांधवांच्या वतीने सुवर्ण स्टार मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत श्री गणेशाचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.तसेच सर्व भाविकांना मसाले दुधाचे वाटप करण्यात आले.

यावेळी मुस्लिम समाजाचे कार्यकर्ते समीर मुलानी, रज्जाक तांबोळी, इरफान पानसरे, नौशाद सय्यद , सलीम पानसरे, इस्माईल सय्यद, शादाब पानसरे तसेच वंदे मातरम संघटनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष जहिर मुलानी, तालुका अध्यक्ष अनिकेत हरपळे, पदाधिकारी विक्रम माळवदकर, श्रीकांत पवार, अमित वाल्मिकी, संजय टेकवडे व सुवर्ण स्टार मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

सध्या देशात घडणाऱ्या विविध घटनांचा संदर्भ घेऊन वातावरण गढूळ होत असतानाच या सामाजिक उपक्रमाने सामाजिक ऐक्याचेच दर्शन घडत आहे.

### पोलीस ठाण्याच्या वतीने आदर्श गणेश मंडळाला "सन्मानित करणार

**नारायणगाव :** उत्सव कालावधीत समाज उपयोगी उपक्रम राबवणाऱ्या, समाज प्रबोधन पर देखावे सादर करणाऱ्या, उच्च न्यायालयाच्या आदेशाचे व पोलिसांनी दिलेल्या नियमांचे पालन करून पारंपारिक वाद्याचा वापर करून, शांततेत, निर्धारित वेळेत विसर्जन मिरवणूक काढणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला " गणराया अॅवार्ड 2024 " पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली. नारायणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत 19 गावात सुमारे 171 सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांच्या उपस्थितीत नारायणगाव येथे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची नुकतीच बैठक घेण्यात आली होती. या वेळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी नारायणगाव पोलीस ठाण्याची परवानगी घ्यावी,गणेश उत्सव मिरवणुकीत डीजे व लेझर लाईटचा वापर करू नये, नारायणगाव शहरातील विसर्जन मिरवणूक रात्री बारा पूर्वी तर ग्रामीण भागातील सायंकाळी सात पूर्वी पूर्ण करावी. आदी सूचना देण्यात आल्या होत्या. गणेश उत्सव शांततेत व मंगलमय वातावरणात पार पडावा. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहन मिळावे. या उद्देशाने आदर्श गणेशोत्सव साजरा करणाऱ्या प्रथम तीन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला नारायणगाव पोलीस ठाण्याच्या वतीने "गणराया अॅवार्ड 2024 "या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळविण्यात येते की माझे वडील सलिम कादर पानसरे, राहणार सेक्टर २६, प्राधिकरण निगडी , पुणे ४११०४४. यांचे ०३.०७.२०२४ रोजी निधन झाले असून, त्यांच्या नावावर असलेली चार वाहने अनुक्रमे (१) TVS तिनचाकी रिक्षा नंबर MH 14-CU-3022 चासीस नंबर MD6M14CK1G4D10773 व इंजिन नंबर QK4DG025885 (२) दोन चाकी वाहन नंबर MH 14-ES-6606 चासीस नंबर MBLHA10BLEGJ04136 व इंजिन नंबर HA10ETEGJ19245 (३) अशोक लेलॅण्ड ट्रक नंबर MH-14-BJ-0587 चासीस नंबर LNR161364 व इंजिन नंबर LNH527387 (४) चार चाकी वाहन नंबर MH-14-HW-9655 चासीस नंबर MA3JMT81SKH210449 व इंजिन नंबर K12MN9020480 असे असून सदर चारही वाहने त्यांचा कायदेशीर वारसदार मुलगा वसीम सलीम पानसरे यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असेल तर पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयात ७ दिवसात कळविण्यात यावे .अन्यथा सदर वाहन त्यांच्या नावावर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि.१७/०९/२०२४

**वसीम सलीम पानसरे**
राहणार सेक्टर २६, प्राधिकरण निगडी,
पुणे ४११०४४

# विसर्जनासाठी कृत्रिम हौदासह निर्माल्य संकलनाची व्यवस्था-मुख्याधिकारी महेश रोकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** श्री गणेश विसर्जनासाठी नगरपरिषदेकडून शहरातील विविध बत्तीस ठिकाणी कृत्रिम विसर्जन हौदासह निर्माल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आली आहे, नागरिकांनी पर्यावरणाच्यादृष्टीने त्याचा वापर करावा, असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

शहरात सुमारे २०० पेक्षा अधिक सार्वजनिक गणेश मंडळांनी श्री गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. त्यामुळे गणेशमूर्तींची संख्या विचारात घेता प्रदूषण रोखण्यासाठी निर्माल्य व इतर कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन होण्यासाठी कृत्रिम विसर्जन हौदांची निर्मिती व निर्माल्य संकलनाची व्यवस्था केली आहे.

पर्यावरण पूरक विसर्जन मिरवणूक व विसर्जन करणाऱ्या मंडळांना यावर्षी नगरपालिकेच्या वतीने बक्षीसे जाहीर करण्यात आली आहेत.यामध्ये १५ हजार, १० हजार व ७ हजार रोख रक्कम प्रमाणपत्र व शिल्डचा समावेश आहे. डीजेमुक्त आणि पारंपरिक वाद्याच्या वापर करण्याबाबतची मुख्य अट ठेवण्यात आली आहेत.

गणपती विसर्जन विहिरीजवळ १० नियंत्रण अधिकाऱ्यांसह कर्मचारी व शहरातील ३२ ठिकाणी विसर्जनाच्या वेळी मदतीसाठी २०० कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. पर्यावरणपूरक व शांततेत पार पडणाऱ्या आणि नियमाच्या अधीन राहून विसर्जन मिरवणूक काढणाऱ्या तीन गणेश मंडळांना उत्कृष्ट गणेश मंडळ म्हणून प्रोत्साहन पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.




कृत्रिम जलकुंडाची ठिकाणे

शहरात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तांदुळवाडी आणि शिवाजीनगर, चिंचकर शाळा, तांदुळवाडी, कवी मोरोपंत शाळा, श्रीरामनगर, रुई क्षे. कार्यालय समोर, अभिमन्यू कॉर्नर (बनकर वडेवाले जवळ ), सूर्यनगरी मंडई शेजारी, अंगणवाडी, सी.टी. इन चौक, जळोची क्षेत्री कार्यालय, जि.प. प्राथ.शाळा, माळावरची देवी मंदिरालगत, गणेश मंदिरा समोर, सायली हिल, सहयोग सोसायटी गेट समोर ख्रिश्चन कॉलनी, जेष्ठ नागरीक संघ कार्यालय, कॅनॉल शेजारी, वीर गोगादेव मंदिराजवळ, रिंगरोड कॅनॉल पुलाजवळ, शाहू हायस्कूल, पाटस रोड, दशक्रिया विधी घाट, कसबा, देशमुख समाज मंदिर शाळा क्र. ०१, खरेदी विक्री पेट्रोलपंपा शेजारी, खंडोबानगर मुख्यचौक, टेक्नीकल हायस्कुल, बालकल्याण केंद्र प्राथमिक शाळा, मुक्ती टाऊनशिप फेज २, धों. आ. सातव शाळा, जगतापमळा, परकाळे बंगला, माता रमाई भवन, तीन हत्ती चौक, तुपे बंगला समोर, अशोक नगर, पंचायत समिती समोर भारत बेकरी, मोरगांव रोड धावजी पाटील कॅनाल पुल, श्री. पांचगणे पत्रकार कॅनाल बाजूस, सातव वस्ती जि.प. शाळा आणि शाळा क्र. २ कसबा या ठिकाणी

कृत्रिम जलकुंडाच्या व्यवस्था करण्यात आली आहे.

# ग्रामपंचायती व शाळांनी शालेय गड-किल्ले बनविण्याच्या स्पर्धेत सहभाग घ्यावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गड किल्ले जागतिक वारसा स्थळ नामांकन जनजागृती मोहिमेत ग्रामपंचायत, शाळा यांना सहभागी करुन घेण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय शालेय गड किल्ले बनविणे स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात येणार असून जिल्ह्यातील ग्रामपंचायत व शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे. या स्पर्धेत गडकिल्ल्यांची आकर्षक, ऐतिहासिक दृष्टीकोनातून तयार केलेली प्रतिकृती, गाव व शाळा स्तरावर गडकिल्ले यांचे जतन, संवर्धन व स्वच्छता बाबत राबविण्यात येणारे अभिनव उपक्रम व कार्यक्रम, माहितीपट, पारंपरिक नाणी, शस्त्र, भांडी आदी संग्रहाचे प्रदर्शन, ग्रामपंचायत अथवा शाळेमध्ये उपलब्ध असणारे शिवचरित्र, गडकिल्ले, मराठा साम्राज्याशी ऐतिहासिक व संदर्भिय साहित्य, गावस्तरावर घेण्यात आलेल्या शिवचरित्र, गडकिल्ले, ऐतिहासिक व गावामध्ये पारंपरिक साहसी आदी विषय समाविष्ट केले आहेत.

### तरुणाची नीरा-देवघर धरणात आत्महत्या

**नीरा-देवघर:** पुण्यातील धनकवडी येथील तरुणाने भोर-महाड मार्गावरील वरंधा घाटात नीरा-देवघर धरणाच्या पाण्यात आत्महत्या केली. श्रीकांत जाधव असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून रविवारी (ता.१५) सायंकाळी सहाच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर केवळ दोन तासात भोर पोलिसांनी घटनास्थळ शोधून संबंधीत व्यक्तीचा मृतदेह नीरा देवघर धरणाच्या पाण्याबाहेर काढला.

# लाखणगावत बिबट्याच्या हल्ल्यात तरूण जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लाखणगाव:** ता.आंबेगाव येथील हनुमंत नारायण टाके हा तरुण बिबट्याचा हल्ल्यात जखमी झाला आहे. रविवार (दि.१५ रोजी पहाटेच्या सुमारास हनुमंत टाके हे प्रात: विधीसाठी घरालगत असणाऱ्या बाथरूम गेले होते.प्रातःविधी उरकून घरात येत असताना घराजवळ दबा धरून बसलेल्या बिबट्याने हनुमंत टाके यांच्यावर अचानक हल्ला केला. गोंधळलेल्या अवस्थेत टाके यांनी बिबट्याने केलेला हल्ला परतवून लावला.यामध्ये टाके यांच्या हात,पाय,डोळा यावरती जखमा झाल्या आहेत.टाके यांच्यावर सध्या मंचर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे. रामदास वळसे पाटील यांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी मंचर ग्रामीण रुग्णालयात टाके यांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. !!

**जाहीर नोटीस**

दिनांक : १५/०९/२०२४

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, कल्पकल्याण सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सर्व्हे नं. ६७२/४, ६७३, सिटी सर्व्हे नं. ८६१, विबवेवाडी, पुणे - ४११०३७ या सहकारी संस्थेचे दिवंगत सभासद कै. चन्नप्पा सायन्ना तेलगु यांच्या मालकीचे संस्थेतील इमारत क्र. २ मधील तळमजल्यावरील दुकान नं. ८ (इंडेक्स २ प्रमाणे फ्लॅट क्र. ८) यांसी क्षेत्र १३० चौ. फुट बिल्टअप या स्थावर मिळकतीचे क्रमांक ३५१ ते ३५५ पर्यंत असलेले मूळ भागप्रमाणपत्र क्र. ७८ हरवले/ गहाळ झाले आहे. सदर मूळ भागप्रमाणपत्र गहाळ झाले संदर्भात दिनांक २२/०६/२०२३ रोजी ऑनलाईन पोलीस तक्रार करण्यात आली आहे. त्याचा तक्रार क्रमांक ८३०२५/२०२३ असा आहे.

तरी सदर स्थावर मिळकतीवर बोजा, गहाण, लीज, लिन, बक्षीस, करारनामा, मुखत्यार, साठेखत, खरेदीखत, ताबा अगर अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार, वाद असल्यास या नोटिसच्या प्रकाशनापासून ०७ (सात) दिवसांच्या आत संबंधित कागदपत्रांसहीत लेखी हरकत/ हरकती संस्थेच्या वरील पत्यावर किंवा खालील दिलेल्या पत्यावर नोंदवाव्यात. वरील निर्धारित कालावधीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी हरकत/दावे/आक्षेप प्राप्त झाली नाहीत तर सदर सहकारी संस्था हौसिंग सोसायटीच्या उपविधीनुसार प्रदान केल्याप्रमाणे डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करण्यास मुक्त असेल याची कृपया नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

सही/-

पुणे दि : १५/०९/२०२४

**अॅड. सचिन मंगल मारुती गायकवाड**
ऑफीस नं. २०, तळमजला, न्यू मणीरत्न कॉम्प्लेक्स हौसिंग सोसायटी, तावरे बेकरीजवळ, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे ४११००९.

## राजगुरुनगर सह.बँकेचा सभासदासाठी २ लाखांचा विमा-दिनेश ओसवाल

# ९३ वी सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** सहकारी बँकेची ९३ वी सर्वसाधारण सभा बँकेचे अध्यक्ष दिनेश ओसवाल यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

यावेळी उपाध्यक्ष अविनाश कहाणे, संचालक किरण आहेर, राजेंद्र वाळुंज, राजेंद्र सांडभोर, विजया शिंदे, गणेश थिगळे, अरुण थिगळे, अॅड. राहुल तांबे पाटील, सागर पाटोळे, विजय डोळस, अश्विनी पाचारणे, रामदास धनवटे, विनायक घुमटकर, समीर आहेर, दत्तात्रय भेगडे,



**बँक सद्यस्थिती**

- सभासद संख्या: **३७,१६३**
- भागभांडवल : **४८.८४ कोटी**
- स्वनिधी : **२६९.७१ कोटी**
- ठेवी: **१५५१.९३ कोटी**
- कर्जवाटप : **९४३.६० कोटी**
- निव्वळ नफा **१५.०२ कोटी**
- ग्रॉस एनपीए प्रमाण: **९.१४%**
- नेट एनपीए प्रमाण : **० %**

> राजगुरुनगर सहकारी बँकेचा आलेख नेहमीच उंचावत आहे. यात सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी यांचे मोठे योगदान आहे. थकीत कर्जाची वसुली केली जात आहे. मागील वर्षपिक्षा जास्त कर्ज वसूल झाला आहे. शेतकऱ्यांसाठी नव्या योजना कमी व्याजदरात सुरु केल्या आहेत. शैक्षणिक कर्जासह घर कर्ज घर दुरुस्ती साठी कर्ज आदी योजना सुरु केल्या आहेतग"
>
> — दिनेश ओसवाल, अध्यक्ष, राजगुरुनगर सहकारी बँक

एक लाखावरुन दोन लाखावर सभासद विमा रक्कम केली आहे. भोसरी, मंचर, आळेफाटा, जुन्नर, पाबळ, पाईट, कडूस या शाखांसाठी स्वमालकीच्या वास्तू उभारणार आहे. दुर्दैवाने कर्जदाराचा मृत्यू झाल्यास जमीनदारांना व वारसांना तोशीस लागू नये, म्हणून बँक कर्जदारांना, कर्ज रकमेइतका विमा उतरविण्याची ऐच्छिक सुविधा उपलब्ध करून देणार आहे, अशी माहिती ओसवाल यांनी दिली.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शांताराम वाकचौरे यांनी अहवाल केले. या सभेत मुख्यत्वे लहान कर्जाला प्राध्यान्य, बँकेची वसुली, वसुली अधिकारी बदल, तज्ज्ञ संचालक आरबीआय निकष व दोष दुरुस्ती, सभासदांना जादा लाभांश मिळावा, एकरकमी कर्ज परतफेड, आदी विषयांवर चर्चा झाली.

#रा

### दोन दारु अड्डयांवर पोलिसांचा छापा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर:** कवठे येमाई ता. शिरुर येथील चंदननगर व शितोळे वस्ती येथे काही इसम नागरिकांना गावठी दारुची विकी करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली त्यांनतर सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक कारंडे, पोलीस हवालदार देविदास देविदास खेडकर, उमेश भगत, पोलीस शिपाई अंबादास थोरे यांनी तेथे जात छापा टाकला असता चंदननगर येथे निलेश बोडरे तर शितोळे वस्ती येथे चंद्रकांत शितोळे हा गावठी दारु विक्री करताना मिळून आला, दरम्यान पोलिसांनी दोन्ही ठिकाणचा दारुसाठा जप्त करत दोघांना ताब्यात घेतले,

**डॉ. विकास खरात उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसी व्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभागयांचे कडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्युनोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२)व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखे पासून १ वर्षा नंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंदकारणे बाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणे कामी संबधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्या अनुषंगाने अर्जदार अनंत आपटे रा. एरंडवणे जि. पुणे. यांनीया कार्यालयाकडे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३ (३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार आर्जदार यांचे बंधू कै. चंद्रकांत मारेश्वर आपटे यांचा मृत्यु मौजे जनसेवा फाऊंडेशन, रानवडी, अंबीपानशेत ता. वेल्हा जि. पुणे येथे दि. ३०/१२/२०२० रोजी झालेचे नमूद करुन सदर मृत्युची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकतअथवा मागणी तपशिला मध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांका पासून ३० दिवसाचे कालावधी मध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधी मध्ये लेखीआक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिला मध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदी नुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि.१०/०९/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्या निशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/मृत्यू/एस. आर/ /२०२४
**दिनांक :-** १०/०९/२०२४
**ठिकाण :-** भोर

शिक्का

(डॉ. विकास खरात)
**उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर**

# रात्रीही मिळणार सूर्यप्रकाश



दिवसा ‘दिनकर’ म्हणजेच सूर्य आपल्या तेजाने सर्वांना प्रकाश व ऊर्जेचे दान भरभरून देत असतो आणि रात्रीच्या वेळी चंद्र आपल्या शीतल प्रकाशाने लोकांना सुखावत असतो; मात्र रात्रीही सूर्यप्रकाश मिळू लागला तर? तुम्ही म्हणाल हे कसे शक्य आहे. परंतु हा चमत्कार एका स्टार्टअपने केला आहे. यामुळे रात्री चंद्राऐवजी सूर्याची किरणे चमकू शकतील. अमेरिकेतील कॅलिफोर्नियामधील स्टार्टअप कंपनी रिफ्लेक्ट ऑर्बिटल अंतराळात उपग्रह सोडून त्या माध्यमातून सूर्याचा प्रकाश पृथ्वीवर आणण्याची योजना बनवली आहे. दिवसा हा उपग्रह सूर्यप्रकाश संग्रहीत करेल अन्? रात्रीच्या वेळी तो पृथ्वीवर पाठवणार आहे.

रिफ्लेक्ट ऑर्बिटल कंपनीची योजना अंतराळात उपग्रह लाँच करण्याची आहे. त्या माध्यमातून सूर्यप्रकाश पृथ्वीवर पाठवण्यात येणार आहे. रिफ्लेक्ट ऑर्बिटलचे सीईओ बेन नोव्हाक यांनी सांगितले की, सूर्य दिवसाच नाही तर रात्रीसुद्धा तुम्हाला प्रकाश देणार आहे. या योजनेला नाव ‘सनलाईट ऑन डिमांड’ दिले आहे. यामुळे सूर्यप्रकाश दिवस आणि रात्रीच्या बंधनातून मुक्त होणार आहे.

लंडनमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना बेन नोवाक यांनी सांगितले की, आता ऊर्जेसाठी दिवस उजाडण्याची वाट पाहावी लागणार नाही. जेव्हा लागेल तेव्हा प्रकाश उपलब्ध होणार आहे. हा पर्याय अजेय शक्ती ठरणार आहे. मानवतेसाठी हा पर्याय मैलाचा दगड ठरेल. त्यासाठी जवळपास ५७ लहान उपग्रह लाँच करण्याची तयारी केली जात आहे. हे उपग्रह ६०० किलोमीटर उंचीवर परिभ्रमण करणार आहे. स्टार्टअपमध्ये सात जणांची टीम या योजनेवर काम करत आहे. या स्टार्टअपने त्यासाठी लागणारी चाचणी पूर्ण केली आहे. आता २०२५ मध्ये उपग्रह अवकाशात पाठवण्याची योजना बनवली जात आहे. या कंपनीचे को-फाऊंडर आणि सीईओ बेन नोव्हाक आहे. दुसरे को-फाऊंडर आणि सीटीओ त्रिस्टन सेमेलहॅक आहे. रिफ्लेक्ट ऑर्बिटलची ही कल्पना चमत्कारासारखी आहे. यापूर्वी रशियानेही हा प्रयोग केला आहे. १९९२ मध्ये रशियाने झानाम्या २ मोहीम सुरू केली होती. त्यासाठी रशियाने अंतराळात एक आरसा बसवला होता. त्या माध्यमातून काही वेळ पृथ्वीच्या दिशेने सूर्यप्रकाश आला होता. तथापि, या यशाची पुनरावृत्ती करण्यात शास्त्रज्ञांना यश आले नाही. कारण त्या वेळी उपग्रह अवकाशात पाठवणे खूप महाग होते.

# कॅमब्रियन काळाबाबत नवं संशोधन

कॅमब्रियन कालावधीत उत्क्रांतीचा वेग हा आजच्यापेक्षा पाच पटींनी अधिक होता. याच काळात साध्या सजीवांपासून गुंतागुंतीचे सजीव तयार झाले, असे ॲडलेड विद्यापीठाच्या संशोधकांनी म्हटले आहे. विज्ञानातील उत्क्रांती महाविस्फोट सिद्धान्तानुसार कॅमब्रियन काळात अनेक गुंतागुंतीचे सजीव एकदम उदयास आले, पण हे सजीव अचानक कसे अस्तित्वात आले हे कुणालाही स्पष्ट करता आले नव्हते. ते काम ॲडलेड विद्यापीठाच्या संशोधकांनी केले आहे. या कूट प्रश्नाला डार्विनला पडलेला पेच, असे म्हटले जाते.



५४० ते ५२० दशलक्ष वर्षांपूर्वी कॅमब्रियन स्फोटात हा उत्क्रांतीचा महाविस्फोट झाला असे वैज्ञानिकांनी शोधून काढले आहे. त्यांच्या मते अनेक आधुनिक प्राणी याच काळात जन्माला आले. सजीवसृष्टीच्या निर्मितीनंतर अनेक प्राण्यांच्या प्रजाती तयार होण्याचा हा सर्वात महत्त्वाचा काळ आहे, असे ॲडलेड विद्यापीठाचे संशोधक मायकेल ली यांनी म्हटले आहे. नेहमीपेक्षा ही उत्क्रांती जास्त वेगाने झाली होती असे डार्विनचे मत होते. चार अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वीवर जीवाणू, प्लँक्टन, बहुपेशीय प्राणी यांचे अस्तित्व होते, परंतु कॅमब्रियन काळात त्यात अनेक नवीन सजीवांची भर पडली. त्या काळातील एडिकारन प्राण्यांची प्रजात ऑस्ट्रेलियात होती, तिचे गूढ अजून कायम आहे. त्या काळातील काही सजीव हे थेट आजच्या काळातील सजीवांचे पूर्वज मानले जातात. उत्क्रांतीची ही गती आजच्या पाच पट अधिक होती. उत्क्रांतीच्या या वेगाचे स्पष्टीकरण डार्विनच्या सिद्धांताला छेद देणारे नाही. सूक्ष्मजीवांच्या जीवाश्मावरून उत्क्रांतीचा वेग वैज्ञानिक ठरवत असतात. काही जैविक बदल हे ३ कोटी वर्षांत झाले तर काही ५० लाख ते १ कोटी वर्षांत झाले असे सांगण्यात येते. कीटक, अँथ्रॉपॉडस, अराशनिडस व त्याच्या जवळ जाणाऱ्या सजीवांच्या जीवाश्मांचा अभ्यास यात करण्यात आला. ‘करंट बायोलॉजी’ या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे. ५४० ते ५२० दशलक्ष वर्षांपूर्वी कॅमब्रियन स्फोटात हा उत्क्रांतीचा महाविस्फोट झाला, असे वैज्ञानिकांनी शोधून काढले आहे. त्यांच्या मते अनेक आधुनिक प्राणी याच काळात जन्माला आले. सजीवसृष्टीच्या निर्मितीनंतर अनेक प्राण्यांच्या प्रजाती तयार होण्याचा हा सर्वात महत्त्वाचा काळ आहे.

# ‘गुप्तहेर’ माशाचा मृत्यू

हेरगिरीसाठी पशुपक्ष्यांचाही वापर करणे ही काही नवलाईची बाब नाही. त्यामुळे एका पांढऱ्या बेलुगा व्हेल माशालाही असेच रशियाचा ‘गुप्तहेर’ मानले जात होते. या व्हाईट बेलुगा व्हेल ‘ह्वाल्दिमिर’चा मृत्यू झाला आहे. ३१ ऑगस्ट रोजी नॉर्वेच्या रिसाविका खाडीत मासेमारीसाठी गेलेल्या पिता-पुत्रांना व्हेलचा मृतदेह तरंगताना दिसला.

या १४ फूट लांब व्हेलचे वय सुमारे १५ वर्षे तर वजन १,२२५ किलो होते. त्याचा मृतदेह क्रेनच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आला. मृत्यूचे कारण अद्याप समजू शकले नाही. मोठ्या बोटीच्या धडकेने हा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, त्याच्या शरीरावर जखमेच्या कोणत्याही खुणा आढळल्या नाहीत. ह्वाल्दिमीर व्हेलला पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आले आहे. २०१९ मध्ये जगाला याची प्रथमच माहिती मिळाली. हा बेलुगा व्हेल रशियापासून ४१५ किमी अंतरावर नॉर्वेमधील इंगोया बेटाच्या किनाऱ्यावर




सर्वप्रथम दिसला. या भागात बेलुगा व्हेल आढळत नाही. त्यामुळे त्याच्यावर लक्ष ठेवले जाऊ लागले. व्हेलची जवळून पाहणी केल्यावर गळ्याभोवती एक पट्टा दिसला. ज्या शरीरावर रशियन शहर सेंट पीटर्सबर्गचे नाव लिहिले होते, त्या शरीरावर कॅमेऱ्यांसह मशिन्सदेखील बसविण्यात आल्या होत्या. रशियन नौदल व्हेलला प्रशिक्षण देण्यासाठी ओळखले जाते. यामुळेच ती रशियाची गुप्तहेर व्हेल मानली जाऊ लागली.

पाश्चात्त्य माध्यमांमध्ये ह्वाल्दिमीरबद्दल दावा करण्यात आला होता की, प्राण्यांना हेर बनवण्याच्या रशियन प्रकल्पाचा भाग होता. मात्र, रशियाने हे कधीच मान्य केले नाही. व्हेलला नॉर्वेमध्ये ‘ह्वाल’ म्हणतात. यानंतर व्हेल आणि रशियन राष्ट्राध्यक्षांची नावे एकत्र करून सोशल मीडियावर त्याला ‘ह्वाल्दिमीर’ स्पाय व्हेल म्हटले जाऊ लागले. बेलुगा व्हेल सामान्यतः थंड आर्क्टिक महासागरात राहतात. पण ह्वाल्दिमीर माणसांमध्ये सहज राहात असे. ती माणसांसोबत डॉल्फिनसारखी खेळायची. ह्वाल्दिमीरचे संरक्षण करणाऱ्या नॉर्वेजियन एनजीओ मरीन माइंडने सांगितले की, या व्हेलला गेल्या काही वर्षांत अनेक किनारी भागात पाहिले गेले आहे. ही खूप शांत स्वभावाची व्हेल होती हे लवकरच आमच्या लक्षात आले. या व्हेलला लोकांशी खेळायला आवडायचे. तिने हाताच्या संकेतांवरही प्रतिक्रिया दिली. नॉर्वेतील हजारो लोकांचे तिच्यावर प्रेम होते. तिचा मृत्यू हृदयद्रावक असल्याच्या प्रतिक्रिया येत आहेत.

# गूढ पृथ्वीच्या पोटातल्या कड्याचे


इ पृथ्वीच्या पोटात अनेक रहस्ये दडलेली आहेत. आता आपल्या पायांखाली हजारो किलोमीटर खोलीवर एखाद्या कड्यासारखी रचना आढळून आली आहे. पाश्चात्त्य देशांमधील डोनट या खाद्यपदार्थासारखी किंवा आपल्याकडील मेदुवड्यासारखी त्याची रचना आहे. हे कड्याच्या आकाराचे क्षेत्र पृथ्वीच्या तरल कोअरच्या आत आहे, जे आपल्या ग्रहाच्या चुंबकीय क्षेत्राच्या गतिशीलतेबाबतचे नवे संकेत देते.



ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी या कड्याचा शोध घेतला आहे. मध्यभागी पोकळी असलेल्या गोलाकार रचनेचे हे कडे आहे. पृथ्वीच्या तरल कोअरच्या आतील संरचना केवळ कमी अक्षांशांवर आढळते आणि भूमध्य रेषेच्या समांतर असते. एएनयूच्या भूकंप वैज्ञानिकांनी दिलेल्या माहितीनुसार त्याचा अद्याप छडा लागला नव्हता. सायन्स ॲडव्हान्सेस या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार पृथ्वीचे दोन कोअर स्तर आहेत. आंतरिक कोअर हे ठोस, सघन असून बाह्य कोअर द्रवरुप, तरल आहे. पृथ्वीच्या कोअरच्या चहुबाजूने मेंटल आहे. नव्या संशोधनात आढळलेली कड्यासारखी संरचना ही पृथ्वीच्या बाह्य कोअरच्या शीर्षस्थानी आहे, जिथे तरल कोअर मेंटलशी जुळते.

# यांत्रिक वनस्पती म्हणजे काय?

सो माणसासारखी कामे करणारा यंत्रमानव प्रत्यक्षात आणून बरीच वर्षे झाली. त्या तंत्रातही बरीच प्रगती झालेली आहे. कुत्रा, साप अशा विविध प्राण्यांच्या रूपातही रोबोट बनवण्यात आलेले आहेत. मात्र यांत्रिक वनस्पतीचीही निर्मिती



करण्यात आलेली आहे, हे तुम्हाला माहिती आहे का? वनस्पतींच्या मुळांची नक्कल करणारी एक यंत्रणा इटलीच्या वैज्ञानिकांनी विकसित केली आहे. या प्रकल्पाचे नाव ‘प्लॅनेटॉइड’ असे आहे. मुळांची वाढ वनस्पतीत ज्या पद्धतीने होते त्याच पद्धतीने येथेही मुळांची वाढ घडून येते.

इटलीतील जिनोआ येथे असलेल्या ‘इटालियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी’ या संस्थेच्या बार्बरा माझोलाय यांच्या नेतृत्वाखालील पथकाने यांत्रिक वनस्पतीची निर्मिती करताना काही मृदू संवेदकांचा वापर केला. त्यामुळे जमिनीत चाचपणी करीत मुळे घर्षण कमी करून आत वाढत राहतात. या कृत्रिम वनस्पती प्रणालीत गुरुत्व, पाणी, तापमान, स्पर्श, पीएच मूल्य, नायट्रेट, फॉस्फेट यांचा शोध घेणारी यंत्रणा आहे, असे ‘न्यू सायंटिस्ट’ने म्हटले आहे. संशोधकांच्या मते वनस्पतींची मुळे कशी वाढतात याचा नमुना तयार करणे हे, जेव्हा ती वाकतात त्या स्थितीत तयार करणे अवघड आहे. वनस्पतीची वाढ होत असताना त्यांच्यात मुळांच्या विरुद्ध दिशेला पेशींची संख्या वाढत जाते. मुळांना शारीरिक व रासायनिक अशा अनेक स्तरावर वाढीसाठी प्रेरणा मिळत असते, असे संशोधकांचे म्हणणे आहे. वनस्पतींच्या मुळांची काही कार्ये व इतर गुणधर्मांची नक्कल करण्याचा यात आम्ही प्रयत्न करीत आहोत, असे माझोलाय यांनी सांगितले

# राजकुमारी नॉर्वेची, विवाह तांत्रिकाशी!

‘प्रेम आंधळे असते’ असे म्हणतात. कधी कधी काही जोड्या पाहिल्यावर ही म्हण खरीच असल्याचे पटते! सध्या नॉर्वेच्या राजकुमारीने जो ‘स्वप्नातील राजकुमार’ निवडला आहे तो पाहिल्यावर जगभरातील लोक हेच म्हणत आहेत. याचे कारण म्हणजे या राजकुमारीने तिच्या देशात ज्याला ‘ठग’ म्हणून संबोधले जाते अशा एका अमेरिकन तांत्रिकाशी लग्न केले आहे.

या राजकुमारीने ड्युरेक वेरेटशी आपण लग्न करणार असल्याचे जाहीर केले होते. एका आलिशान हॉटेलमध्ये हा विवाह सोहळा आयोजित करण्यात आला. राजकुमारी मार्थाचे वय ५२ वर्षांचे आहे. घोडेसवारीची आवड असलेली मार्था नॉर्वेजियन राजा हेरॉल्ड



आणि राणी सोनजा यांनी थोरली कन्या आहे. तिचा लहान भाऊ ‘क्राऊन प्रिन्स’ हाकोन हा वडिलांच्या गादीचा उत्तराधिकारी आहे. राजकुमारीने एका ‘हॅलो’ मासिकाला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की मी पुन्हा एकदा लग्न न करण्याचे ठरवले होते. मात्र, २०१८ मध्ये माझी ड्युरेकशी भेट झाल्यावर माझे मन बदलले.

ड्युरेक वेरेटला नॉर्वेची मीडिया ‘ठग’ म्हणूनच संबोधते. दोघांनी लग्नसोहळ्याच्या स्पेशल कव्हरेजसाठी ‘हॅलो’ मासिकाशी करार केला आहे. एक ओटीटी प्लॅटफॉर्म तिच्यावर एक डॉक्युमेंटरीही बनवणार आहे. त्यासाठीची तयारी वर्षभरापासून सुरू आहे. मार्था २०१९ पासून ४९ वर्षांच्या वॅरेटशी रिलेशनशिपमध्ये आहे. दोघांनी २०२२ मध्ये वाङ्निश्चय केला होता. त्यानंतर तिने आपल्या सर्व शाही जबाबदाऱ्या सोडून दिल्या होत्या. मात्र, वडिलांच्या आग्रहाखातर तिने आपला ‘राजकुमारी’ हा किताब कायम ठेवला. २०१७ मध्ये तिने पहिला नवरा एरी बेहन याच्याशी घटस्फोट घेतला होता. त्यानंतर दोन वर्षांनी तिच्या या पतीचे निधन झाले होते. कृष्णवर्णीय तांत्रिक ड्युरेक वेरेट हा स्वतःला ‘आध्यात्मिक उपचारक’ म्हणवून घेतो. आपली ही सहावी पिढी असल्याचेही त्याचे म्हणणे आहे. अमेरिकेतील लॉस एंजिल्समध्ये राहणाऱ्या या तांत्रिकाने ग्वेनेथ पाल्ट्रो, सेल्मा ब्लेयर, नीना डोबरेव आणि रोसारियो डॉसन यांच्यासारख्या अनेक सेलिब्रिटींना मार्गदर्शन केले आहे. मार्थाशी आपला गतजन्मांपासूनचा संबंध असल्याचे त्याचे म्हणणे आहे. एकेकाळी मी इजिप्तचा फेरो (राजा) होतो व ती माझी राणी होती, असे त्याने एका मुलाखतीत म्हटले होते!

# ‘फेसबुक’चा लोगोबदल

‘ट्विटर’चे ‘एक्स’ असे नामांतर झाल्यावर तो मोठाच चर्चेचा विषय बनला होता. अर्थातच नव्या नावाबरोबर त्याचा लोगोही बदलला गेला. आता मेटा समूहाच्या फेसबुक या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा लोगो गेल्या शनिवारी अचानक बदलला गेला. काळ्या बॅकग्राऊंडवर पूर्वीचा निळ्या ‘एफ’ आकाराचा लोगो फेसबुक ॲपवर दिसत होता. त्यामुळे फेसबुकने लोगो बदलला की काय अशी चर्चा सोशल मीडियावर रंगली होती. दरम्यान, याप्रकरणी फेसबुकने आता स्पष्टीकरण दिले आहे.




बिझनेस इनसाइडरच्या एका अहवालानुसार मेटाने सांगितले की, ही एक तांत्रिक चूक होती. त्याचे निराकरण करण्यात आले आहे. वापरकर्त्यांनी त्यांचा ॲप अपडेट केला तर त्यांना मूळ लोगो दिसू शकणार आहे. फेसबुकचा लोगो बदलल्यानंतर फेसबुक, ट्विटरवर तक्रारींचा पाऊस पडला. फेसबुकने लोगो बदलला का? या प्रश्नासह फेसबुककडून रिब्रँडिंग केली जात असल्याचेही म्हटले गेले; तर काहींना वाटले की, नव्या बदलाचा हा एक केवळ टिझर असू शकतो. दरम्यान, प्रत्येक वापरकर्त्याला हा बदललेला लोगो दिसला नाही. सोशल मीडियावर यासंदर्भात जेव्हा चर्चा सुरू झाली तेव्हा अनेकांनी तत्काळ त्यांच्या फेसबुक ॲपल असलेला लोगो तपासला. परंतु त्यांचा लोगो व्यवस्थित होता. त्यामुळे ही समस्या जागतिक स्तरावरची नव्हती.

ही तांत्रिक चूक आता सुधारण्यात आली असून वापरकर्त्यांनी ॲप अपडेट केल्यानंतर त्यांना फेसबुकचा मूळ लोगो दिसू शकणार आहे. मेटा समूहाच्या फेसबुक आणि इन्स्टाग्राम या सोशल मीडिया ॲप्स आणि व्हॉट्सअप या मेसेजिंग ॲपवर सातत्याने बदल होत असतात; तर कधी कधी प्रायोगिक तत्त्वावरही बदल केले जातात. त्यामुळे यावेळीही मेटाकडून असंच काहीतरी झालं असण्याची शक्यता होती. परंतु, त्यांनी हे तांत्रिक बिघाड असल्याचे सांगितले. दरम्यान, काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा आदेश दिला. बलात्कार प्रकरणातील पीडितेची सर्व छायाचित्रे सोशल मीडियावरून हटवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. आदेशानुसार, बलात्कार पीडितेची ओळख सार्वजनिक करता येणार नाही. मात्र, असे असतानाही पीडितेचे छायाचित्र फेसबुक, इन्स्टाग्रामसह सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर कसे गेले? हे ताबडतोब हटवण्यात यावे, असे आदेश न्यायालयाकडून देण्यात आले.

# ‘एआय’ करणार जीभ पाहून रोगनिदान

प्राचीन काळापासूनच नाडी, जीभ पाहून रोगाचे निदान केले जाते. आता या प्राचीन रोगनिदान पद्धतीला आधुनिक ‘एआय’ म्हणजेच ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स’ची जोड मिळाली आहे. ‘एआय’वर चालणारे एक उपकरण आता व्यक्तीची जीभ पाहून त्याच्या आजाराचे अचूक निदान करू शकेल. यामुळे वारंवार रक्तचाचण्या करण्याच्या त्रासातून मुक्तता होऊ शकते. इराकच्या मिडल टेक्निकल युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी हे उपकरण विकसित केले आहे.



अलीकडेच इराकच्या या संशोधकांनी हे ‘एआय मॉडेल’ विकसित केले आहे. ते जिभेच्या प्रतिमांचे अवलोकन करून ९८ टक्क्यांपर्यंत आजारांचे निदान करू शकते. हे तंत्रज्ञान जिभेच्या फोटोंचे रिअल टाईममध्ये विश्लेषण करून वेगाने व अचूक निदान करते. जर हे तंत्र पूर्णपणे यशस्वी झाले तर आजारांचे निदान करण्याचे काम काही मिनिटांचेच होऊ शकते. भारत, चीनसह अनेक देशांमध्ये प्राचीन काळापासूनच रोगनिदानासाठी वैद्यांकडून जीभ पाहिली जाते. इराकमधील या नव्या तंत्रज्ञानाचा पाया चीनमधील पारंपरीक वैद्यकीय तपासणीवर आधारित आहे. चीनमध्ये जिभेचा रंग आणि रचना यांच्या आधारावर आजारांचे निदान केले जात होते. आधुनिक विज्ञानाने या प्राचीन वैद्यक ज्ञानाला अद्ययावत ‘एआय मॉडेल’ची जोड देऊन त्याला अधिक प्रभावी बनवले आहे.

युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ ऑस्ट्रेलिया आणि इराकच्या मिडल टेक्निकल युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी मिळून हे ‘एआय मॉडेल’ विकसित केले आहे. त्याची जिभेच्या ५२६० प्रतिमांवर चाचणी घेण्यात आली. या प्रतिमांना वेगवेगळ्या आजारांच्या लेबलसह विश्लेषित करण्यात आले. संशोधनात आढळले की मधुमेहग्रस्त असलेल्या लोकांची जीभ सहसा पिवळसर असते आणि कर्करोगाच्या रुग्णांची जीभ जांभळट रंगाची असते, तसेच तिच्यावर जाड स्तर असतो. तीव स्ट्रोकने ग्रस्त असलेल्या व्यक्तींच्या जिभेचा रंग लाल आणि आकार विचित्र असतो. ‘एआय’ मॉडेलला अशा प्रकारच्या प्रतिमांचे विश्लेषण करण्यासाठी प्रशिक्षित करण्यात आले आहे. त्याच्या सहाय्याने हे मशिन वेगाने व अचूकतेने आजारांचे अनुमान लावू शकते.

### एक देश एक निवडणूकही लागू होणार

# जनगणनेला सुरुवात?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशात लवकरच जनगणनेला सुरुवात होण्याची शक्यता असून, केंद्र सरकारने याचे संकेत दिले आहेत. मात्र, अद्याप या तारखेबाबत अधिकृतपणे काहीही सांगण्यात आलेले नाही. सरकार जातनिहाय जनगणनेचाही विचार करू शकते, असे मानले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार या कार्यकाळात एक देश एक निवडणूक लागू करू शकते, असे विश्लेषकांनी म्हटले आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, केंद्र सरकारने दशकीय जनगणना करण्याची तयारी सुरू केली आहे, परंतु या प्रक्रियेत जातीशी संबंधित स्तंभांचा समावेश करण्याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही. भारतात १८८१ पासून दर १० वर्षांनी जनगणना केली जाते. दशकातील जनगणनेचा पहिला



टप्पा १ एप्रिल २०२० पासून सुरू होणे अपेक्षित होते, परंतु कोविड-१९ मुळे ती पुढे ढकलण्यात आली. गेल्या वर्षी संसदेने संमत केलेल्या महिला आरक्षण कायद्याची अंमलबजावणीही दशकीय जनगणनेशी निगडित आहे. हा कायदा लागू झाल्यानंतर पहिल्या जनगणनेच्या संबंधित आकडेवारीच्या आधारे, लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखीव ठेवण्याचा कायदा अंमलात येईल. जातनिहाय जनगणनेची जोरदार विरोधी पक्षांकडून केली जात आहे. जनगणनेअंतर्गत घरांची यादी करणे आणि राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्टर (एनपीआर) अद्ययावत करण्याचा टप्पा १ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२० या कालावधीत देशभरात राबविण्यात येणार होता.

संपूर्ण जनगणना आणि एनपीआर प्रक्रियेसाठी सरकारला १२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येण्याची शक्यता आहे. ही पहिलीच डिजिटल जनगणना असेल, ज्याद्वारे नागरिकांना स्वतःची जनगणना करण्याची संधी मिळणार आहे. त्यासाठी जनगणना प्राधिकरणाने स्वयंगणनेचे पोर्टल तयार केले आहे. ते अद्याप सुरू करण्यात आलेले नाही. स्वयंगणनेदरम्यान आधार किंवा मोबाइल क्रमांक घेणे बंधनकारक असेल.

---

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## आता देशभरात होणार जातनिहाय जनगणना

**समाजकारण**

बिहार हे देशातील पहिले राज्य होते जिथे जातीय जनगणना करण्यात आली आणि त्यानंतर त्या आधारे आरक्षणाची मर्यादाही वाढवण्यात आली. हे काम नितीशकुमार यांच्या सरकारने केले आणि आता ते भाजपसोबत आघाडीत आहेत. त्यांच्या सहकार्याने केंद्र सरकारही चालत असून राज्यात भाजप आणि जेडीयूही एकत्र आहेत. जेडीयूकडून अनेकदा जातीय जनगणनेची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय चिराग पासवान यांनीही यासाठी



नुकतीच मागणी केली. काँग्रेस, सपा, राजदसह देशातील सर्वच प्रमुख राजकीय पक्ष सातत्याने ही मागणी करत आहेत. मोदी सरकारही या पर्यायावर विचार करत असल्याची माहिती समोर आली आहे. जनगणनेचे काम सुरू झाले असून लवकरच त्याची प्रक्रिया अधिकृतपणे जाहीर केली जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. गरज पडल्यास जनगणनेच्या फॉर्ममध्ये जातीचा स्तंभही नोंदवला जाईल, अशी मानसिकतयारी सध्या सरकारही करत आहे. यासंदर्भात ही लवकरच निर्णय घेतला जाऊ शकतो. भाजप नेतृत्व आणि मोदी सरकारचा बदललेला दृष्टिकोनही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बदलत्या भूमिकेमुळेच असल्याचे मानले जात आहे. नुकतेच केरळमध्ये झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बैठकीनंतर संघटनेने जातीय जनगणनेच्या प्रश्नावर सकारात्मक उत्तर दिले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने म्हटले आहे की, आम्ही जातीय जनगणनेच्या विरोधात नाही. सामाजिक योजना आखण्यात त्याचा काही फायदा होत असेल तर तो करावा. पण सामाजिक तेढ निर्माण करण्याचा किंवा आपले राजकीय हित साधण्याचा हा प्रयत्न नसावा.

---

» Selected

## निर्देशांक सावरला

**मुंबई :** भारतीय बाजारांनी सोमवारी तीन दिवसांची घसरण मोडीत काढत, सुधारणा केली. बँक, धातू आणि ऊर्जा या कंपन्यांच्या नेतृत्वाखाली निफ्टी २५,४०० च्या आसपास बंद झाला. निर्देशांक ९७.८४ अंकांनी वधारून ८२,९८८.७८ वर, तर निफ्टी २७.२५ अंकांनी वधारून २५,३८३.७५ वर बंद झाला. सकारात्मक सुरुवातीनंतर बाजाराने तेजी वाढवून नवा विक्रमी उच्चांक गाठला. मात्र, जसजसा दिवस पुढे सरकत गेला, तसतशी ही वाढ पुसली गेली. बंद होताना बाजार सावरला. निफ्टीमध्ये एनटीपीसी, जेएसडब्ल्यू स्टील, हिंडाल्को इंडस्ट्रीज, श्रीराम फायनान्स आणि एल अँड टी यांचे समभाग वधारले, तर बजाज फायनान्स, एचयूएल, बजाज फिनसर्व्ह, एसबीआय लाइफ इन्शुरन्स आणि ब्रिटानियाचे समभाग घसरले. एफएमसीजी आणि टेलिकॉम वगळता इतर सर्व निर्देशांक हिरव्या रंगात बंद झाले. बँक, कॅपिटल गुड्स, पॉवर, रियल्टी, मीडिया ०.४ ते १ टक्क्यांनी वधारले.

## हमास लढण्यासाठी सज्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इस्तंबूल :** गाझामध्ये ११ महिन्यांहून अधिक काळ चाललेल्या युद्धात झालेल्या नुकसानीनंतरही हमास या दहशतवादी संघटनेकडे इस्रायलशी लढण्यासाठी पुरेशी संसाधने आहेत, असे हमासच्या एका दहशतवाद्याने सांगितले. हमास आजही इस्रायलला चोख प्रत्युत्तर देऊ शकतो, असे त्याने वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी दक्षिण इस्रायलवर हमासने अचानक केलेल्या हल्ल्यानंतर हमासचा नायनाट करण्यासाठी प्रत्युत्तरादाखल लष्करी कारवाई सुरू केली, ७ ऑक्टोबर रोजी झालेल्या या हल्ल्यात १,२०५ इस्रायली नागरिकांचा मृत्यू झाला. इस्रायलच्या लष्करी मोहिमेमुळे गाझामध्ये किमान ४१,२०६ पॅलेस्टिनी ठार झाले आहेत. इस्रायलने हमासच्या १७ हजार दहशतवाद्यांचा खात्मा केला.

---

### शक्तिशाली चक्रीवादळ 'बेबिंका' धडकले

# चीनवर नैसर्गिक आपत्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** तब्बल ७५ वर्षांनंतर चीनवर मोठी आपत्ती ओढवली आहे. आतापर्यंतचे सर्वात शक्तिशाली चक्रीवादळ 'बेबिंका' सोमवारी सकाळी शांघायमध्ये धडकले. शी जिनपिंग सरकारने किनारपट्टीभागात जोरदार वारे आणि मुसळधार पावसामुळे सुरक्षेच्या उपाययोजनांचा भाग म्हणून उड्डाणे, महामार्ग आणि रेल्वे सेवा बंद केल्या आहेत. यापूर्वी १९४९ मध्ये आलेल्या वादळामुळे देशाच्या अनेक भागात प्रचंड नुकसान झाले होते. बेबिंकाचा कहर आणखी धोकादायक ठरू शकतो, अशी भीती चीनच्या हवामान खात्याने व्यक्त केली आहे. शहराच्या अनेक भागात मुसळधार पाऊस आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. शहरातील २५० कोटी लोकसंख्येला घरातच राहून काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सरकारच्या सूचनेनुसार आपत्कालीन पथकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

चीनच्या प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, ७५ वर्षांतील सर्वात शक्तिशाली चक्रीवादळ बेबिंका सोमवारी शांघायमध्ये धडकले. रेड अलर्ट जारी करण्यात आला असून किनारी भागात राहणाऱ्या लोकांना वाचवून सुरक्षित स्थळी हलवण्यात आल्याची माहिती शहर अधिकाऱ्यांनी दिली. हे चक्रीवादळ सोमवारी सकाळी शहराच्या पूर्वेकडील पुडोंगमधील लिंगांग न्यू सिटीच्या किनारी भागात धडकले.

शहरातील अडीच अब्ज नागरिकांना घराबाहेर न पडण्याचा सल्ला देण्यात आला असून शांघायच्या दोन मुख्य विमानतळांवरील सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली असून, नदीकाठी वसलेल्या चोंगमिंग जिल्ह्यातूनही नऊ हजार लोकांना वाचवण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



## धनखड यांनी केला राहुल यांचा निषेध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत केलेल्या वक्तव्याचा निषेध केला आहे. ते म्हणाले की, घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीकडून परकीय भूमीत वेळोवेळी भारतविरोधी विधाने केली जातात. अत्यंत उच्च घटनात्मक पदावर असलेली व्यक्ती परदेशात जाऊन तेथे आरक्षण रद्द झाले पाहिजे, अशी विधाने कशी करते, हा चिंतेचा आणि चर्चेचा विषय आहे.

ते म्हणाले की, भारतीय राज्यघटना म्हणजे केवळ खिशात ठेवून ती दाखवण्यापेक्षा ही घटना वाचले पाहिजे आणि समजून घेतले पाहिजे. राज्यघटनेचे प्रदर्शन पुस्तकासारखे करता कामा नये. राज्यघटनेचा आदर केला पाहिजे. संविधान त्यांना समजलेले नाही, असा आरोपही त्यांनी केला.

---

# भारताशी संबंध बिघडल्याची कबुली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मालदीवचे परराष्ट्रमंत्री मूसा जमीर यांनी मान्य केले आहे की, राष्ट्रपती मोहम्मद मोईज्जू यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या सुरुवातीच्या काळात भारत-मालदीव संबंध कठीण काळातून गेले. मात्र, दोन्ही देशांनी गैरसमज दूर केले आहेत. जमीर यांनी शुक्रवारी श्रीलंकेच्या दौऱ्यात हे वक्तव्य केले. चीन आणि भारतासह प्रमुख भागीदारांशी चांगले संबंध ठेवण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

जमीर म्हणाले की, भारताबरोबरच्या संबंधांमध्ये आव्हाने आहेत. विशेषत: मालदीवमधून भारतीय सैनिकांची तुकडी मागे घेण्याचा आग्रह राष्ट्राध्यक्ष मोईज्जू यांनी धरला होता. त्यासाठी इंडिया आऊट, ही मोहीम त्यांनी राबवली. आपल्या सरकारच्या सुरुवातीच्या काळात भारतासोबत काही तणाव होता. भारत आणि चीनसोबत आमचे चांगले संबंध असून, दोन्ही देश मालदीवला पाठिंबा देत आहेत, असे ते म्हणाले. मोईज्जू यांचा कल चीनकडे असल्याचे मानले जाते.

तीन उपमंत्र्यांनी सोशल मीडियावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने मालदीव आणि मालदीवमधील संबंध ताणले गेले होते. मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने या वक्तव्यापासून स्वत:ला दूर ठेवले. त्यानंतर या तिन्ही मंत्र्यांना निलंबितही करण्यात आले होते. त्यांच्या प्रवक्त्याने सांगितले की, राष्ट्राध्यक्ष लवकरच भारताचा अधिकृत दौरा करतील.

जमीर यांनी मालदीवसमोरील सध्याची आर्थिक आव्हाने तात्पुरती असल्याचे म्हटले असून, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून (आयएमएफ) बेलआऊट पॅकेज घेण्याची मालदीवची कोणतीही योजना नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. मालदीवमधील आर्थिक स्थितीबाबत क्रेडिट रेटिंग एजन्सींनी दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर जमीर यांनी हे वक्तव्य केले आहे. मालदीववर सध्या ४०९ दशलक्ष डॉलरचे कर्ज आहे.

---

### दुसऱ्यांदा बचावले, सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

# ट्रम्प यांच्यावर हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** फ्लोरिडा पाम बीचवर ट्रम्प गोल्फ क्लबच्या बाहेर रविवारी गोळीबाराची घटना घडली. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प हे सुरक्षित आहेत. या घटनेनंतर ट्रम्प गोल्फ कोर्सच्या जवळपास एफबीआय आणि सिक्रेट सर्व्हिस कसून पाहणी करत आहेत. या घटनेच्या तपासाची जबाबदारी एफबीआयकडे सोपवण्यात आली आहे. सिक्रेट सर्व्हिस अधिकाऱ्यांनी सांगितले की ही घटना रात्री २ वाजण्याच्या सुमारास घडली.

ट्रम्प यांच्या हत्येचा दुसरा प्रयत्न उघड झाल्यानंतर, अमेरिकेत खळबळ उडाली आहे. त्यांच्या हत्येचा यापूर्वीही प्रयत्न झाला होता. जुलै मध्ये पेनसिल्व्हेनियाच्या रॅलीत एका बंदुकीधारी व्यक्तीने असुरक्षित छतापर्यंत प्रवेश केला तेव्हा ट्रम्प यांच्या कानात गोळी लागली होती, ज्यामुळे ट्रम्प यांच्या एका समर्थकाचा मृत्यू झाला होता आणि दोन जण गंभीर जखमी झाले होते.

डोनाल्ड ट्रम्प यांच्यापासून ३०० ते ५०० यार्डवर हा हल्ला झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोळीबार सुरु होताच सिक्रेट सर्विसच्या अधिकाऱ्यांनीही लगेच हल्लाखोराच्या दिशेने गोळीबार सुरू केला. मात्र, हल्लेखोराला पळून जाण्यात यश आले. पण पुढे काही तासांतच हल्लेखोराला अटक करण्यात आली. रायन वेस्ली रुथ (५८) असं या हल्लेखोराचं नाव आहे.

## नितीशकुमार यांचा वन नेशनला पाठिंबा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नितीशकुमार यांच्या जनता दल युनायटेडने नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील सर्वात मोठ्या 'वन नेशन, वन इलेक्शन' या योजनेला पाठिंबा दिला आहे. यामुळे धोरणांमध्ये सातत्य राहील आणि वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे निर्माण होणाऱ्या समस्याही टळेल, असे म्हणत जेडीयूने सोमवारी मोदींच्या योजनेचे समर्थन केले. भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार या कार्यकाळातच 'एक देश, एक निवडणूक' लागू करेल, असे केंद्र सरकारमधील सूत्रांनी सांगितले आहे.

## फुले उमलली...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**ढाका :** बांगलादेशातील ढाका येथील सारीघाट भागात फुलांच्या मैदानात, मुलासह निसर्गाचा आनंद घेताना एका महिलेचे टिपलेले छायाचित्र.

---

# रशिया-युक्रेन यांचे परस्परांवर हल्ले तीव्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कीव्ह :** युक्रेनच्या काळ्या समुद्रातील ओडेसा बंदरावर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात दोन जण ठार झाले असून, रशिया आणि युक्रेन यांच्यात ड्रोन तसेच क्षेपणास्त्र हल्ले होत आहेत.

खार्कीव येथील एका बहुमजली निवासी इमारतीवर रविवारी दुपारी रशियन हवाई बॉम्बने केलेल्या हल्ल्यात किमान ४१ जण जखमी झाले, अशी माहिती महापौर इहोर तेरेखोव यांनी दिली. इतर १२ इमारतींचेही नुकसान झाले आहे.

दरम्यान, रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, त्यांनी पश्चिम आणि नैऋत्य भागात रविवारी रात्री २९ युक्रेनियन ड्रोन पाडले. पश्चिम रियाझान भागात रविवारी सकाळी युक्रेनचे आणखी एक ड्रोन पाडण्यात आले.

युक्रेन आणि रशिया नियमितपणे एकमेकांच्या भूमीवर ड्रोन हल्ले करतात. युक्रेनचे अधिकारी रशियाच्या सीमेतील हल्ल्यांची पुष्टी किंवा खंडन करत नाहीत.

युक्रेनचे सैन्य पूर्व युक्रेनमधील रशियाला रोखण्यासाठी धडपडत असताना, युक्रेनने पाश्चिमात्य देशांना त्यांनी पुरविलेल्या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांचा वापर रशियाच्या आतील लक्ष्यांवर हल्ला करण्यासाठी करण्याची परवानगी देण्याची मागणी केली होती. अमेरिकेने युक्रेनला लागून असलेल्या रशियाच्या सीमेतील मर्यादित भागातच शस्त्रे वापरण्याची परवानगी दिली आहे.

रशियाने या आठवड्यात युक्रेनवर विविध प्रकारची सुमारे ३० क्षेपणास्त्रे, ८०० हून अधिक गाइडेड हवाई बॉम्ब आणि सुमारे ३०० स्ट्राईक ड्रोन डागले आहेत.

# दोन ठिकाणी चकमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** श्रीनगर : जम्मू-काश्मीरमध्ये १८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानापूर्वी रविवारी जम्मू भागातील पूंछ आणि कठुआ या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये दोन चकमक झाली.

एका सुरक्षा अधिकाऱ्याने सांगितले की, पुंछ जिल्ह्यात पठाणतीर भागातील जंगल परिसरात दहशतवाद्यांनी पोलिस आणि लष्कराच्या संयुक्त शोध पथकावर गोळीबार केला. दोन्ही बाजूंमध्ये काही काळ गोळीबार सुरू होता. त्यानंतर अतिरेकी घनदाट जंगलात घुसले, असे या अधिकाऱ्याने सांगितले. जंगल परिसरात लपून बसलेल्या दहशतवाद्यांच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी सुरक्षा दल ड्रोन आणि इतर टेहळणी उपकरणांचा वापर करत होते. शेवटचे वृत्त येईपर्यंत शोधमोहीम सुरू होती,

---

### सुनीता केजरीवाल, आतिशी, गोपाल राय यांचे नाव

# केजरीवालांच्या नंतर कोण?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दोन दिवसांत राजीनामा देण्याची अनपेक्षित घोषणा केल्याने, त्यांच्या उत्तराधिकारीबाबत चर्चांना उधाण आले आहे. संभाव्य उमेदवारांमध्ये त्यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल, मंत्री आतिशी आणि गोपाल राय यांचा समावेश आहे.

उत्पादन शुल्क धोरणातील भ्रष्टाचार प्रकरणी तिहार तुरुंगातून जामिनावर सुटलेल्या केजरीवाल यांनी येत्या काही दिवसांत 'आप'च्या आमदारांची बैठक घेणार असल्याचे सांगितले.

पक्षाच्या मुख्यालयात 'आप'चे नेते आणि कार्यकर्त्यांना संबोधित करताना केजरीवाल यांनी आपल्या राजीनाम्याची आश्चर्यकारक घोषणा केली. दिल्लीच्या जनतेने प्रामाणिकपणाचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपण पुन्हा मुख्यमंत्रिपदावर रुजू होणार असल्याचे ही त्यांनी जाहीर केले.

दिल्लीच्या जनतेने क्लीन चिट दिल्याशिवाय सिसोदिया हे पद स्वीकारणार नाहीत, असे सांगून केजरीवाल यांनी 'आप'मधील दुसऱ्या क्रमांकाचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची जागा घेण्याची शक्यता फेटाळून लावली. केजरीवाल यांच्या राजीनाम्यानंतर नव्या मुख्यमंत्र्यांबाबत 'आप'कडून कोणतेही अधिकृत वक्तव्य करण्यात आले नसले, तरी त्यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल या संभाव्य उमेदवार ठरू शकतात.

सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) केजरीवाल यांना २१ मार्च रोजी अटक केल्यानंतर, नुकत्याच झालेल्या दिल्ली, गुजरात आणि हरियाणातील लोकसभा निवडणुकांमध्ये भारतीय महसूल सेवेच्या माजी अधिकारी सुनीता केजरीवाल यांनी आम आदमीच्या प्रचारात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

---

### मोदी ३.० सरकारचे पहिले १०० दिवस

# पायाभूत सुविधांसाठी विक्रमी तरतूद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मोदी ३.० सरकारने आपल्या पहिल्या १०० दिवसांत पायाभूत सुविधा आणि इतर विकास क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केल्याचा दावा केला आहे. मंगळवारी रालोआ सरकारला १०० दिवस पूर्ण होत आहेत. पंतप्रधान मोदींनी सार्वत्रिक निवडणुकांच्या निकालापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन १०० दिवसांचा रोडमॅप तयार केला होता. निवडणुकीदरम्यान आणि निवडणुकीनंतर रोजगारावरून विरोधक मोदी सरकारवर हल्लाबोल करत आहेत.

या १०० दिवसांवर नजर टाकली तर मोदी सरकारने शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवले आहे. याशिवाय रोजगार वाढीसाठी पायाभूत सुविधांना चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तर काँग्रेसने मोदी सरकारला १०० दिवसांचा हिशोब मागितला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, एनडीए सरकार आपल्या १०० दिवसांच्या अजेंड्यात अपयशी ठरले आहे. प्रामुख्याने गरिबांचे कल्याण, त्यांची सुरक्षा आणि सन्मान यावर लक्ष केंद्रित केले आहे. ६०-७० महत्त्वाच्या विकासबिंदूंचा समावेश असलेली ही कामगिरी विकसित भारत साध्य करण्यासाठी सरकारची बांधिलकी दर्शविते.



सरकारने आपल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात प्रामुख्याने रस्ते, रेल्वे, बंदरे आणि हवाई मार्गांवर लक्ष केंद्रित करून पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आणि इतर प्रकल्पांची अंमलबजावणी आणि सुरुवात केली, तसेच महाराष्ट्रातील वाढवण बंदरासारख्या अनेक मोठ्या प्रकल्पांना मंजुरी दिली. जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये त्याचा विकास करण्यात येणार आहे. गेल्या १०० दिवसांत आम्ही जे काही साध्य केले आहे ते येत्या काही वर्षांत इतर प्रकल्पांसाठी आदर्श निर्माण करण्यास मदत करेल. तसेच सरकारने आठ नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पांना मंजुरी दिली असून त्यातून ४.४२ कोटी मानवी दिवसांचा रोजगार निर्माण होणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शहरी आणि ग्रामीण भागात ४.२७ कोटी घरे बांधण्यास सरकारने मंजुरी दिली. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजपने दिलेल्या आश्वासनानुसार सरकारने रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी दोन लाख कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले, ज्याचा फायदा पुढील पाच वर्षांत किमान ४१ दशलक्ष तरुणांना होऊ शकतो. त्याचबरोबर २० लाख युवकांना कौशल्य देण्याचे उद्दिष्टही सरकारने मंजूर केले. ४.३ लाख बचत गटांच्या ४८ लाख सदस्यांना लाभ देणारा २,५०० कोटी रुपयांचा सामुदायिक गुंतवणूक निधीही सरकारने जाहीर केला.

#रा

## धक्कादायक! भारताचा फॉर्म्युला-2 रेसर अपघातादरम्यान थोडक्यात बचावला

भारताचा २३ वर्षीय फॉर्म्युला-२ रेसर कुश मैनी नुकताच एका मोठ्या अपघातादरम्यान अगदी थोडक्यात वाचला आहे. रविवारी अजरबैजान ग्रां पी दरम्यान ही दुर्घटना झाली. या स्पर्धेत कुश मैनी देखील सहभागी झाला होता. या स्पर्धेत कुश मैनीने ५ व्या स्थानावर रेस सुरू केली होती. पण रेस सुरू झाल्यानंतरही त्याची कार पुढे जात नव्हती. यावेळी त्याच्या मागे असलेल्या कार ड्रायव्हर्सने त्याच्या कारपासून वाचण्याचा प्रयत्न केला.




### ‘स्पोर्टसफिल्ड मान्सुन लीग’ अजिंक्यपद १४ वर्षाखालील क्रिकेट

# विराग, जाधव अॅकॅडमी संघांची विजयी आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या ‘स्पोर्टसफिल्ड मान्सुन लीग’ अजिंक्यपद १४ वर्षाखालील ३०-३० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत विराग क्रिकेट अॅकॅडमी आणि धीरज जाधव क्रिकेट अॅकॅडमी या दोन्ही संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी आगेकूच केली. सातारा रोड येथील टेंभेकर फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अमर सिंग याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर विराग अॅकॅडमीने गॅरी क्रिस्टर्न क्रिकेट अॅकॅडमीचा १ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना गॅरी क्रिस्टर्न क्रिकेट अॅकॅडमीने ११८ धावा धावफलकावर लावल्या. यामध्ये ध्रुव कोरेकर याने ३७ धावा केल्या. विराग संघाच्या अमर सिंग याने १६ धावात ४ गडी बाद केले. हे लक्ष्य विराग क्रिकेट अॅकॅडमीने २७.४ षटकामध्ये गाठले. विराट उत्तेकर याने नाबाद ३३ धावा करून संघाच्या विजयात धावांचे योगदान दिले.

श्रेयस वाघमोडे याने केलेल्या भेदक गोलंदाजीमुळे धीरज जाधव क्रिकेट अॅकॅडमीने विराग अॅकॅडमीचा ८१ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना धीरज जाधव क्रिकेट अॅकॅडमीने राजवीर जाधव (नाबाद ५४ धावा), वेदांत पाटेकर (३० धावा), अलि बागवान (२७ धावा) आणि तन्मय बाविस्कर (२४ धावा) यांच्या फलंदाजीमुळे १९० धावांचे आव्हान उभे केले. या लक्ष्याचा पाठलाग करताना विराग क्रिकेट अॅकॅडमीचा डाव १०९ धावांवर मर्यादित राहीला. धीरज अॅकॅडमीच्या श्रेयस वाघमोडे याने १८ धावात ५ गडी बाद करून विराग अॅकॅडमीचा निम्मा संघ तंबुत पाठवला. दुसऱ्या बाजुने रिशित देशकर यानेसुद्धा ४ गडी बाद करून अचूक कामगिरी केली.



## चक दे इंडिया! भारताची फायनलमध्ये धडक



**हुलुनबुईर :** हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये धडक दिली. भारतीय संघाचे उपांत्य फेरीतही अपराजित मालिका कायम राखताना दक्षिण कोरियावर मात केली. अंतिम सामन्यांत त्यांना चीनचा सामना करावा लागणार आहे. यजमान चीनने प्रथमच फायनलमध्ये धडक देताना पाकिस्तानला पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभवाचा धक्का दिला. कर्णधार हरमनप्रीत सिंगने आजच्या सामन्यातही दोन गोल केले. उत्तम सिंग व जरमनप्रीत सिंग यांच्या प्रत्येकी १ गोलने भारताचा ४-१ असा विजय पक्का केला.




# गोल्फ कॅप्टन चषकाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## दिवेष वाधवान कॅप्टन चषकाचे मानकारी

**पुणे :** अतिशय प्रतिष्ठित अशा कँप्टन चषकाचे आयोजन येरवडा येथील गोल्फ कोर्स पार पडले .या गोल्फ स्पर्धेला उत्सफूर्त प्रतिसाद मिळाला .या वर्षाचा कॅपटन चषकाचे मानकरी दिवेश वाधवान ,अविनाश देवस्करद्वितीय तर ठरले .तर कालिया पी सी तृतीय क्रमांक मिळवला . यास्पर्धेचे आयोजन येरवडा गोल्फ कोर्स चे कप्तान व आयोजक इक्राम खान यांनी केले होते .या स्पर्धेत दुसऱ्या गटात शौर्य खंडेलवाल प्रथम ,संजीव हुकमनी द्वितीय,अजय पाटील यांना तृतीय क्रमांक मिळाला .

तिसऱ्या गटात संजीव भाटिया प्रथम ,रत्नाकर कर्वे द्वितीय ,जगदीप सिंघ तृतीय असे विजेते होते चौथ्या गटात प्रदीप नाडकर्णी प्रथम ,सुहास ठक्कर द्वितीय तर प्रकाश गुगले तृतीय क्रमांक मिळाला .सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते चषक आनी बक्षिसे देण्यात आली यावेळी गोल्फ क्लब येरवडाचे कप्तान इक्राम खान यासह इतर मान्यवर उपस्थित होते .

### आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी

## दोस्तीत कुस्ती! चीनकडून पाकिस्तानचा धुव्वा

**पुणे :** आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४च्या पहिल्या उपांत्य फेरीत चीन आणि पाकिस्तान यांच्यात थरारक सामना पाहायला मिळाला. निर्धारित ६० मिनिटांत सामना १-१ असा बरोबरीत सुटल्यानंतर पेनल्टी शूट आऊटमध्ये नाट्यमय घडामोड पाहायला मिळाली. चीनने पहिल्या दोन प्रयत्नांत गोल केले. पण, त्यानंतर पाकिस्तानच्या गोलरक्षकाने सलग दोन बचाव करून संघाला सामन्यात कायम ठेवले होते. मात्र, पाकिस्तानने संधी गमावली आणि चीनने फायनलमध्ये एन्ट्री घेतली.

उपांत्य फेरीच्या सामन्यात यजमान चीनने त्यांना पराभवाचे पाणी पाजले. निर्धारित वेळेत पाकिस्तानकडून नदीम अहमदने, तर चीनकडून लू युआनलिन यांनी गोल केले. चौथ्या क्वार्टरमध्ये पाकिस्तानचे आघाडी घेण्याचे सर्व प्रयत्न चीनी खेळाडूंनी हाणून पाडले. चीनने पहिल्या दोन प्रयत्नांवर गोल करून २-० अशी आघाडी घेतली. तेच पाकिस्तानचे दोन्ही प्रयत्न रोखले गेले. चीनने पहिल्यांदाच अंतिम फेरीत धडक दिली.

### श्रीमती. सरल अनंत बापट मेमोरियल रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत

# शौर्य सोनावणे, कशिश जैन, परम जालन, वरद गायकवाड, ओजस देवगडे आघाडीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बुद्धिबळ क्रीडा ट्रस्ट यांच्या तर्फे आयोजित पहिल्या स्वर्गीय श्रीमती. सरल अनंत बापट मेमोरियल रॅपिड खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत पाचव्या फेरी अखेर शौर्य सोनावणे, कशिश जैन, परम जालन, वरद गायकवाड, ओजस देवगडे यांनी आपापल्या गटात आघाडी प्राप्त करत आजचा दिवस गाजवला.

श्री गणेश सभागृह, कर्वे रोड, पुणे येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत पाचव्या फेरीत 10 वर्षाखालील गटात दुसऱ्या पटावरील शौर्य सोनावणे याने आरव दासचा पराभव करून 5गुण प्राप्त केले. तर, पहिल्या पटावर केविन माथीयाझगनने नैतिक मानेला बरोबरीत रोखले व 4.5 गुण मिळवले.

खुल्या गटात कशिश जैन याने प्रियांशु पाटीलचा पराभव करून 5 गुण मिळवले. तर, अविरत चौहान व प्रथमेश शेरला यांच्यातील चुरशीची लढत बरोबरीत सुटली. 15 वर्षाखालील गटात पहिल्या पटावरील सामन्यात परम जालनने राकेश माथीयाझगनचा पराभव करून 4.5 गुणांची कमाई केली. वरद गायकवाडने श्लोक माळीचा, तर, ओजस देवगडेने अर्णव तापकीरचा पराभव करून 4.5 गुण मिळवले.



याआधी स्पर्धेचे उदघाटन स्थापत्य अभियांत्रिकी व आर्किटेक्ट मधुकर बापट, विवेक बापट यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बुद्धिबळ क्रीडा ट्रस्टचे ट्रस्टी प्रकाश कुंटे व रवींद्र अकोलकर, चीफ आरबीटर आयए विनिता श्रोत्री, नितीन शेणवी आदी मान्यवर उपस्थित होते.

### टेबल टेनिस स्पर्धा

## माधुरिका पाटकर व रीगान अलबुकर्क यांना अग्रमानांकन

**पुणे :** माधुरिका पाटकर व रीगन अलबुकर्क या खेळाडूंना तिसऱ्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील अनुक्रमे महिला व पुरुष गटात अग्रमानांकन देण्यात आले आहे. दिनांक १९ ते २३ सप्टेंबर या कालावधीत ही स्पर्धा आयोजित केली आहे

टेबल टेनिस स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशन ऑफ संभाजीनगर यांनी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात संभाजीनगर जिल्हा टेबल टेनिस संघटना आणि महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील पुरुष महिला तसेच ११,१३, १५,१७ व १९ वर्षाखालील मुले व मुली या गटात ७२५ खेळाडूंचा भरघोस प्रतिसाद मिळाला आहे. या स्पर्धेमध्ये वरदान कोलते, ध्रुव शाह,आद्या बाहेती, नैशा रेवसकर, अनन्या चांदे इत्यादी अनेक नामवंत खेळाडूंनी भाग घेतला आहे. या स्पर्धेसाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.



# ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळेंचा मुख्यमंत्र्याकडून सत्कार

**पुणे :** ऑलिम्पिक पदक जिंकून आल्यानंतर प्रथमच मराठमोळ्या स्वप्नील कुसाळे यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्कार केला आहे. स्वप्नीलचे मार्गदर्शक व कुटुंबियांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे बक्षिसाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत मागणी केली आहे. मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानावर गणेशोत्सवानिमित्त स्वप्नील कुसाळेंने गणपतीचे दर्शन घेतले. याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे यांनी उपरणे परिधान करून स्वप्नील कुसाळेंला गौरवित केले. यावेळी खासदार श्रीकांत शिंदेही उपस्थित होते. त्यानंतर स्वप्नील व मार्गदर्शक अष्टपुत्रे यांच्यासोबत मुख्यमंत्री शिंदे यांनी अर्धा तास चर्चा केली. यावेळी तब्बल 72 वर्षांनी महाराष्ट्रासाठी पदक जिंकल्याबद्दल राज्य शासनाच्या बक्षिसाच्या रक्कमेत वाढ करावी, पुढील ऑलिम्पिकच्या तयारीसाठी बालेवाडी स्टेडियमजवळ सदनिका मिळावी ही मागणी त्यांचे कुटुंबिय व मार्गदर्शक यांच्याकडून मुख्यमंत्र्यांना करण्यात आली.

# गुणवान महिला सायकलपटूंसाठी शोध मोहिम

## खेलो इंडीया ‘वुमेन्स लीग’ स्पर्धेअंतर्गत बारामती येथे रोड सायकल स्पर्धेचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** क्रीडा स्पर्धामधील मुलींचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने मुलींसाठी ‘वुमेन्स लीग’ सायकल स्पर्धेचे आयोजन केले आहे. बारामती येथे या स्पर्धा २० ते २१ सप्टेंबर २०२४ दरम्यान होतील सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनानुसार सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रने आयोजित केलेल्या या स्पर्धा बारामती येथे संत तुकराम महाराज पालखी मार्गावर होणार आहेत.

स्पर्धेविषयी अधिक माहिती देताना सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष आणि स्पर्धेचे संघटन सचिव सचिव प्रताप जाधव, यांनी सांगितले की, या स्पर्धेच्या माध्यमातून मुलींच्या क्रीडा गुणांना वाव देणे, स्पर्धांचा सराव होणे आणि त्यामधून गुणवान महिला खळाडूंची निवड करुन त्यांना प्रोत्साहन देण्याचा केंद्र सरकारचा उद्देश आहे. पश्चिम विभागाची रोड प्रकारामधील दुसरी स्पर्धा बारामती येथे पाटस ते लिमटेक गावादरम्यान नवीन तयार होत असलेल्या जगदगुरु संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर होणार आहे. या स्पर्धेचा उद्‌घाटन समारंभ शुक्रवार दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ९:०० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षचे युवा नेते मा. जयदादा पवार यांच्या शुभहस्ते आणि पारितोषिक वितरण समारंभ शनिवार दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०:०० वाजता खासदार सौ.सुनेत्रावहिणी पवार यांच्या हस्ते स्पर्धे ठिकाणी होणार आहे.

या स्पर्धेविषयी अधिक माहिती देताना स्पर्धेच्या तांत्रिक संचालिका आणि राष्ट्रीय प्रशिक्षक दिपाली पाटील यांनी सांगितले की या स्पर्धा सब ज्युनिअर, ज्युनिअर आणि सिनीअर अशा वयोगटात होतील. स्पर्धा टाईम ट्रायल आणि मास स्टार्ट या प्रकारात होतील. तसेच सर्व वयोगटात विदेशी किंवा भारतीय बनावटील वापरता येतील. स्पर्धेमधील विजेत्यांना एकूण १ लाख २० हजार रुपयांची पारितोषिके केंद्र सरकारच्यावतीने देण्यात येतील. याप्रसंगी शिवछत्रपती पारोतोषिक सन्मानीत आणि स्पर्धेच्या मुख्य पंच मिनाक्षी शिंदे, मिलींद झोडगे, बिरु भोजने आदी मान्यवर हजर होते.



# साईश दुधाणेला सायकल रॅली सुवर्ण, सायकलही भेट

**पुणे :**मुळशी तालुक्यातील पिरंगुटमधील साईश सुभाष दुधाणेंने विद्यार्थ्यांच्या सायकल रॅलीत सुवर्ण पटकाविले आहे. केंद्रिय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते साईशला सायकलही भेट मिळाली आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पुण्यात शालेय विद्यार्थ्यांच्या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कोथरूडमधील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते डेक्कन जिमखान येथील धर्मवीर संभाजी महाराज पुतळा अशी सायकल रॅली निघाली. या रॅली पूर्ण केल्याबद्दल साईशला सुवर्णपदक व प्रशास्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. कोथरूडमधून रॅली निघण्यापूर्वी अभिनव शाळेत 8 वीत शिकणाऱ्या साईश दुधाणे याला आदर्श विद्यार्थी असल्याने केंद्रिय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते सायकल भेट देण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या संयोजिका खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, क्रिकेटपटू राहुल त्रिपाठी व स्कायडायव्हर शीतल महाजन उपस्थित होत्या.

# कोथरूडच्या मुख्य रस्त्यावर वाहतेय दुर्गंधीयुक्त गटार



वाडेश्वर मध्ये येणाऱ्या खवय्यांसाठी ड्रेनेजवरील हे पायदान पार करून जावे लागते

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरातील उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या आणि सरकारमधील एक वजनदार मंत्री असलेल्या चंद्रकांत पाटील यांचे होमपीच असलेल्या कोथरूड मधील उच्चभ्रू आणि सर्वात प्रतिष्ठित असलेल्या करिष्मा सोसायटी जवळील रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून एक दुर्गंधीयुक्त गटार चक्क रस्त्यावरून वाहत आहे.

सध्या महापालिका चे सदस्य नसल्यामुळे याची जबाबदारी नेमकेपणाने घेण्यास कोणी तयार नाही. भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते आणि थेट मंत्र्यांपर्यंत त्याच्या तक्रारी दिल्या आहेत .

या परिसरात श्रीमंत आणि अति श्रीमंत रहिवाशांची वस्ती आहे असे मानले जाते. पुण्याचे दोन खासदार , केंद्रीय मंत्री, राज्याचे मंत्री , कोथरूडमध्ये डझनभर असलेले भावी नगरसेवक , आमदार - खासदारांचे कार्यकर्ते या सर्वांचीच या रस्त्यावरून दिवसभर वर्दळ असते . परंतु त्यांच्या एअर कंडीशन गाड्यांमध्ये याची दुर्गंधी कदाचित कधी पोहोचली नसेल . मात्र येथील प्रतिष्ठितांना , व्यावसायिकांना आणि सर्वसामान्य नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून नाकाला रुमाल लावून या परिसरातून फिरावे लागत आहेत.


उच्चभ्रू वर्गाचे सर्वाधिक पसंतीचे ठिकाण म्हणजे येथील वाडेश्वर. या वाडेश्वरच्या प्रवेशद्वारातच ड्रेनेजची ही गटार वाहत आहे. अनेक मंत्री , आमदार आणि प्रशासकीय अधिकारी राहत असलेल्या करिष्मा या बिल्डिंगच्या ड्रेनेजचे हे पाणी आहे. त्याच बिल्डिंगच्या दोन क्रमांकाच्या गेट पासून फुटलेले हे ड्रेनने खाली नेचर वॉक , त्यापुढे वाडेश्वर , त्यापुढे जोशी रेल्वे अमेचीआर इथपर्यंत येऊन एस्टॅलीकाच्या लेनमध्ये दुसऱ्या ड्रेनेज मध्ये जाते.

त्यामुळे या परिसरामध्ये कायम दुर्गंधी दिसून येते तसेच दिवसभर गटारीचे हे पाणी वाहत असल्याने ही सर्व दुकाने आणि सोसायटी ओलांडूनच लोकांना ये - जा करावी लागते. या भागांमध्ये जोशी यांचे रेल्वे म्युझियम आहे येथे सातत्याने पर्यटक भेट देत असतात . परंतु या पर्यटकांनाही याच दुर्गंधीयुक्त पाण्याचा त्रास सोसावा लागतो. नेचर वॉक नावाचे एक सभागृह आहे . येथे सातत्याने कार्यक्रम होत असतात . मागील आठवड्यात येथे अमृत या महामंडळाची माहिती देण्याबाबत शासकीय कार्यक्रम झाला होता . त्याचवेळी येथे सामाजिक कार्यकर्ते संदीप खर्डेकर यांच्या निदर्शनास लोकांनी ही गोष्ट आणून दिली. त्यांनी तात्काळ महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना बोलावून दुरुस्ती करायला सांगितले.

परंतु आजपर्यंत ही गटारगंगा अशीच वाहत आहे. येथील वाडेश्वर मध्ये अनेकदा लेखक , पत्रकार , संपादक, प्रतिथयश उद्योजक यांची मैफिल जमते. यातील अनेक घटकांनी तक्रारी करून देखील आणि वाडेश्वरच्या व्यवस्थापन देखील याबद्दल पाठपुरावा करून देखील ही गटार थांबण्याचे नाव घेत नाही . शेजारीच करिष्मा च्या खालील खाऊ गल्ली आहे तेथे स्टारबक्स सारखे कॉफी शॉप आहेत, पुढे थोडे अंतरावर कोथरूड सिटी प्राईड आहे . पलेदियम , स्वप्नशिल्प , नव्याने उभारलेले गोखले मॉल साठी याच रस्त्यावरून पुढे जावे लागते.

### दादांनी झगमगटाखालील अंधारही पहावा !

● गणेशोत्सवाच्या या कार्य काळामध्ये मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सुमारे 100 हून अधिक कार्यक्रम या परिसरात केले . त्यांचा ताफा देखील दिवसातून किमान तीन ते चार वेळेला याच रस्त्यावरून जातो , अशा या प्रतिष्ठित , महत्त्वाच्या रस्त्यावर तरी स्वच्छता राखणे आणि किमान स्वच्छ व दुर्गंधी मुक्त परिसरासारख्या किमान मूलभूत सुविधा त्यांना पुरविणे हे महापालिका आणि लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे. हे काम मंत्र्यांचे नाही परंतु सध्या नगरसेवक अस्तित्वात नसल्याने आणि भाजप कार्यकर्ते केवळ शोबाजीत दंग असल्याने ही जबाबदारी आता चंद्रकांत दादांनीच घ्यावी , अशी अपेक्षा येथील नागरिक व्यक्त करत आहेत. याबाबत काहींनी चंद्रकांत दादांची भेट घेण्याचे प्रयत्न केला परंतु त्यांच्या सचिवांनी त्यांना वेळ दिली नसल्याचे समजते . सांस्कृतिक कार्यक्रम, जाहिराती , बॅनर्स , निशुल्क वाटपाच्या मोहिमा , झगमगाट यावर कोट्यावधी रुपये खर्च करणाऱ्या दादांनी या दिव्याखालच्या अंधार देखील पहावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे .



#रा



करिष्मा सोसायटी पासून जोशी रेल्वे म्युझियम पर्यंत ही ड्रेनेज दिवसभर अव्याहत वाहत असते .